Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

✲ वर्ष ५४ ✲ अंक २१३ ✲ ✲ नागपूर ✲ | रविवार, दि. १० नोव्हेंबर २०२४ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## सोरेन यांच्या पीएच्या घरावर आयटीची धाड

■ **वृत्तसंस्था, रांची, दि. ९ :**
झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे स्वीय सचिव सुनील श्रीवास्तव यांच्या घरावर आयकर छापा टाकण्यात आला आहे. टीमने सुनील कुमार श्रीवास्तव आणि त्याच्या साथीदारांच्या १७ ठिकाणांवर छापे टाकले आहेत. रांचीमध्ये ७ आणि जमशेदपूरमध्ये ९ ठिकाणी इन्कम टॅक्सचे छापे टाकण्यात येत आहेत. आयकराची ही कारवाई अशा वेळी झाली आहे, जेव्हा १३ नोव्हेंबरला पहिल्या टप्प्याचे मतदान होणार आहे.

विधानसभा निवडणुकीत हवालाच्या मदतीने पैशांचे व्यवहार झाल्याची माहिती प्राप्तिकर विभागाला मिळाली होती. त्यावर यापूर्वी रांची, जमशेदपूर, गिरिडीह आणि कोलकाता येथील ३५ ठिकाणी छापे टाकले होते.

# काँग्रेसकडून ७०० कोटींची वसुली

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ९ :**
महाराष्ट्रातील निवडणुकीसाठी काँग्रेसने ७०० कोटींची वसुली केल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. ते अकोला येथे सभेत बोलत होते.

महायुती सरकारची पुढची पाच वर्ष कशी असतील, याची एक झलक महायुतीच्या वचननाम्यात दिसतेय. महिला सुरक्षा, महिलांना संधी, माझी लाडकी बहिण योजनेचा विस्तार. युवा वर्गासाठी लाखो रोजगार. विकासाच्या योजना. महायुती सरकार महाराष्ट्राच्या विकासाला डबल स्पीडने पुढे नेईल. युवा शिक्षा, रोजगार महायुतीच सरकार करील स्वप्न साकार असेही मोदी यांनी सांगितले. मोदी अकोला येथील प्रचार सभेत बोलले.

राज्यातील महाविकास आघाडी विशेषतः काँग्रेसवर निशाणा साधताना मोदी म्हणाले की, महाआघाडी म्हणजे भ्रष्टाचार, महाआघाडी म्हणजे हजारो कोटींचे घोटाळे, महाआघाडी म्हणजे पैसा काढणे, महाआघाडी म्हणजे टोकन मनी, महाआघाडी म्हणजे ट्रान्सफर पोस्टिंगचा धंदा असे समिकरण असल्याची टीका केली.

अकोला कापूस उत्पादनासाठी ओळखला जातो. कापूस शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी उद्योग आणि इन्फ्रास्ट्रक्चर दोघांना प्रोत्साहन दिलं जात आहे. मी महाराष्ट्रात टेक्सटाईल पार्कची पायाभरणी केलीय. या टेक्सटाईल पार्कमुळे महाराष्ट्रात शेतकऱ्यांसाठी समृद्धीच्या नवीन संधी निर्माण होतील, असा विश्वासही पीएम नरेंद्र मोदी यांनी यावेळी बोलून दाखविला.




> कर्नाटकात या लोकांनी मद्य दुकानदारांकडून ७०० कोटी रुपयांची वसुली केली. काँग्रेस पार्टी घोटाळे करुन निवडणूक लढत आहे. ते निवडणूक जिंकल्यानंतर किती घोटाळे करतील? आपल्याला महाराष्ट्रात सावधान रहायचं आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

> वैनगंगा, नलगंगा आणि पैनगंगा या नद्या जोडण्याच्या योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेमुळे अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम, नागपूर, वर्धा येथील पाण्याची समस्या दूर होईल. यासाठी ९० हजार कोटी रुपये खर्च आहे, असे मोदी म्हणाले.




संत तुकाराम महाराज पालखी मार्ग ❋ संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग

• महानुभाव तीर्थक्षेत्र विकास : रिद्धपूर, काटोल, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, नांदेड, पांचाळेश्वर, पैठण या चक्रधर आणि महानुभाव पंथ संबंधित क्षेत्रांचा विकास
• राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेने झालेल्या स्वातंत्र्यलढ्याचे स्मारक
• जेजुरीगड, भीमाशंकर, नीरा-नरसिंगपूर, श्रीक्षेत्र परळी इ. क्षेत्रविकास
• संत जगनाडे महाराज समाधीस्थळ सुदुंबरे विकास, नागपुरात आर्ट गॅलरी
• श्री संत सेवालाल महाराज स्मारक, नगाराभवन, पोहरादेवी
• संत निवृत्तीनाथ महाराज समाधीस्थळ विकास
• संत निळोबाराय महाराज समाधी मंदिर विकास
• संत गाडगेबाबा समाधीस्थळ विकास, ऋणमोचन
• प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज स्मारक निधी
• गहिनीनाथ गड संवर्धन व विकास
• संत मुक्ताई मंदिर कोथळी विकास

"Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court

भाजप-महायुती आहे तर गती आहे
महाराष्ट्राची प्रगती आहे

शिवसेना

भारतीय जनता पार्टी - महाराष्ट्र
Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020
महायुतीला मतदान करा आणि विजयी करा

## 'बटेंगे तो कटेंगे'वर शरद पवारांचा हल्ला

■ **वृत्तसंस्था, नांदेड, दि. ९ :**
शरद पवार यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या बटेंगे तो कटेंगेच्या नाऱ्यावरून सत्ताधारी भाजपचा चांगलाच समाचार घेतला आहे. सत्ताधारी पक्षाची टोकाची जातीयवादी भूमिका आहे.

ही भूमिका या निमित्ताने पुन्हा एकदा पुढे आली आहे. समाजात तेढ निर्माण करू नये याचे साधे भान या पक्षाला नाही, असे ते म्हणालेत. योगी आदित्यनाथ काही दिवसांपूर्वी बटेंगे तो कटेंगे हा नारा दिला होता. त्यांच्या या विधानानंतर भाजपने हा नारा उचलून धरला. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी शनिवारी नांदेड येथे भाजपला समाजात तेढ निर्माण करू नये याचे भान नसल्याचे स्पष्ट केले.



शरद पवार म्हणाले, सत्ताधारी पक्षाची जातीयवादी भूमिका आहेच. पण ती या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आली आहे. निवडणुका येतात आणि जातात, पण जाती-धर्मात तेढ निर्माण करण्याचे काम कुणीही करू नये. याचे साधे भान भाजप व त्याच्या मित्रपक्षांना नाही.ही निवडणूक जातीयवादाकडे नेण्यासाठी येथे योगी आदित्यनाथ यांना आणले जात असल्याचा आरोप शरद पवार यांनी केला.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर बाबासाहेब आबंडेकर यांच्या संविधानात बदल करण्याचा कट रचला होता. पण लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने त्यांना त्यांची जागा दाखवून दिली, असे पवार म्हणाले.
> शरद पवार यांची शनिवारी उदगीर येथे सभा झाली. या सभेत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर संविधानात बदल करण्याचा कट रचल्याचा आरोप केला. मोदी सरकारने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानात काही बदल करण्याचा डाव रचला होता. हे कट कारस्थान पूर्ण करण्यासाठी मोदी व त्यांच्या सरकारला ४०० च्या आसपास जागांची गरज होती. येथील जनतेने मोदी व शहांना त्यांची जागा दाखवण्याचे काम केले. यामुळे संविधानात बदल करण्याचा कट उधळला गेला, असे शरद पवार म्हणाले.

## बांटना और कांटना हे भाजपचे काम!

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ९ :**
विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ह्यएक है तो सेफ है आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ह्यबटेंग तो कटेंगे अशा घोषणा दिल्या. त्यावरून काँग्रेसने भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे यांनी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत महाराष्ट्रातील सरकारला तोडफोड सरकार म्हटले आहे. तसेच विचारधारेवर न चालणाऱ्या पक्षाला अशाप्रकारे केवळ सत्ताप्राप्तीसाठी तोडफोड करून सरकार स्थापनेच्या अधिकार नसल्याची टीका केली.

भाजप निवडणूक प्रचारातील भाषणातून लोकांना त्यांच्या खऱ्या समस्यांपासून लक्ष विचलित आणि दिशाभू करत आहेत. अशाप्रकारे भडकाऊ भाषण देऊन लोकांच्या भावना भडकवण्यापेक्षा केलेल्या कामांवर मत का मागण्याची धाडस का होत नाही, असा प्रश्नही खरगे यांनी केला.

ते म्हणाले, योगी आदिनात्य यांची बटेंग ते कटेंग ही घोषणा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आवडली आहे. आता भाजपच्या लोकांमध्ये ही घोषणा देण्याची स्पर्धा लागली आहे.

काँग्रेस राष्ट्रभक्तांचा पक्ष आहे. त्याला कोणाच्याही प्रमाणपत्राची गरज नाही. संघाने महात्मा गांधी यांची हत्या केली. म्हणजे मारणारे हेच विभाजन करणारेही हेच आहेत आणि हेच लोक दुसऱ्यांना दोष देत आहेत. तुमच्याकडे एकतरी महापुरुष आहे काय, ज्याने देशासाठी प्राण गमावला, असा सवाल खरगे यांनी केला.

**खरगे यांची टीका**



## गुजरातमधील नवसारी येथे गोदामाला भीषण आग
### ३ कामगारांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, नवसारी, दि. ९ :**
गुजरातमधील नवसारी जिल्ह्यातील देवसर गावात शनिवारी सकाळी एका गोदामाला रासायनिक गळतीमुळे लागलेल्या आगीत तीन कामगारांचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले. एक कामगार बेपत्ता आहे. सकाळी नऊच्या सुमारास हा अपघात झाला. ट्रकमधून केमिकलने भरलेले बॅरल कामगार उतरवत असताना हा प्रकार घडला.

दरम्यान, केमिकलच्या गळतीमुळे आग लागली आणि ६ कामगार जखमी झाले. जखमींना नवसारी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू केली आहे.

आजूबाजूच्या तालुक्यातून दाखल झालेल्या अग्निशमन दलाच्या पाच गाड्यांनी दोन तासांत आग आटोक्यात आणली. ट्रकमध्ये ठेवलेल्या बॅरलमधून केमिकलची गळती झाल्याने आग लागली.

## दहशतवादी बनायचे होते... मात्र, झाला आमदार!

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ९ :**
जम्मू-काश्मीरच्या लोलाब विधानसभा मतदारसंघातून नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार कैसर जमशेद लोन विधानसभेत म्हणाले, मला आधी दहशतवादी बनायचे होते. खूप यातना सहन कराव्या लागल्या. जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्या सत्राच्या शेवटच्या दिवशी एलजी मनोज सिन्हा यांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावादरम्यान लोन यांनी या गोष्टी सांगितल्या.



कैसर यांनी सांगितले, मी १० वीत असताना माझ्या परिसरात एक दहशतवादी घटना घडली होती. यानंतर लष्कराने माझ्यासह ३२ जणांची चौकशी केली. मी दहशतवाद्यांमध्ये असलेल्या एका तरुणाला ओळखत असल्याचे कबूल केले होते. माझ्या या उत्तरावर मला मारहाण करण्यात आली. तेवढ्यात एक वरिष्ठ लष्करी अधिकारी तेथे आला. त्याने मला विचारले की मला काय बनायचे आहे, तर मी दहशतवादी म्हणालो. नंतर अधिकाऱ्यांनी खडसावले. त्यांच्या या वागण्यानंतर माझा व्यवस्थेवरचा विश्वास पुन्हा निर्माण झाला.

## सर्वोच्च न्यायालयाकडून पुन्हा तारीख पे तारीख

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रतेसंबंधित प्रकरणावर गेल्या अनेक महिन्यांपासून सुनावणी होत नसल्यामुळे सतत नवीन तारखा देण्यात येत आहेत. आता पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाकडून सुनावणीसाठी नवीन तारखा मिळण्याची शक्यता आहे.

शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणी सुनावणी १० डिसेंबरला होण्याची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चिन्ह व नावाच्या वादावर १३ नोव्हेंबरला सुनावणी होईल, तर शिवसेना पक्ष चिन्ह व नावाच्या वादासंबंधी सुनावणी १८ नोव्हेंबरला होण्याची शक्यता आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांना शुक्रवारी दिनांक ८ नोव्हेंबर रोजी कार्यालयीन निरोप देण्यात आलो. १० नोव्हेंबर रोजी ते निवृत्त होत आहेत. त्यामुळे १० तारखेला होणारी सुनावणी पुढे ढकलली जाऊ शकते.

## महायुतीचे सरकार आल्यास
# देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री
### केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे स्पष्ट संकेत

■ **वृत्तसंस्था, सांगली, दि. ९ :**
केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्रातील प्रचार सभेत आगामी काळात महायुतीच्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतील असे संकेत दिले. सांगली जिल्ह्यातील शिराळा येथे भाषण करताना अमित शहा यांनी देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेत तेच मुख्यमंत्री असतील असे संकेत दिले आहेत.

महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीस यांनाच आणायचे, अशी महाराष्ट्रातील जनतेची इच्छा असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता राजकीय वतुर्ळात मुख्यमंत्री पदाबाबत चांगलीच चर्चा सुरू झाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या नंतर महायुतीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण? याबाबत चांगलीच खलबते सुरू आहेत. महायुतीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या तीनही नेत्यांच्या नावावर चर्चा सुरू आहे. तर महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे, नाना पटोले, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांच्या नावाची चर्चा आहे. मात्र या वादात आता अमित शहा यांनी थेट देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचे संकेत दिल्याने याबाबत राजकीय चर्चा रंगली आहे.



> **एकत्र बसून निर्णय घेणार - अजित पवार**
> आम्ही महायुती म्हणून याबाबत एकत्र बसून निर्णय घेऊ, महायुतीचाच मुख्यमंत्री होईल, असा दावा अजित पवार यांनी केला आहे. अमित शहा बोलले, तो त्यांचा अधिकार आहे. राज्यात तीन पक्ष एकत्र निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यामुळे युतीमध्ये दोन पावले मागे यावे लागतात तर कोणाला दोन पावले पुढे जावे लागत असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

> कर्नाटक, हिमाचल प्रदेश, तेलंगाणाच्या निवडणुकीत काँग्रेसने आश्वासनांचे पेटारे उघडले आणि निवडणुका जिंकल्या. परंतु, आश्वासने पाळली नाहीत. आता सांभाळून आश्वासने द्या, असे काँग्रेससारख्या राष्ट्रीय पार्टीचा अध्यक्ष म्हणत असेल तर ती पार्टी आश्वासने पाळू शकते का? असा सवाल करत केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.
> राहुल गांधी ही खोटे बोलणारी फॅक्टरी आहे. तरुणांनी त्यांच्या नादी लागू नये, असे आवाहनही त्यांनी केले.
> डॉ. अतुल भोसले यांच्या प्रचार सभेत बोलताना अमित शाहा म्हणाले की, अग्निवीर ही तरुणांना बेकार करणारी नाही तर सैन्य दलाला तरुण करणारी योजना आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक अग्निवीराला परत आल्यानंतर केंद्र सरकार सीएपीएफ आणि महाराष्ट्र सरकार पेन्शनची नोकरी देईल. हे भाजपाचे आश्वासन आहे.

## जामीनानंतर फरार २ आरोपी गजाआड

**गोवा कॉलनी गोळीबार प्रकरण**

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ९ :**
गोवा कॉलनी परिसरात आपसी वादातून गोळीबार प्रकरणात जामीनानंतर फरार झालेल्या दोन आरोपींना सदर पोलिसांनी अटक केली.

दोन्ही आरोपी पेशीतून सतत गैरहजर रहात होते. त्यामुळे न्यायालयाने दोघांनाही अटक करून हजर करण्याचे आदेश दिले होते. आबिद अहमद खान (२०) आणि मुस्तकीन सलीम खान (२८) दोन्ही रा. मरियमनगर, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

गत २२ जुलै रोजी दोन्ही आरोपींनी साथीदारांसोबत मिळून गोवा कॉलनीत राहणाऱ्या सूरज रामदास नायडू (२१) याच्यावर जीवघेणा हल्ला केला होता. आरोपींनी पिस्तूल काढत सूरजवर ४ राऊंड फायर फायर केले होते. मात्र सूरज सुदैवाने या हल्ल्यातून बचावला होता. दुसऱ्या दिवशी पोलिसांनी गुन्हा नोंदवून ६ आरोपींना अटक केली. पोलिस कोठडी संपल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने सर्व आरोपींची कारागृहात रवानगी झाली. आरोपपत्र दाखल झाल्यानंतर न्यायालयाने आबिद आणि मुस्तकीनची सशर्त जामीनावर सुटका केली होती.

**पेशीतून सतत गैरहजर**

जामीन मिळाल्यानंतर दोन्ही आरोपींनी पेशीदरम्यान सतत गैरहजर राहण्यास सुरुवात केली. त्यामुळे न्यायालयाने दोघांविरुद्धही अटक वॉरंट काढले. मात्र दोघेही फरार होते. दरम्यान विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर शहर पोलिसांनी गुन्हेगारांची झाडाझडती आणि धरपकड सुरू केली आहे. मरियमनगरात कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान आबिद आणि मुस्तकीन पोलिसांच्या हाती लागले. दोघांनाही अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले.

**मध्यप्रदेशचा आरोपीही जेरबंद**

त्याचप्रमाणे मध्यप्रदेशच्या सिवनी जिल्ह्यातील महिला ठाण्यात नोंद प्रकरणामध्ये आरोपी असलेल्या तरुणालाही पोलिसांनी अटक केली. तो सुद्धा स्थानिक न्यायालयाच्या पेशीतून सतत गैरहजर रहात होता.

अक्षांस चंद्रकांता प्यारेम्बार (२८) रा. खलासी लाईन, सदर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. अक्षांसला नोंद प्रकरणात जामीन मिळाला होता. मात्र तो सुनावणीदरम्यान सतत गैरहजर रहात होता. त्यामुळे न्यायालयाने सिवनी पोलिसांना त्याला अटक करण्याचे आदेश दिले. सिवनी पोलिसांनी सदर पोलिसांच्या मदतीने अक्षांसला अटक केली.






# बीडमधून हात आणि धनुष्यबाण गायब

**गोपीनाथ मुंडे यांचा बालेकिल्ला असलेला बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात कधी गेला, हे भाजपला कळलेच नाही. लोकसभा मतदारसंघावर भाजपचे वर्चस्व होते, ते ही आता संपले. विधानसभा, जिल्हा परिषदेसह अन्य सत्तास्थाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात होती. फोडाफोडी करून जिल्हा परिषद भाजपने ताब्यात घेतली होती. या जिल्ह्यामध्ये आता विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सहा प्रमुख पक्षांपैकी काँग्रेस आणि शिवसेनेच्या शिंदे गटाचे नामोनिशाण राहिलेले नाही.**

एके काळी मित्रपक्ष असलेल्या भाजपने शिवसेनेची ताकद हळूहळू घटवत पक्षाचा 'वाघ' बीडच्या पिंजऱ्यात कैद केला होता. आता या एकमेव जागेवरही नव्याने मित्रपक्ष झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने कब्जा केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर ताकद क्षीण झालेल्या काँग्रेसची परळीतील एकमेव जागादेखील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने कायमची आपल्याकडे घेतली. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या शिवसेनेचा 'बाण' आणि महाविकास आघाडीतील मोठा पक्ष काँग्रेसचा 'पंजा' या विधानसभा निवडणुकीत नाही. १९८५ मध्ये युतीची स्थापना झाली. तेव्हा जिल्ह्यामध्ये रेणापूर, चौसाळा, केज, माजलगाव, आष्टी, गेवराई आणि बीड हे सात मतदारसंघ होते. सुरूवातीला भाजपला केवळ दोन तर शिवसेनेला पाच जागा असत. पुढे भाजपने कोकण किंवा मुंबईची जागा शिवसेनेला द्यायची आणि शिवसेनेची जिल्ह्यातील एकेक जागा आपल्याकडे घ्यायची, असा शिरस्ता सुरू केला. सरतेशेवटी युतीमध्ये केवळ बीड शिवसेनेकडे आणि उर्वरित सर्व विधानसभा मतदारसंघ भाजपकडे असे चित्र झाले. गोपीनाथ मुंडे यांच्या काळामध्ये बीडच्या शिवसेनेचे कंट्रोलही त्यांच्याकडेच असत. दरम्यान, दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडली, तर वर्षापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडून एक पक्ष महायुतीमध्ये सहभागी झाला. अगोदर एका मित्राने शिवसेनेच्या वाघाला जेरबंद केले होते. आता दुसऱ्या मित्रानेही या वाघाच्या पिंजऱ्यालाच आपल्या कैदेत घेतले आहे. महायुतीमधील बीडची जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने पदरात पाडून घेतली आहे. या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसने ज्या पक्षाचा आमदार त्या पक्षाचा उमेदवार, असे सूत्र मांडून कब्जा केला असला, तरी येथील आमदार मुळात त्यांच्या पक्षात नाही, हे विशेष. एकनाथ शिंदे राजकारणातील मुत्सद्दी मानले जातात; मात्र एखाद्या जिल्ह्यामध्ये त्यांच्या पक्षाचे चिन्हच निवडणुकीमध्ये नसतानाही त्यांची ही सैल भूमिका शिवसैनिकांचे खच्चीकरण करणारी आहे. शिवसेनेप्रमाणेच काँग्रेसचीही गत झाली आहे. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस स्थापनेनंतर जिल्ह्यातील काँग्रेसचे सर्व तत्कालीन दिग्गज नेते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. खासदार रजनी पाटील, अशोक पाटील, राजकिशोर मोदी, पंडितराव दौंड अशी मोजकी मंडळी काँग्रेसमध्ये थांबली. नंतर आघाडी स्थापन झाल्यानंतर जिल्ह्यातील पाच जागा राष्ट्रवादी काँग्रेसला तर परळीची जागा काँग्रेसला असे. मागच्या निवडणुकीत तत्कालीन विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने ही जागाही आपल्या पदरात पाडून घेतली. आताही या निवडणुकीमध्ये काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष असलेल्या राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी दिली; मात्र ती तुतारी चिन्हाची. त्यामुळे आता विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचे चिन्ह नसणार आहे.




### लक्षवेधी लढत

बीडसह जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील चित्र स्पष्ट झाले आहे. विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून लोकसभा निवडणुकांमधील यशाचा आधार घेत आणि अपयशाला पाठीशी टाकत राज्यात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती यांच्यातच थेट सामना होणार आहे. काही ठिकाणी मनसे आणि वंचितसह इतर पक्षही रिंगणात आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये तीस जागांवर विजय मिळवणारी महाविकास आघाडी तर १७ जागांवर विजय मिळवणाऱ्या महायुतीमध्ये लढाई आहे; मात्र मराठा आरक्षणाचा मुद्दा अद्यापही पूर्णतः निकालात न निघाल्याने मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मराठवाड्यात लोकसभा निवडणुकांमध्ये मनोज जरांगे पाटील इम्पॅक्ट दिसून आला. त्यात, बीड लोकसभा मतदारसंघामध्ये बीडचा खासदार बदलण्यातही मराठा आरक्षणाचा मुद्दा महत्त्वाचा ठरला. त्यामुळे, आता बीड जिल्ह्यातील सहा मतदारसंघांमध्ये काय घडामोडी घडतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरत आहे. जरांगे स्वतः बीड जिल्ह्यातील आहेत. बीड जिल्ह्यामध्ये वंजारी विरुद्ध मराठा असा टोकाचा संघर्ष सुरू आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवारी देतानाही जात या घटकाचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे.

मराठवाड्यातील कायम चर्चेत असणाऱ्या परळीमध्ये यंदा एकूण ११ उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून प्रामुख्याने अजित पवार गटाचे धनंजय मुंडे आणि शरद पवार गटाचे राजेसाहेब देशमुख या दोघांमध्ये प्रमुख लढत होणार आहे. त्यात येथे पवार गटाच्या नेत्याने उमेदवारी न मिळाल्याने नाराजी व्यक्त केली. पवार गटातील वाद इतका उफाळून आला होता, की उमेदवारी न मिळालेल्या नेत्याच्या समर्थकांनी पवार यांचे पोस्टर फाडले. या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रशासनासह पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे. परळी मतदारसंघ हा राज्याच्या राजकारणात पहिल्यापासूनच केंद्रबिंदू राहिलेला आहे. या निवडणुकीत येथील मतदारसंघात पहिल्यांदाच महायुतीमुळे धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे या दोघा बहिण भावात लढत होणार नाही; मात्र राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा सामना रंगणार आहे. परळी मतदारसंघातील १२२ मतदान केंद्र संवेदनशील आहेत आणि याच मतदान केंद्रावर निवडणूक विभागासह पोलिस प्रशासनाची करडी नजर असणार आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान बूथ कॅप्चरिंगचा प्रकार समोर आला होता. विधानसभा निवडणुकीमध्ये हा प्रकार टाळण्यासाठी निवडणूक विभाग सज्ज आहे. संवेदनशील मतदान केंद्रावर सीसीटीव्हीच्या माध्यमातून प्रशासनाची नजर असणार आहे.

बीड जिल्ह्यावर पहिल्यापासून दिवंगत भाजप नेते गोपीनाथ मुंडेंचा दबदबा राहिला आहे, त्यानंतर पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्याकडे जिल्ह्याचे नेतृत्व आले. बीड विधानसभा मतदारसंघामध्ये ओबीसी विरुद्ध मराठा असा सामना पाहायला मिळू शकतो. क्षीरसागर भावांमध्ये लढत होणार असून यात जरांगे फॅक्टरदेखील परिणामकारक ठरू शकतो. जरांगे पाटील यांनी आवाहन करूनदेखील अनिल जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे क्षीरसागर व्यतिरिक्त अनिल जगताप आणि ज्योती मेटे यांचे बंड कायम आहे. जगताप हे शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख आहेत; मात्र पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून त्यांनी बंडखोरी केली.

■■■

# रणभूमी

# मंदा म्हात्रे यांच्यासाठी नाईकांची 'व्यवस्था'!

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे नवी मुंबईतील शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांची बंडखोरी कायम असताना महायुतीत बेलापूर विधानसभेतील राजकीय समीकरणांचा विचार करण्यात आला आहे. बेलापूर मतदारसंघामध्ये भाजप नेते गणेश नाईक यांचे माजी आमदार पुत्र संदीप हे शरद पवार यांच्या पक्षातून निवडणूक रिंगणामध्ये आहेत. संदीप यांचा हा निर्णय भाजपसह शिंदे यांनाही पटलेला नाही. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत मंदा म्हात्रे यांच्यामागे संपूर्ण ताकद उभी करण्याचा निर्णय शिंदे–फडणवीस यांनी घेतला आहे. गणेश नाईक हे ऐरोलीत अडकून पडतील अशी 'व्यवस्था' करण्यात आली आहे.**

शिवसेनेमध्ये बंड झाल्यानंतर विजय चौगुले हे एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले. नवी मुंबईतून शिंदे यांच्या बंडाला साथ देणाऱ्या मोजक्या नेत्यांमध्ये चौगुले यांचा समावेश होता. शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रिपद आणि पुढे शिवसेना हा पक्ष येताच त्यांनी नवी मुंबईतील पक्षाचे जिल्हाध्यक्षपद चौगुले यांच्याकडे सोपवले. सत्तेच्या सावलीत राहणे चौगुले यांच्यासाठीही सोयीचे असल्याने तेही शिंदे यांना घट्ट धरून राहिले. शिंदे यांच्या मदतीने चौगुले यांनी गेल्या पाच वर्षात नवी मुंबईमध्ये आपले आर्थिक साम्राज्यही बऱ्यापैकी उभे केले आहे. मुख्यमंत्र्यांनी मनावर घेतले असते तर त्यांना चौगुले यांचे बंड थोपवणे सहज शक्य होते. यासंबंधी ठाण्यातील काही नेत्यांनी चौगुले यांच्याशी चर्चाही केली; परंतु आपली उमेदवारी मंदा म्हात्रे यांच्यासाठीही कशी सोयीची ठरेल हे पटवून देण्यात चौगुले यशस्वी ठरल्याचे समजते. तसेच 'गणेश नाईक यांनी मुख्यमंत्र्यांकडे विनंती केल्यास मी माघार घेईन', असा निरोपही चौगुले यांनी मुख्यमंत्र्यांकडे पोहचवला होता; मात्र नाईक यांनी या आघाडीवर कोणतीही हालचाल केली नसल्याने चौगुले यांच्यावर मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षित दबाव टाकण्यात आला नाही.




म्हात्रे यांना बेलापूर विधानसभा क्षेत्रातून उमेदवारी देताच संदीप नाईक यांनी बंडाचा निर्णय घेतला. बेलापूर मतदारसंघामधून आपण इच्छुक असल्याचे संदीप यांनी चार महिन्यांपूर्वीच जाहीर केले होते. त्यांनी पक्षाच्या काही नेत्यांपर्यंत 'मला टोकाचा निर्णय घ्यायला भाग पाडू नका' असा निरोपही पोहचवला आहे. 'जिल्हाध्यक्ष म्हणून माझे काम पाहा. हवे तर विद्यमान आमदाराच्या कामाशी त्याची तुलना करा', असेही संदीप यांचे म्हणणे होते. त्यानंतरही भाजपने म्हात्रे यांना उमेदवारी देताच संदीप यांनी शरद पवार यांच्या पक्षाची तुतारी हाती घेण्याचा निर्णय घेतला. या घटनाक्रमामुळे भाजप नेते कमालीचे दुखावले आहेत. ऐरोलीमधून भाजपकडून गणेश नाईक यांनी आपली उमेदवारी कायम ठेवली आहे. राज्यातील सध्याची राजकीय गणिते लक्षात घेता भाजपने त्यास हरकत घेतली नसली, तरी गणेश नाईक ऐरोलीत एक भूमिका घेतात आणि त्यांचा मुलगा याच मतदारसंघाला जोडून असलेल्या दुसऱ्या मतदारसंघामध्ये वेगळी भूमिका घेतो. यामुळे भाजपच्या गोटातही अस्वस्थता आहे. गणेश नाईक यांना ऐरोलीतून निवडणूक अगदीच सोपी झाली, तर त्याचा परिणाम बेलापूरातही दिसू शकेल अशी शक्यता शिंदेसेनेच्या काही नेत्यांनी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घातली होती. 'गणेश नाईकांना मोकळे सोडणे योग्य होणार नाही. शिवाय ते आपल्या पदाधिकाऱ्यांशी साधा संवादही साधू इच्छित नाहीत' असेही मुख्यमंत्र्यांना पटवून देण्यात आले. ऐरोलीमुळे बेलापूरचे गणितही भाजपसाठी कठीण होऊ शकते हे लक्षात येताच म्हात्रे यांच्याशी सल्ला मसलत करुनच पुढील पावले उचलली गेली. बंड केल्याबद्दल चौगुले यांच्यावर थेट कारवाई करण्यात आलेली नाही. भाजप नेत्यांकडून यासाठी फारसा दबाव नाही. नवी मुंबईतील ऐरोली विधानसभा क्षेत्रातील प्रभावी नेते तसेच माजी नगरसेवकांनाही 'चौगुले यांना मदत करू नका' असा कोणताही संदेश दिला गेलेला नाही हे विशेष. ऐरोली मतदारसंघातील बंडाविषयी आतापर्यंत कोणतीही भूमिका घेत नसलेले शिंदेसेनेचे नेते बेलापूरमध्ये मात्र मंदा म्हात्रे यांच्यासाठी जोर बैठका काढण्याची तयारी करत आहेत. ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी बेलापूरच्या मोहिमेवर निघावे आणि तेथील पदाधिकाऱ्यांची स्वतंत्र्य बैठक घ्यावी अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. संदीप नाईक यांच्या उमेदवारीमुळे नाराज असलेल्या महाविकास आघाडीतील नेत्यांना गळाला लावण्यासाठी पक्षाची वरिष्ठ पातळीवरील यंत्रणा कामाला लागल्याचे सांगितले जाते. काँग्रेसचे नवी मुंबईतील जिल्हाध्यक्ष अनिल कौशीक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते राजू शिंदे यांना पक्षात घेताना भाजपच्या ठाणे, डोंबिवलीतील नेत्यांना सक्रिय केले गेल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे, ही मोहीम फत्ते करत असताना बेलापूरच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांनाही दूर ठेवले आहे.

### राज्य वार्तापत्र

भाजप नेत्यांना नवी मुंबईमध्ये गणेश नाईक कुटुंबीयांच्या ताकदीची पूर्णपणे जाणीव आहे. संदीप नाईक यांनी बेलापूरमधून बंडखोरी करत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करताच भाजपच्या या भागातील २५ पेक्षा अधिक नगरसेवकांनीही त्यांच्यासोबत तुतारी हाती घेतली. २०१४ नंतर नवी मुंबईतील काही उपनगरांमध्ये भाजपचा प्रभाव वाढला आहे. वाशी सेक्टर १७ सारख्या गुजरातीबहुल भागामध्ये भाजपला मोठे मताधिक्य मिळते. या भागातील संपत शेवाळे, विजय वाळुंज यासारखे माजी नगरसेवकदेखील संदीप नाईक यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेले. बेलापूर मतदारसंघामध्ये आगरी समाजाचा एक मोठा मतगठ्ठा आहे. या समाजातील एका मोठ्या घटकावर नेरुळ भागातील क्रिकेट मैदानाच्या जागेचे आरक्षण बदलण्यावरुन झालेल्या वादाचा मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भाजपच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांना ही निवडणूक आव्हानात्मक मानली जात आहे. हे लक्षात घेऊन भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी बेलापूरमधील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली असून या भागातील महाविकास आघाडीतील नाराजांना थेट गळाला लावण्याची रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेसचा जिल्हाध्यक्ष हाती लागत असल्याने स्थानिक नेत्यांना याची कल्पना शेवटपर्यंत देण्यात आली नव्हती. अखेरच्या क्षणी उमेदवार मंदा म्हात्रे आणि पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांना या प्रक्रियेची कल्पना दिली गेली. ऐरोली मतदारसंघामधून भाजपच्या तिकीटावर रिंगणात असलेले गणेश नाईक यांना याची कोणतीही खबरबात लागणार नाही याची दक्षता घेतली गेली होती.

■■■

# चौधरींची चौथी पिढी लढतीमध्ये

**जळगाव जिल्ह्यातील रावेर मतदारसंघ वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. काँग्रेसकडून आमदार शिरीष चौधरी यांचे पुत्र धनंजय चौधरी तर, त्यांच्या विरोधात भाजपचे दिवंगत माजी खासदार हरिभाऊ जावळे यांचे पुत्र अमोल जावळे रिंगणात आहेत. काँग्रेस आणि भाजपने रावेरमध्ये प्रथमच चौधरी आणि जावळे परिवाराच्या युवा राजकीय वारसदारांना संधी दिली आहे.**

शिवाय अमोल जावळे यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये रावेरमधून उमेदवारी मागितली होती; मात्र त्या वेळी भाजप पक्षश्रेष्ठींनी विधानसभेच्या उमेदवारीचे आश्वासन देऊन त्यांची समजूत घातली होती. ठरल्यानुसार जावळे यांना भाजपने रावेरमधून विधानसभेसाठी उमेदवारी दिली असून, ते वडिलांच्या निधनानंतर पहिल्यांदा सार्वत्रिक निवडणुकीला सामोरे जात आहेत. अमोल हे भाजपच्या पूर्व भागाचे म्हणजेच रावेर लोकसभा मतदारसंघ क्षेत्राचे जिल्हाध्यक्ष आहेत. त्यामुळे त्यांचा रावेर मतदारसंघामध्ये जनसंपर्क आहे. रावेरमधील २०१९ च्या निवडणुकीत त्यांचे वडील हरिभाऊ जावळे यांना काँग्रेसचे उमेदवार शिरीष चौधरी यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला होता. काँग्रेसचे आमदार शिरीष चौधरी यांनी या वेळी स्वतःसाठी उमेदवारी न मागता पुत्र धनंजय चौधरी यांना पुढे आणले आहे. काँग्रेसनेही धनंजय यांना रावेरची उमेदवारी जाहीर केल्याने चौधरी परिवाराची चौथी पिढी यंदा रावेरच्या राजकारणात सक्रिय झाली आहे; परंतु धनंजय यांच्या उमेदवारीमुळे काँग्रेसचे जुने निष्ठावंत पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. काँग्रेसचे रावेर येथील माजी नगराध्यक्ष दारा मोहंमद यांनी चौधरी परिवारावर घराणेशाहीचा आरोप केला असून, अपक्ष अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे चौधरी परिवारापुढे दारा यांना थोपविण्याचे आव्हान आहे. प्रहार जनशक्ती पक्षातर्फे अनिल चौधरी रिंगणात आहेत. चौधरी यांनी २०१९ ची विधानसभा निवडणूक अपक्ष म्हणून लढवली होती. चुरशीच्या लढतीत त्यांना सुमारे ४४ हजार ८४१ मते मिळाली होती. वंचित बहुजन आघाडीकडून शमिभा पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शमिभा या महाराष्ट्रातील पहिल्या तृतीयपंथी उमेदवार म्हणून निवडणूक लढविणार आहेत. मधुकरराव चौधरी यांच्या पश्चात पाल येथील सातपुडा विकास मंडळासह खिरोदा, फैजपूर येथील



शैक्षणिक संस्था आणि रावेर तालुक्याच्या राजकारणाची धुरा शिरीष चौधरी यांनी खांद्यावर घेतली. शिरीष हे २००९ मध्ये रावेर मतदारसंघातून पहिल्यांदा निवडून गेले. त्यानंतर २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी भाजपचे उमेदवार हरिभाऊ जावळे यांचा पराभव करून रावेर तालुक्यावरील चौधरी परिवाराचे वर्चस्व सिद्ध केले होते.

### जिल्हा वार्तापत्र

तसे बघता, गेल्या वर्षीच एनएसयुआयच्या प्रदेश सरचिटणीसपदी निवड झाल्यानंतर धनंजय हे रावेरच्या राजकारणात सक्रिय झाले होते. काही महिन्यांपूर्वी दिवंगत मधुकरराव चौधरी यांच्या कृतज्ञता सोहळ्याच्या निमित्ताने आमदार शिरीष यांनी काँग्रेसमध्ये धनंजय यांना पुढे आणले होते. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात आणि सतेज पाटील हेही त्या वेळी उपस्थित होते.

चौधरी परिवाराच्या चौथ्या पिढीची राजकारणातील सुरुवात कशी होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. जळगाव जिल्ह्यातील रावेर हा विधानसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो; मात्र मागच्या पंचवार्षिकमध्ये या ठिकाणी काँग्रेसने बाजी मारली होती. काँग्रेसचे विद्यमान आमदार शिरीष या ठिकाणी विजयी झाले होते. नवयुवक आणि प्रथमच विधानसभा निवडणूक लढणार आहेत. धनंजय यांना रावेर विधानसभेत यश मिळते का ते बघणे महत्त्वाचे ठरणार आहे. माजी खासदार भाजपचे निष्ठावंत स्व हरिभाऊ जावळे यांच्या मुलाच्या हातात भाजपने उमेदवारी दिली आहे. अमोल हे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्यांना लोकसभेसाठी उमेदवारी हवी होती; मात्र पक्षाने त्यांना थांबवून विधानसभेसाठी आता उमेदवारी दिली आहे. हरिभाऊंचा मतदारसंघावर मोठा प्रभाव आहे. त्यांच्या स्वर्गवासानंतर मुलाने ही जबाबदारी सांभाळली आहे. रावेर मतदारसंघात पाटील समाजाचे सर्वाधिक वर्चस्व आहे. त्यानंतर आदिवासी आणि मुस्लिम समाज या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आहे. चौरंगी लढतीमध्ये चौधरी जागा टिकवतात की जावळे पराभवाचा वचपा काढतात, हे पाहायचे.

■■■

## भाजपाची रंगीबेरंगी खेळी

विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी भाजपा हर तऱ्हेने प्रयत्न करताना दिसतो आहे. पक्षाने यावेळी 'कलरकोड प्लॅन'ची वेगळी रणनीती आखली आहे. त्यानुसार भाजपने जिंकण्याची सर्वाधिक शक्यता, मध्यम शक्यता आणि अतिशय कमी शक्यता याआधारे मतदारसंघांना अनुक्रमे पिवळे, हिरवे आणि लाल असे रंग निश्चित केले आहेत. पिवळे मतदारसंघ हिरवे कसे होतील तसेच लाल मतदारसंघ पिवळ्या रंगात परावर्तीत होतील, याकडे लक्ष दिले जात आहे.



प्रत्येक मतदारसंघात नेमकी कशी परिस्थिती आहे, तिथल्या नागरी समस्या काय आहेत, त्यावर काय तोडगा काढायला हवा याचा आढावा भाजपच्या स्थानिक नेत्यांना या प्रणाली अंतर्गत सादर केला जात आहे. ज्या मतदारसंघात स्थिती वाईट आहे, तिथे सुधारणा करण्यासाठी आवश्यक पावले टाकण्यावर भर दिला जात आहे. या मतदारसंघातील रंगबदलाकडे दररोज लक्ष दिले जात असून पिवळे मतदारसंघ हिरवे आणि लाल मतदारसंघ पिवळे करण्यासाठी काम केले जात आहे. या माहितीला खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच दुजोरा दिला आहे. एकूणच भाजपामध्ये आता रंगारंग कार्यक्रम चालू झाला आहे हे नक्की. आता त्याला कसे यश मिळते याची सगळ्यांनाच उत्सुकता आहे.

■■■

## निवडणुकीच्या रिंगणात एकाच घरातले चार उमेदवार

नंदुरबारमधल्या गावित कुटुंबाचे नाव मोठे आहे. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यात चार विधानसभा मतदारसंघ आहेत. या प्रत्येक विधानसभा मतदारसंघात मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या परिवाराचा एक सदस्य उमेदवारी करीत असून, सर्वजण प्रमुख शर्यतीत आहेत असे म्हणायला हरकत नाही. एकाच परिवारतलेभाऊ भाऊ आणि मुलगी या निवडणुकीत उभे असल्याचे आश्चर्य पाहायला मिळते आहे. मंत्री



डॉ. विजयकुमार गावित भाजपकडून, त्यांचे एक बंधू भरत गावित काँग्रेसकडून तर दुसरे बंधु शरद गावित अपक्ष उमेदवार म्हणून उभे आहेत. त्यातच डॉक्टर हीना गावित यांनीदेखील महायुतीबरोबर बंडखोरी करून अपक्ष उमेदवार म्हणून उभ्या आहेत. कुणीही हरले तरी पद घरातच राहणार हे नक्की असल्यामुळे या घरगुती लढतींची राज्यभरात चर्चा रंगत आहे.

■■■

## खरी लढत आदित्य आणि राज ठाकरे यांच्यातच

एकीकडे उंच इमारती आणि दुसऱ्या बाजूला चाली आणि मध्यमवर्गीयांच्या चाळी. हा मतदारसंघ नेहमीच सर्वच राजकीय पक्षांसाठी महत्वाचा राहिला आहे. मागच्या विधानसभा निवडणुकीत तर युवराज आदित्य ठाकरे यांच्यासाठी या मतदारसंघाची निवड झाली होती. तेव्हा शिवसेना एकाच होती. त्यांनी सारे बळ आदित्यच्या पाठीशी उभे केले होते. पुतण्याला विरोध करायचा नाही या प्रामाणिक भावनेने तेव्हा राज ठाकरेंच्या



'मनसे'नेही तिथे आदित्यच्या विरोधात उनेदवार दिला नव्हता. पण या वेळी सगळी गणिते बदलली आहेत. राज ठाकरेंनी नात्यांचे बांध तोडून आदित्याच्या विरोधात उमेदवार उभा केला आहे. मनसेचे संदीप देशपांडे आदित्याच्या विरोधात दंड थोपटून उभे आहेत. त्यातच कोंग्रेसच्या मुरली देवरांचे पुत्र मिलिंद देवराही आपले नशीब अजमावणार आहेत.

■■■

# संविधान बचाव, महाराष्ट्र बचाव' या अभियानांतर्गत

## प्रा. श्याम मानव यांची नागपूर येथे ११ नोव्हेंबरला संविधानावर सभा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

९ नोव्हेंबर पोलीस प्रशासनाने प्रा. श्याम मानव यांच्या सभांवरील बंदी हटविल्यानंतर उद्या सोमवार दि. 11 नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वा. विनोबा विचार केंद्र, धरमपेठ, नागपूर इथे 'संविधान बचाव, महाराष्ट्र बचाव' या अभियानांतर्गत 'संविधान' अर्बन नक्षलवादी या विषयावर मानव यांचे व्याख्यान होणार आहे.



अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झूरमुरे यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने मानव यांनी 'संविधान बचाव, महाराष्ट्र बचाव' या अभियाना अंतर्गत महाराष्ट्रात तीस सभा यशस्वीपाने पूर्ण केल्यात. मात्र, नागपूरला दक्षिण पश्चिम विधानसभा मतदार संघात निवडणूक आयोग आणि पोलीस प्रशासनाने मानव यांच्या सभांवर बंदी आणली. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशा आयोजकांना नोटीस बजावण्यात आल्यात.

नागपूरमधील सामाजिक संस्थांनी यावर आवाज उठविल्यानंतर पोलिसांनी नमते घेत या सभांना परवानगी दिली आहे. बंदी हटविल्यानंतर पहिली सभा विनोबा विचार केंद्रात पार पडत आहे. या सभेच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी लीलाताई चितळे आणि प्रमुख उपस्थिती प्राध्यापक शरद पाटील यांची राहणार आहे.

ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या अरुणा सबाने यांनी सभेची पार्श्वभूमी विशद केली. या सभेचे आयोजन अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती, दक्षिणायन, हम भारत के लोग, माहेर संस्था, प्रगतिशील लेखक संघ, आकांक्षा प्रकाशन, फेडरेशन ऑफ ऑर्गनायझेशन फॉर सोशल जस्टिस सेक्युलॅरिझम अँड डेमोक्रसी, रिपब्लिकन विचार मंच, सामाजिक व आर्थिक समता संघ यांनी केले असल्याची माहिती अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नागपूर जिल्हा अध्यक्ष सुनील वंजारी यांनी दिली आहे.

पत्रकार परिषदेला समितीचे राष्ट्रीय महासचिव हरीश देशमुख, हरिभाऊ पाथोडे, प्रशांत सपाटे, राजू वानखेडे, डॉ. प्रमोद मुनघाटे, सुधांशु मोहोड, विजय बोरके, संजय मुरे. उत्तम सुळ्कें, श्रावण खुदरे, एम, ही पारधे आदी उपस्थित होते.

# उज्ज्वल गौरक्षण ट्रस्टतर्फे आज गोपाष्टमी मेळाव्याचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

उज्ज्वल गौरक्षण ट्रस्ट गेल्या ३० वर्षांपासून गायींची सेवा करत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही उज्ज्वल गौरक्षण ट्रस्टतर्फे गोपाष्टमी मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार 10 नोव्हेंबर रोजी दुपारी 12 ते 2 या वेळेत बहादूरा गाव, उमरेड रोड, दिघोरी नाका, नागपूर येथे या जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

मेळ्याचे उद्घाटन करण्यासाठी प्रमुख पाहुणे कॉन्फिडन्स पेट्रोलियमचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक नितीन खरा यांच्या हस्ते होणार आहे. विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध समाजसेवक बी.के.अग्रवाल (सी.ए.), सामाजिक कार्यकर्ते व व्यापारी अरविंद कोटेचा, नवीन किराणा बाजार कलमानाचे समन्वयक हरीश कृष्णानी, सुप्रसिद्ध कापड व्यापारी रघुनंदन पुन्यानी यांना आमंत्रित करण्यात आले आहे.

गोपाष्टमीच्या जत्रेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तुला दान, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, छप्पन भोग दर्शन व इतर कार्यक्रम हे या जत्रेचे विशेष आकर्षण असणार आहेत. तुला दानमध्ये आपल्या किंवा आपल्या प्रिय व्यक्तीच्या वजनाएवढा चारा, गूळ, गहू, बाजरी इत्यादी गुरांसाठी दान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मेळ्यादरम्यान गोपाळकृष्ण मंदिरात दुपारी १२ वाजता छप्पन भोग दर्शनाला सुरुवात होईल. मेळ्यात आयोजित फॅन्सी ड्रेस स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व मुलांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जाणार आहेत.

जत्रेत गाई मातेसाठी छप्पन भोगाचे दर्शन, गोवर्धन पर्वताची सुंदर झांकी आणि भाविकांसाठी प्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. त्याच दिवशी सकाळी 10-30 वाजता उज्ज्वल गाय संरक्षण न्यासाची वार्षिक सर्वसाधारण सभाही आयोजित करण्यात आली आहे. ट्रस्टचे अध्यक्ष महेंद्र कटारिया, खजिनदार सीए कैलाश जोगाणी, सरचिटणीस भारतभूषण मदन यांनी वर्षभरात ट्रस्टला देणगी देणाऱ्या देणगीदारांचे अभिनंदन करून कृतज्ञता व्यक्त केली.

# पोलीस आयुक्तांनी केली संवेदनशिल भागाची पाहणी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

विधानसभा निवडणुक बघता पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी आज शहरातील संवेदनशील भागांची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. यावेळी त्यांनी महत्त्वाच्या क्रिटिकल बूथ व आजूबाजूच्या वस्तीतील संवेदनशील ठिकाणांना भेट दिली. पोलिस आयुक्तांनी हसनबाग परिसरातील कादरिया हायस्कूल व राजेंद्र या क्रिटिकल बूथ्सना अचानक भेट दिली. त्यांनी या बूथच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. संबंधित पोलिस ठाण्यांच्या निरीक्षकांकडून निवडणुकीच्या अनुषंगाने सुरक्षेच्या पूर्वतयारीसाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या, याबद्दल तपशीलवार माहिती घेतली.

नंतर त्यांनी भरतवाडा रोड व मिनीमाता नगर परिसरात मोबाईल सर्वेलन्स व्हॅनच्या सहाय्याने ड्रोनद्वारे निवडणुकीच्या अनुषंगाने सुरू असलेल्या निगराणी प्रकियेची पाहणी परिमंडळ पाचचे पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी ड्रोनच्या माध्यमातून परिसरातील वस्ती, गदीर्ची ठिकाणे, नियमन, समाजकंटकांच्या हालचाली व निवडणूक प्रचाराच्या अनुषंगाने पोलिस पेट्रोलिंग कसे चालू आहे, याबद्दल सविस्तर माहिती दिली.

मिनीमाता नगरातील महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत असलेल्या क्रिटिकल बूथलाही आयुक्तांनी भेट दिली. त्या ठिकाणी केलेल्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला व निवडणूक पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या. पोलिस आयुक्तांनी या भेटीदरम्यान पोलिस बंदोबस्त ठेवण्यासह, गस्त आणि वाहतूक नियमनासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबवा, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष लक्ष द्या, समाजकंटक तसेच सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवा, असे निर्देशही रवींद्र सिंगल यांनी दिले.

# एसटी बँकेच्या कर्मचाऱ्यांवर लाखोंची खैरात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

स्टेट ट्रान्सपोर्ट को- ऑप (एसटी) बँकेच्या कर्मचाऱ्यांवर अवाजवी खर्च व उधळपट्टी केली जात आहे. मात्र बँकेच्या सभासदाना अजूनही लाभांश मिळला नाही. त्यामुळे बँकेच्या संचालक मंडळाने स्वतःहून जबाबदारी स्वीकारून पदावरून पायउतार व्हावे, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे. या प्रकरणावर त्यांनी आणखी माहिती दिली.

बँकेचे ६२ हजार सभासद व ५० शाखा असून ४ हजार कोटींची वार्षिक उलाढाल आहे. बँकेच्या संचालक मंडळाने बरेच वादग्रस्त व बँक आर्थिक अडचणीत येईल असे अनेक निर्णय घेतले आहे. दरम्यान बँकेच्या सभासदांना दर वर्षी वार्षिक सर्व साधारण सभेनंतर लगेचच लाभांश मिळतो.

यंदा सभा होऊन दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी झाल्यावरही लाभांश नाही. बँकेच्या कर्मचाऱ्यांवर मात्र अवाजवी लाखो रुपयांची खैरात केली जात आहे.

बँकेत नियम डावलून भरती केली असून तात्पुरत्या स्वरूपात घेतलेल्या हंगामी कामगारांना सुद्धा बोनस बेकायदेशीररित्या दिला गेला. बँकेत जे कायम कर्मचारी आहेत त्यांना बोनस देण्यास हरकत नाही, पण जे कर्मचारी अधिकृत नाहीत. त्यांना बोनस देणे चुकीचे आहे. कुठल्याही संस्थेत बोनस वर्षभर काम केल्या नंतर दिला जातो. पण इथे ज्यांनी एक महिना काम केले, या तात्पुरत्या स्वरूपातील कर्मचाऱ्यांनाही बोनस दिला गेला.

जे तात्पुरते कामावर आहेत त्यांना पूर्ण दिवसाचा बोनस का दिला जातोय? या मागील गौड बंगाल काय आहे? हे पैसे खरोखरच त्यांना दिले जात आहेत का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले असून या सर्व प्रकरणाची सहकार खात्याने चौकशी करावी व नुसता पत्रव्यवहार करून दिखाऊपणा न करता तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणीही बरगे केली आहे.

बँकेतील बेकायदेशीर भरती, बेकायदेशीर व्यवहार, संचालक मंडळाकडून होणारी अनियमितता या बाबतीत अनेक सभासद व बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनेने सहकार खात्याकडे केलेल्या तक्रारीवर सहकार खात्याकडून चौकशी करण्यात आली. त्यानंतर हे निर्णय चुकीचे असल्याचे सिद्ध झाल्यानंतर संचालक मंडळाने घेतलेले बेकायदेशीर निर्णय रद्द करण्याबाबतची पत्रे बँकेच्या पदसिद्ध अध्यक्षांकडे कारवाईसाठी पाठवली.

या प्रकरणामुळे सहकार खात्याने दिलेल्या निर्णय घेण्यात कुचराई करीत असतील तर बँकेच्या हितासाठी सहकार खात्याने किंवा रिझर्व्ह बँकेने स्वतःहून हस्तक्षेप करून दोषींवर कारवाई करावी, असेही बरगे म्हणाले.

# श्री गजानन महाराजांची पायदळ दिंडी यात्रा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :




शहरातील सर्व श्री गजानन महाराज भक्तांना कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा संत गजानन महाराज यांची पायी दिंडी यात्रा रविवार दि. १० नोव्हेंबरला श्री संत गजानन महाराज मंदीर, निर्मल नगरी, उमरेड रोड, नागपूर येथून सकाळी ६.०० वाजता निघेल. महालक्ष्मी जगदंबा माता मंदिर कोराडी येथे जाणार आहे. या करिता सर्व भक्तांना विनंती करण्यात येते की, दिंडी यात्रेत सहभागी होवून श्रीं चा कृपाप्रसाद प्राप्त करावा. सर्व श्री भक्तांकरिता दुपारी २.०० वाजेपासून महालक्ष्मी जगदंबा मातेच्या मंदिरात महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. श्री भक्तांनी याचा लाभ घ्यावा अशी विनंती आहे. दिंडी यात्रेचा मार्ग असा राहील.

निर्मल नगरी, उमरेड रोड - सक्करदरा चौक -बसस्टॅन्ड - कॉटन मार्केट -चौक -लोहापुल - -गणेश टेकडी एन.आय.टी.चौक -सदर रेसीडेन्सी रोड -छावनी - पागलखाना चौक -मानकापूर - झिंगाबाई टाकळी -महादुला - कोराडी. या दिंडीत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## साहित्य संमेलन आणि सत्कार सोहळा साजरा

नागपूर : जिवलग समूह तर्फे टिळक पत्रकार भवन येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात साहित्य संमेलनात छोट्याशा चिमुकलीने आंब्याच्या बनात या गाण्यावर अतिशय सुंदर नृत्य केले. जिवलग सारखा समूह असावा, मनी प्रेम व जिव्हाळा असावा हे ध्येय लक्षात घेऊनच साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष पुरुषोत्तम पटेल व प्रमुख अतिथी पाहुणे पुष्पा भोसले यांची मंचावर उपस्थितीत होती. या साहित्य संमेलनात २२ ते २५ महिलांनी सहभाग घेतला होता.

# २० .७५० किलो गांजासह दोघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभाग (एसएसबी)ने गोपनिय माहितीवरून सापळा रचत अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या दोन आरोपींना अटक केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून 20 किलो 750 ग्रॅम गांजासह 4 लाखांहून अधिकचा माल जप्त केला. मो. असलम मो. मूनवर (41) रा. कावरापेठ आणि फैजल मो. अफजल (34) रा. मुंब्रा, ठाणे अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास एसएसबीचे पथक कळमना पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. दरम्यान दोनजण चिखली चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याने गांजाची तस्करी करणार असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी एनआयटी हॉट प्लांटजवळ सापळा रचला. सकाळी 5.30 वाजताच्या सुमारास असलम आणि फैजल संशयास्पदरित्या जाताना दिसले. दोघांनाही ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्यांच्याजवळ 3,73,500 रुपये किंमतीचा 20 किलो 750 ग्रॅम गांजा मिळाला. पोलिसांनी गांजा आणि मोबाईलसह एकूण 4 लाख 500 रुपयांचा माल जप्त करीत दोघांनाही अटक केली. सखोल चौकशीत आरोपींनी यशोधरानगर परिसरात राहणाऱ्या मनीष आणि अमीना यांच्या मदतीने धंदा करीत असल्याची माहिती दिली. पोलिसांनी चारहीविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

# सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे अश्वगंधा मोहीम आणि रोपांचे वाटप

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :




मेहमुदा शिक्षण आणि महिला ग्रामीण विकास बहुदेशीय शिक्षण संस्थेच्या सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसी लोनारा नागपूर यांच्या वतीने यशवंत शैक्षणिक संकुल खैरुल उलूम हायस्कूल आणि मंत्रालयाच्या कनिष्ठ महाविद्यालय पारबहनी यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्र इंडिया येथे अश्वगंधा मोहीम व रोप वाटपाचे आयोजन करण्यात आले होते.

उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. शेख रफीक यांच्या सहकार्याने स्थापन केलेल्या संघाने केले. मोहिमेचा मुख्य उद्देश अश्वगंधा वनस्पतीचे महत्त्व आणि औषधी उपयोग आणि त्याची लागवड याबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. परभणी जिल्ह्यातील विद्यार्थी व स्थानिकांना अश्वगंधा रोपांची एकूण 2000 रोपे व पत्रके वाटप अध्यक्ष व टीम सदस्यांच्या हस्ते करण्यात आली. सह-पीआय सुश्री इफ्तेशाम अन्सारी (सहाय्यक प्राध्यापक) यांनी उपस्थितांना औषधी उपयोग, रासायनिक निदेशांक, लागवड आणि वनस्पतीचे संकलन याबद्दल थोडक्यात माहिती दिली. अन्सारी स्थानिकांना आणि शेतकऱ्यांना दिलेल्या वनस्पतीची शेती करण्यास प्रवृत्त करतात आणि विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये माहिती पोचवण्यासाठी प्रोत्साहित करतात.

याच कार्यक्रमात डॉ. सय्यद सजाउद्दीन गुलाब (प्राचार्य) आणि त्यांची टीम कु. इफ्तेशाम अन्सारी (सहाय्यक प्राध्यापक), कु. मसरत अली (एचओडी) कु. राणी रोडे (व्याख्याता) या प्रकल्पासाठी सह-पीआय म्हणून कार्यरत आहेत. सर्व अध्यापक, प्राचार्य, सचिव, स्थानिकांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता कु. इफ्तेशाम अन्सारी यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

# सकल सोनार समाज महासंघातर्फे भाजपाला जाहीर समर्थन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :



.सकल सोनार समाज नागपूर च्यावतीने विधानसभा २०२४ च्या टिकीट वाटपानंतर सोनार समाजात असंतोषाचे स्वर भाजपा विरोधात वातावरण बनविण्याचा प्रयत्न सुरु होता. अपूर्ण आर्थिक विकास महामंडळ, समाजभवन व सोनार समाजाला जाणीवपूर्वक राजनितीक प्रतिनिधित्व न मिळत असल्यामुळे समाजात सत्ताधारी पक्षाची नाराजी व्यक्त करीत होते. यांचे संज्ञान घेवून स्वतः देवेन्द्र फडणवीस यांनी सकल सोनार समाजाच्या संयोजकांना बैठकीचे आमंत्रण दिले. बैठकीला उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी सोनार समाजाची समस्या ऐकून घेतली व समस्यांचा निराकरण करण्याची हमी दिली. याप्रसंगी सकल सोनार समाजाच्या वतीने बैठकीकरीता सर्वश्री बाबारावजी पाटणे, दत्तराजजी श्रीरंग, राजाभाऊ साऊरकर, सुरज ढोमणे, धर्मेन्द्र पाचकवडे, चंद्रशेखर म्हसकर, राहुल आसरे, अनिलदादा धरमठोक, विवेक डुमरे, निलेश सातफळे, दिपक उज्जैनकर, मयुर मांगलकर, रोशन काटोले, बबलु तारेकर, प्रमोद तिनखेडे, उल्लास खेडकर, प्रशांत डुंभरे, चेतन मस्के, प्रदिप विंचुरकर, सागर खापेकर, प्रणय मांगलकर, आशिष पांढरे, अजय खरवडे, प्रशांत उरकुडे उपस्थित होते.

समर्थनार्थ स्वर्णकार विकास संघ, माळवी सुवर्णकार समाज, भारतीय सुवर्णकार समाज, महाराष्ट्र स्वर्णकार संस्था, स्वजातीय वैश्य सुवर्णकार समाज, महाराष्ट्र वैश्य संघ, सोनी समाज मित्र मंडळ, लाड सोनार समाज, स्वर्णकार एकता स्वर्णकार व्यवसायिक बहुउद्देशिय संस्था, स्वर्णकार, महिला स्वर्णकार महिला बहुउद्देशिय संस्था यांनी पत्र दिले.

# १.५२ लाखाचा प्रतिबंधित तंबाखू जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

गुन्हे शाखा युनिट 2च्या पथकाने गोपनिय माहितीवरून धाड टाकत प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व पान मसालासह 1 लाख 52 हजार 938 रुपयांचा माल जप्त केला. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून एका आरोपीला अटक केली. गजानन डोमाजी बदखल (56) रा. विद्यानगर, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

मध्यरात्रीला युनिट 2 चे पथक नंदनवन ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान शक्तीमातानगरातील प्लॉट क्र. 2225/26 ए येथे मोठ्या प्रमाणात विविध फ्लेव्हरचा प्रतिबंधित तंबाखू व पानमसाला विक्रीसाठी साठवून ठेवला असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीवरून पथकाने परिसरात सापळा रचून तेथे धाड टाकली. आरोपी गजानन हा 1,52,938 रुपये किंमतीचा सुगंधित तंबाखू आणि पान मसालासह तेथे मिळाला. पोलिसांनी सर्व माल जप्त करून गजाननला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून अटक केली. पुढील कार्यवाहीसाठी गजाननला मालासह नंदनवन पोलिसांच्या स्वाधिन केले.

# मतदार आणि उमेदवारांकरिता विविध ॲप्लिकेशन्स

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

भारत निवडणूक आयोगाने मतदार आणि उमेदवारांकरिता सी-व्हिजिल, सुविधा ॲप, ॲफिडेविट पोर्टल, व्होटर टर्नआऊट ॲप, व्होटर हेल्पलाइन ॲप, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांकरिता सक्षम ॲप, केवायसी ॲप आणि 1950 क्रमांकाची हेल्पलाईन आदी आयटी ॲप्लिकेशन्सच्या माध्यमातून सुविधा दिल्या आहेत, त्यांची थोडक्यात माहिती...

**सी-व्हिजिल :** सी-व्हिजिल हे ॲप हे आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्याकरिता एक अभिनव असे मोबाइल ॲप्लिकेशन आहे. ज्याद्वारे प्रत्येक नागरिकाला निवडणुकीच्या वेळी आपल्या स्मार्टफोनचा उपयोग करून छायाचित्रे, श्राव्य, किंवा हक चित्रण अपलोड करता येते. सी-व्हिजिलचा अर्थ ह्यसतर्क नागरिक असा आहे. या ॲपच्या माध्यमातून तक्रार दाखल झाल्यानंतर आचारसंहिता उल्लंघन झाल्याचे ठिकाण शोधण्यासाठी जी.पी.एस.चा उपयोग करता येतो.तक्रारीच्या स्थितीचा मागोवा घेवून 100 मिनिटांत स्थितीची माहिती देते. सी-व्हिजिल ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक. गुगल प्लेस्टोअरमध्ये ॲप्लिकेशन आहे.

**सुविधा ॲप 2.0 :** भारत निवडणूक आयोगाने 'सुविधा 2.0' हे मोबाईल ॲप अद्ययावत केले असून याद्वारे उमेदवार आणि पक्षांना आता कोणत्याही ठिकाणाहून सहजपणे निवडणूक मोहिमेच्या परवानग्या ऑनलाईन सुविधेद्वारे मिळणार आहे. सुविधा 2.0 हे मोबाईल ॲप वापरण्यास सहज आणि अधिक सुरक्षित आहे.

या ॲपच्या खास वैशिष्ट्यांमध्ये उमेदवारांना अर्ज डाउनलोड करणे, प्रचारासंदभार्तील परवानग्या मागवणे, अर्ज केलेल्या परवानगी संदर्भात सद्यस्थिती जाणून घेणे आणि मंजुरीची प्रत डाउनलोड करणे आदी बाबी समाविष्ट आहे. त्याचबरोबर या ॲपमध्ये नामनिर्देशन प्रक्रिया, निवडणूक वेळापत्रक आणि निवडणूक आयोगाच्या ताज्या अद्ययावत सूचना व आदेश देखील उपलब्ध असतील.

**ॲफिडेविट पोर्टल :** ॲफिडेविट पोर्टल निवडणुकीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशनाची संपूर्ण यादी पाहता येते. कोणताही नागरिक ॲफिडेविट पोर्टलचा उपयोग करून उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र पाहू शकतो व डाउनलोड ही करू शकतो. नागरिकांच्या सुविधेसाठी नामांकन दाखल, स्वीकारले, नाकारले, मागे घेतले, उमेदवार स्पर्धेत आहे याची माहिती मिळते.

**व्होटर टर्न आऊट ॲप :** प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघासाठी अंदाजित मतदानाच्या टक्केवारीची दर दोन तासांनी माहिती देते. हे ॲप्लिकेशन फक्त विधानसभा, लोकसभा आणि पोटनिवडणुकीच्या वेळी सक्रिय होते. व्होटर टर्नआऊट ॲपमध्ये प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघाची अंदाजित मतदान टक्केवारी दाखवते.भारत निवडणूक आयोगाच्या सर्व्हर वरून रिअल-टाइम डेटाचा उपयोग करण्यात येतो. निवडणूक प्रकार, राज्य, जिल्हा आणि मतदारसंघानुसार यामध्ये मतदानाच्या टक्केवारीची माहिती मिळते.एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील मतदानाचा अंदाज मिळवण्याचा हा एक जलद आणि सोपा असा पर्याय आहे

**व्होटर हेल्पलाइन ॲप :** मतदारांना आपले मतदार यादीत नाव आहे याची माहिती व्होटर हेल्पलाईन ॲप मध्ये मिळते. हे ॲप प्रत्येकासाठी अधिक सोयीस्कर आणि महत्त्वाचे आहेत. व्होटर हेल्पलाईन ॲपमध्ये मतदारयादीत नावाची शहानिशा करणे,नवीन मतदार नोंदणीसाठी ऑनलाइन अर्ज सादर करणे, दुस-या मतदारसंघात स्थलांतरित करणे,परदेशात राहणारे मतदार, मतदारयादीतील नाव हटवणे किंवा आक्षेप घेणे,नोंदींची दुरुस्त करणे,तुमच्या क्षेत्रातील निवडणुकीचे वेळापत्रक शोधणे, सर्व उमेदवार त्यांचे प्रोफाइल, उत्पन्न विवरण, मालमत्ता, गुन्हेगारी प्रकरणे शोधणे, बीएलओ, ईआरओ, डीईओ आणि सीईओ यांची माहिती मिळवता येते व संपर्क साधता येतो

**सक्षम ॲप :** भारतीय निवडणूक आयोग दिव्यांग नागरिकांसाठी (पीडब्ल्यूडी) मतदार ओळख आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याकरिता हे ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. निवडणूक संदर्भात सेवा घेण्याकरिता दिव्यांग व वयोवृद्ध मतदारांनी त्यांचे नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक इ. माहिती ॲपमध्ये भरावी.

दिव्यांग व वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांना या सक्षम ॲपद्वारे मतदानाच्या दिवशी मतदानासाठी लागणाऱ्या सहाय्यतेची मागणी नोंदविता येईल, त्याद्वारे दिव्यांग आणि वयोवृद्ध मतदारांना त्यांच्या मतदानाचे मतदारसंघ व स्थान निश्चिती यंत्रणेला करणे शक्य होईल. या ॲपद्वारे नोंदणी झाल्यानंतर दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहतूक व्यवस्था, व्हीलचेअर, सहाय्यक, मदतनीस इ. प्रकारची सुविधा या ॲपच्या माध्यमातून मिळणार आहेत.

सक्षम ॲपमध्ये अनेक सुविधा प्रदान करण्यात आल्या आहेत. या ॲपमध्ये मोठे फॉन्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट रंग असल्यामुळे दिव्यांगासाठी वापर करणे सोपे होईल. यामध्ये मतदान केंद्राबद्दल माहिती उपलब्ध असून ज्यामध्ये आपले मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्र, उपलब्ध प्रवेश योग्यता आणि अधिकारी संपर्क या तपशिलाचा समावेश आहे. दिव्यांगांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या कोणत्याही समस्येबद्दल ॲपवर तक्रार नोंदविता येणार आहे.

**केवायसी ॲप :** मतदारांना त्यांच्या उमेदवारांबाबतचा तपशील त्यामध्ये त्यांच्या नावे असलेल्या गुन्ह्यांचा तपशील, उमेदवाराची माहिती इत्यादी पाहता येऊ शकते.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SUJATA AMAR SAHAJRAMANI.** NOW MY NEW NAME IS **SUJATA AMARLAL SAHAJRAMANI.**
**ADD :** PLOT NO. 16 SINDHU NAGAR SOCIETY JARIPATKA NAGPUR 440014

# डिजिटल अटकेची बोगसगिरी

अनोळखी नंबरवरून व्हिडिओ कॉल. उचलताच समोर दिसतो पोलिसांच्या गणवेशातील एक व्यक्ती. मागच्या भिंतीवर महापुरुषांची छायाचित्रे. हे पाहून कॉल रिसिव्ह करणारी व्यक्ती घाबरून जाते आणि प्रश्न पडतो... मी अशी कोणती चूक केली की पोलिसांनी फोन केला? डिजिटल अटक करणारे दरोडेखोर याचाच फायदा घेतात. हे दरोडेखोर पोलीस अधिकारी म्हणून लोकांना घाबरवतात आणि त्यांना अनेक तास घरात कोंडून राहण्यास भाग पाडतात. त्यांना देशद्रोही, दहशतवादी, बलात्कारी ठरवून लाखो, करोडो रुपये लुटतात. लूटीच्या या नवीन धंद्याला देशात ऊत आला असून, शेकडो लोकं याला बळी पडले आहेत.



**डिजीटली अटक म्हणजे काय?**
सायबर फसवणुकीची ही एक नवीन पद्धत आहे. आरोपी व्हॉट्सॲप किंवा इतर कोणत्याही माध्यमातून व्हिडिओ कॉल करतात. ते पोलिसांच्या गणवेशात असतात किंवा स्वतःला सीबीआय अधिकारी म्हणवतात. पार्श्वभूमीत तुम्हाला पोलिस स्टेशनचा संपूर्ण सेटअप दिसतो.

दरोडेखोर तुम्हाला आश्वासन देतात की ते तुमच्यावरील आरोपांचा ऑनलाइन निपटारा करू. यावर पीडिताला वाटते की या तावडीतून आपली सुटका होईल. तुमच्या खात्यातून दहशतवाद्यांना पैसे दिल्याचे खोटे पुरावे देऊन ते तुम्हाला घाबरवतात. विमानतळावर सापडलेल्या तुमच्या नावाच्या पार्सलमध्ये ड्रग्ज आहेत. मनी लाँड्रिंगच्या नावानेही भीती दाखवतात.

ते व्हिडिओ कॉलद्वारे पीडितावर नजर ठेवतात आणि त्याला हलूही देत नाहीत. जसजसे तुम्ही घाबरू लागाल तसतसा ठगांचा आवाज मोठा होतो.

तुम्हाला या प्रकरणात अडकवण्याच्या धमक्या दिल्या जातात. तपासाच्या नावाने तुम्हाला व्हॉट्सॲपवर पत्र पाठवले जाते. तुम्हाला सांगितले जाते की तुमच्या खात्यातील सर्व पैसे सरकारी एजन्सीच्या गुप्त खात्यांमध्ये हस्तांतरित केले जात आहेत. तपासानंतर हे पैसे परत केले जातील. दोन-तीन तास पैसे ट्रान्सफर केल्यानंतरही तुम्हाला कॅमेऱ्यासमोर बसायला भाग पाडतात. यामुळे तुमच्या खात्यातून ट्रान्सफर केलेले पैसे वेगवेगळ्या खात्यांमध्ये ट्रान्सफर करून काढण्यासाठी त्यांना वेळ मिळतो.

**पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केला तर त्याची प्रक्रिया काय?**
पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार पोलिस तपास आणि चौकशीची प्रक्रिया सुरू आहे. पोलिसांसमोर कोणतेही प्रकरण आले की प्रथम एफआयआर नोंदवला जातो. त्याची एक प्रत तक्रारदाराला आणि एक प्रत आरोपीला दिली जाते. तुमच्यावर केस असल्याचे सांगतात. चौकशीसाठीही आधी आरोपीला नोटीस पाठवली जाते आणि त्याला पोलिस ठाण्यात जबाब देण्यासाठी तारीख दिली जाते. कोणताही जबाब ऑनलाइन घेतला जात नाही.

अटक करायची असेल तर पोलीस त्याला आधी अटक करत नाहीत. पोलीस ठाण्यात त्याचा जबाब घेतल्यानंतर पोलिस त्याला कोठडीत ठेवतात आणि नंतर अटक करतात. अटकेनंतर ही माहिती कुटुंबीयांना दिली जाते. त्याला कोणत्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे, हे सांगण्यात येते. त्याला 24 तासांत न्यायालयात हजर केले जाते.

**सापळ्यापासून वाचण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी?**
तुमच्या मोबाईलवर येणारी कोणतीही अनोळखी लिंक उघडू नये.
तुमची वैयक्तिक माहिती तुमच्या सोशल मीडिया अकाउंटवर अपलोड करू नका.
तुम्ही तुमच्याशी संबंधित कोणतीही माहिती अज्ञात लिंकवर अपलोड करू नये.
बँकेचा क्रेडिट स्कोअर जाणून घेण्यासाठी लिंकवर क्लिक करणे टाळावे. येथे लोक पॅन आणि आधार कार्डची संपूर्ण माहिती टाकतात. यामुळे तुमचा सर्व महत्त्वाचा आणि गोपनीय डेटा फसवणूक करणाऱ्यांपर्यंत पोहोचतो.
कोणत्याही व्यक्तीच्या किंवा अधिकाऱ्याच्या विनंतीवरून तुम्ही तुमच्या खात्याची माहिती किंवा डळ्ढ शेअर करू नये.
जर तुम्हाला सिम बंद किंवा पार्सलसारखे कॉल आले तर समजा की ही फसवणूक आहे. कोणतीही टेलिकॉम कंपनी किंवा एजन्सी फोनवर चौकशी करत नाही.
जर कोणी पोलीस अधिकारी म्हणून तुमच्याशी बोलत असेल तर तुम्हाला घाबरण्याची गरज नाही. पोलिस किंवा कोणत्याही सुरक्षा एजन्सीद्वारे तपास ऑनलाइन किंवा व्हिडिओद्वारे केला जात नाही.
जर पैशांशी संबंधित काही प्रकरण असेल तर पोलिस तुमची खाती गोठवतील किंवा तुमच्या खात्यातील पैसे इतर कोणत्याही खात्यात हस्तांतरित करणार नाहीत.
जर तुमची डिजिटल पद्धतीने अटक झाली असेल आणि तुमची फसवणूक झाली असेल, तर तुम्ही ताबडतोब जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार करा.

**हे नेटवर्क कसे कार्य करते?**
हे गुंड वेगवेगळ्या राज्यांतून आपले नेटवर्क चालवतात. ते वेगवेगळ्या माध्यमातून हायप्रोफाईल लोकांचे मोबाईल नंबर आणि वैयक्तिक डेटा गोळा करतात. आणखी एक टीम आहे जी फसवणुकीचे पैसे खर्च करण्यासाठी काम करते. हे वेगवेगळ्या शहरांतील बेरोजगार तरुणांचा शोध घेते, ज्यांचे खाते भाड्याने घेतले जाऊ शकते.

त्यामुळे डिजीटली अटक केल्याचे कुणी सांगत असेल तर सावध रहा.

●●●●●●●●●

# मुलांनो मैदानात या!

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे.

कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे.

दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय.

पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या भोवरे विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही.

भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटीच्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे.

या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

●●●●●●

# जागरुक मतदार हाच लोकशाहीचा आधार!

१८५७ ते १९४७ या नव्वद वर्षांच्या स्वतंत्र्याच्या चळवळीमध्ये लाखो लोकांनी आपल्या प्राणाचं बलिदान केलं. जेलमध्ये जाऊन, भूमिगत राहून, अनंत हाल अपेष्टा सहन करून स्वातंत्र्य मिळवून दिलं. २६ जानेवारी १९५० साली आम्ही देशात पहिला प्रजासत्ताक दिन साजरा केला. या देशात प्रजेची सत्ता आली. प्रजा या देशाची मालक झाली. मतदार या देशाचा राजा झाला. सरकारी तिजोरी ही जनतेची झाली आहे. या जनतेच्या तिजोरीतील जमा होणाऱ्या पैशांचे योग्य प्रकारे नियोजन करण्यासाठी नागरिकांना घटनेने दिलेले अधिकार मिळवून देण्यासाठी त्याचप्रमाणे माहितीच्या अधिकाराप्रमाणे जनतेच्या हाती अधिकार देणारे कायदे करण्यासाठी घटनेप्रमाणे प्रत्येक मतदाराने आपले प्रतिनिधी म्हणून, आपले सेवक म्हणून लोकशाहीच्या पवित्र मंदिरामध्ये पाठवायचे आहे. प्रजासत्ताक झाल्यानंतर देशात निवडणुका होत आहेत. देशाच्या राज्याच्या उज्वल भविष्यासाठी प्रामाणिकपणे जनतेची सेवा करणाऱ्या चारित्र्यशील उमेदवाराला निवडून लोकसभेचे विधानसभेचे पवित्र मंदिरामध्ये पाठविणे ही मतदारांची भूमिका लोकशाहीसाठी महत्वाची आहे.

**गजानन हरणे**
**संयोजक, निर्भय बनो जन आंदोलन, महाराष्ट्र राज्य, अकोला.**
**9822942623**

स्वातंत्र्याच्या 75 वर्षांमध्ये मागे वळून या लोकशाहीच्या पवित्र मंदिराचे अवलोकन केले तर भ्रष्टाचारी, गुंड, व्यभिचारी, दहशतवादी, लुटार अशी माणसं पैशांच्या जोरावर, गुंडगिरीच्या जोरावर या लोकशाहीच्या पवित्र मंदिरामध्ये शिरु पाहत आहेत. दिवसेंदिवस राजकारणातील गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. हा लोकशाहीला गंभीर धोका आहे. दिल्ली ,मुंबईमध्ये पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी दोन वेळा दहशत निर्माण केली असता सर्व देश हादरला होता. जगामध्ये त्याचे पंडसाद उमटले होते.

आज देशात राज्यात वेगवेगळ्या पक्ष आणि पाट्यांच्या राजकारणी गुंड प्रवृत्तीच्या काही लोकांनी दहशत निर्माण करुन संबंध गावालाच वेठीला धरल्याचे उदाहरण अधिकांश शहरात दिसते आहे. त्यांच्या गुंडगिरी, दहशतवादा संबंधाने एखादा नागरिक निर्भय होऊन पोलीस स्टेशनला तक्रार करायला गेला तर मंत्रालयातून फोन येतो तो आमचा कार्यकर्ता आहे, काही करायचं नाही. हा दहशतवाद पाकिस्तानच्या दहशतवादापेक्षा गंभीर आहे. या शहरातील, देशातील दहशतवादाला वेळीच आळा बसला नाही तर लोकशाहीच धोक्यात येईल व इंग्रजांपेक्षाही अधिक अन्यायकारक अशी हुकूमशाही येईल.

अशा या दहशतवादाला मतदारच आळा घालू शकतो. त्यासाठी कोणत्याही आमिषाला बळी न पडता निर्भयपणे चारित्र्यशील उमेदवारालाच आपले मत देणे आवश्यक आहे. विशेषतः युवाशक्ती ही या देशाची राष्ट्रशक्ती आहे. सामाजिक आणि राष्ट्रीयत्वाचाय भावनेने युवाशक्ती जागृत झाली तर समाज, राज्य, राष्ट्राचे उज्वल भविष्य दूर नाही. देशाच्या असणाऱ्या लोकसंख्येपैकी ६०% युवाशक्ती आहे. युवकांनी ठरविले तर भ्रष्ट, गुंड, व्यभिचारी, लुटारु, दहशतवादी अशा बेईमान उमेदवाराला विधानसभा लोकसभा सारख्या पवित्र मंदिरामध्ये जाण्यापासून युवक मतदार रोखू शकतो याचा आम्हाला विश्वास वाटतो. येणाऱ्या निवडणुकीमध्ये मतदारांनी, युवकांनी शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरु सारख्या शहीदांचे स्मरण ठेवून निर्भयपणे चारित्र्यशील उमेदवाराला मतदान करुन बेईमान, भ्रष्ट, गुंड, लुटारु, दहशतवादी उमेदवाराला लोकशाहीच्या पवित्र मंदिरामध्ये जाण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला तरी मोठी देशसेवा होऊ शकेल.

आपल्या देशात लोकशाही असली तरी आपण शांतपणे विचार केला तर असे दिसून येईल की पूर्वी आम्ही राजे, महाराजे यांचे गुलाम राहिलो. पुढे इंग्रजांनी आम्हाला गुलामीत रोखले आणि आज आम्ही काही राजकारणी घराणे असलेल्या नेत्याचे गुलाम झालो आहोत, गुलामगिरी करण्यासाठी निवडणुकीमध्ये काही उमेदवार पाण्यासारखा पैसा खर्च करीत आहोत आणि आम्हाला यांच्या गुलामगिरीमध्ये ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. या गुलामीच्या बेड्या तोडण्यासाठी मतदारांनी विचारपूर्वक निर्भय होवून चारित्र्यशील उमेदवाराला मतदान करण्याची गरज आहे.

आज आमचे राज्य आणि देश भ्रष्टाचाराच्या दलदलीमध्ये गळ्यापर्यंत असल्याचे जाणवत आहे.
सतेसाठी हपापाचे..
*वाटेल जैसे पाप करावे*
*जनशक्तीस पायी तुडवावे*
*ऐसे चाले स्वाथार्साठी.. स्वप्नपूर्तीसाठी।*

माझ्या एका मतानेच या राज्याचे, राष्ट्राचे समाजाचे नवनिर्माण होणार आहे. असा विचार मतदार करीत नाही. नवरा सांगतो म्हणून, पत्नी त्या उमेदवाराला मत देते किंवा पत्नी सांगते म्हणून नवरा मत देतो, मित्र सांगतो म्हणून मत देतो, कुटुंब प्रमुख सांगतो म्हणून त्या कुटुंबातील इतर मतदार करतात. अशा अमेदवारांपासून सावध रहा.
दुर्जर होतील शिरजोर।
आपुल्या माताथा मिळता आधार।
सर्व जनतेला करतील जर्जर!
न देता शतपात्री मतदान।।

लोकशाहीत राज्य लोकांचे, सत्ता मतदारांची, जनतेच्या कल्याणासाठी राबवायच आहे. अशा या भ्रष्टाचाराची सुरुवात ही निवडणुकीपासूनचं होत असते, कोणत्याही आमिषाला बळी न पडता मतदान करणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षात सत्ता मिळविण्यासाठी राजकारण्यांची काहीही करण्याची प्रवृत्ती बळावली आहे. त्यामुळे राजकारणातील गुन्हेगारी वाढत असून गरीबी, बेरोजगारी, पाण्याचा प्रश्न, शेतकऱ्यांचे मूलभूत प्रश्न, शैक्षणिक क्षेत्राचे बाजारीकरण अशा मूलभूत प्रश्नांकडे म्हणावे तसे लक्ष ट्रिले गेले नाही. ही बाब राजकीय आणि राष्ट्रीय दृष्टीने फारच हानीकारक आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात राजकारणातील गुन्हेगारी वाढते आहे, ही बाब लोकशाहीला धोकादायक आहे. राजकारणातील या गुन्हेगारीला असे आम्ही मतदारही जबाबदार आहोत असं म्हटलं तर वावगे होणार नाही. माझं मत ज्या लाखो लोकांनी स्वातंत्र्यासाठी बनिदान केले त्यांच्या साठिच. पैसे पार्टी देऊन, दारुची मटणाची पार्टी घेऊन मत देतो, इतरांचे बळी पडून मत देतो हा फार मोठा धोका आहे शे पाचशे रुपये अनेक अमिषाचा लोकशाहीला मोठा धोका आहे.

भ्रष्ट, गुंड, व्यभिचारी, लुटारु, दहशतवादी यांना आपणच निवडून देऊन लोकशाही भ्रष्ट करण्याची वाट मोकळी करून देतो आणि नंतर सरकारच्या नावाने बोटे मोडीत बसतो. स्वराज्याचे सुराज्यात परिवर्तन घडवून आणण्याची शक्ती प्रत्येक मतदाराच्या मतामध्ये आहे, म्हणून मतदाराने निर्भय बनुन निर्भयपणे स्वच्छ चारित्र्यशील उमेदवारालाच मतदान करणे अवश्य आहे.

आजपर्यंत काही चुकीच्या उमेदवाराला मतदान केल्यामुळे देशावर, राज्यांवर, जनतेंवर हिमालयासारखा कर्जाचा डोंगर झाला आहे. घेतलेल्या कर्जाचे व्याज भरण्यासाठी पैसे नाहीत म्हणून पुन्हा कर्ज घेऊन व्याज भरावे लागत आहे, प्रत्येक कुटुंबात मूल जन्माला येतानांच त्याच्यावर कर्जाचे गाठोडे डोक्यावर घेऊन जन्माला येत आहे. हे कर्ज त्यांनाच फेडावे लागणार आहे. काय दोष आहे त्या मुलांचा? आम्ही चुकीच्या माणसाला केलेल्या मतदानाचा हा दुष्परिणाम आहे.

निवडणुकीमध्ये होणाऱ्या मतदानाचा विचार केला तर लोकशाहीच्या दृष्टीने चिंता निर्माण करणारी बाब आहे. एकूण होणारे मतदान है ५०% ते ५५% वर आले आहे. त्यात अवघ्या २२% ते २५% मतावर निवडून आलेले उमेदवार आम्हा १००% जनतेवर राज्य करीत असतील तर ही खऱ्या अथार्ने लोकशाही म्हणता येणार नाही. २२ ते २५% मते मिळविण्यासाठी काही उमेदवार पैशांचे वाटप करतात. दारु, साडी, चोळी, इतर वस्तूंचे आमिष देऊन, वेळ प्रसंगी दहशत निर्माण करून निवडून येतात हा लोकशाहीला गंभीर धोका आहे.

मतदान करणे हे एक राष्ट्रीय कर्तव्य समजून प्रत्येक मतदाराने आपलं मताचा हक्क बजावणे ही सुदृढ आणि निकोप लोकशाहीसाठी अत्यंत महत्वाची बाब आहे. एक पक्ष सत्तेवर नाही आणि जेव्हा वेगवेगळ्या पक्षांचे लोक एकत्र येऊन सरकार बनविले जाते, अशा सरकारमध्ये एक दुसऱ्याला सांभाळण्यात अधिक वेळ जातो, एवढेच नाही तर भ्रष्टाचाराला अधिक वाव मिळतो.

मतदारांनी पक्ष आणि पार्टी न पाहता चारित्र्यशील उमेदवारालाच मत द्यावे, ज्या उमेदवाराला आपले अमूल्य असे मत द्यायचे आहे तो उमेदवार निवडून आल्यानंतर सत्ताधाऱ्यांमध्ये बसेल अथवा विरोधी पक्षामध्ये बसेल, पण निवडून दिलेला उमेदवार चारित्रंशील असल्याने देशाच्या सभागृहाचे पावित्र्य कायम राखण्यासाठी मदत होऊ शकेल. दिवसेंदिवस असे चारित्र्यशील उमेदवार सापडणे अवघड झाले असले, तरी त्यातल्या त्यात जो विचाराने बरा आहे. सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. त्यावृत्तीचा निस्वार्थी पण्याचा अशा उमेदवारालाच मतदान करणे आवश्यक आहे.

***रात्र वैऱ्याची आहे।।***
***मतदार राजा जागा रहा।।***

●●●●●●●●●

## कार्तिक मासाचे महत्व

**वाचक लिहितात**

दिवाळीच्या दुसऱ्या दिवसापासून कार्तिक महिना सुरू होतो. विष्णुपुराणात भगवान विष्णूंनी श्री ब्रम्ह देवांना आणि ब्रम्ह देवा नी श्री नारदमुनींना कार्तिक मासाचे महत्व सांगितले आहे. श्रीकृष्णाला सर्वाधिक प्रिय असा हा महिना आहे. या महिन्यात ब्रम्हामुहूर्तावर उठून कार्तिक स्नान करतात. नदीवर स्नान करणे आणि दीपदान करणे याला कार्तिक मासात विशेष महत्त्वाचे मानतात.

या महिन्यात एकादशीला श्री विष्णू योगनिद्रेतून जागे होतात. या महिन्यात आवळा, चिंच, बोर ही फळे-रानमेवा यांची सुरुवात होते. पारिजातक बहरलेला असतो. तुळशीवृंदावन मंजिरी असलेल्या तुळशीने शोभून दिसते. हे सगळ विविध पूजेच्या वेळी भगवंताला अर्पण करतात. आवळी अष्टमीला आवळ्याच्या झाडाचे पूजन करून त्याच्या खाली सगळे मिळून सहभोजन करतात.वैकुंठ चतुर्दशी ला हरिहराची भेट होते. केवळ याचदिवशी श्री विष्णूला बेल आणि श्री शिवशंकर यांना तुळस वाहतात. श्रीकृष्णाला प्रिय असलेल्या तुळशीचा बाळ कृष्णासोबत विवाह करतात. त्या नंतर विवाह मुहूर्त आरंभ होतात.

कार्तिक पौर्णिमेला भगवान शिवाने महापराक्रमी दैत्य त्रिपुरासुराचा वध करून देवांना आणि सृष्टीला त्याच्या जाचातून मुक्तकेले त्याचे प्रतिक म्हणून या दिवशी त्रिपुर जाळून आणि काकडा लावून आरती करतात.

भगवान श्री विष्णू बळी राज्यातून आपल्या मूळस्थानी याच काळात येतात. तो आनंद व्यक्त करण्यासाठी कार्तिक एकादशी ते कार्तिकी पौर्णिमा हे पाच दिवस देवदिवाळी साजरी करतात. नदीत दिवे दान करून निसर्ग आणि देवता यांविषयी कृतज्ञता व्यक्त करतात. कार्तिक मासातील विविध व्रते आणि उपासना केल्याने महापातकी व्यक्तीचा सुद्धा उद्धार होतो, असे म्हणतात. व्रतस्त राहिल्याने जिवाच्या मन, बुध्दी आणि शरीराची शुद्धी होते. शास्त्र जाणून प्रत्येक कृती भावपूर्ण करू या. आणि भगवंताची कृपया संपादन करु या.

**● सौ. पल्लवी देशपांडे, दुर्ग (छत्तीसगढ)**

# ब्लड शुगर? करा घरगुती उपाय!



अनियमित दिनचर्या, असंतुलित खाणे आणि व्यायामाचा अभाव यामुळे लोकांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. मधुमेह हा आजार लाखो लोकांच्या जीवनावर परिणाम करतो. त्यामुळे तुम्हाला तुमचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी रक्तातील साखर नियंत्रित ठेवणे फार महत्त्वाचे असते. जर ती सातत्याने वाढत असेल तर त्याचा तुमच्या शरीरातील किडनीवर आणि हृदयावर नकारात्मक परिणाम होतो.

**दररोज व्यायाम करा :** तुम्ही जर नियमित व्यायाम केला तर तुमची रक्तातील साखर नक्कीच नियंत्रणात राहील. व्यायाम केल्याने स्नायूंमध्ये ग्लुकोजचे प्रमाण वाढते आणि रक्तातील साखरेची पातळी कमी होते.

**फायबरयुक्त पदार्थांचे सेवन करा :** फायबर हे रक्तातील साखरेची पातळी राखून ठेवण्यास मदत करते. आपल्या आहारात फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करा. हिरव्या भाज्या, फळे आणि शेंगदाणे यांचे भरपूर प्रमाणात सेवन करा यामुळे साखरेची पातळी कमी होते.

**भरपूर पाणी प्या :** पाण्याच्या कमतरतेमुळे रक्तातील साखरेची पातळी वाढते. हे टाळण्यासाठी दिवसभरात किमान तीन ते चार लीटर पाणी प्यावे. कारण किडनी हे अतिरिक्त साखर बाहेर काढून टाकण्यास मदत करते.

**पुरेशी झोप घ्या :** आरोग्यासाठी चांगली झोप खूप महत्त्वाची आहे. खरं तर झोपेच्या कमतरतेमुळे सुद्धा रक्तातील साखरेच्या पातळी वाढ होते. त्यामुळे दररोज सात ते आठ तासांची झोप घेणे आवश्यक आहे.

**ताण घेऊ नका :** ताणतणावाचा थेट परिणाम आपल्या रक्तातील साखरेवर होतो. ताणतणावातून सुटका मिळवायची असेल, तर रोज मेडिटेशन आणि योगा करावा. यामुळे तुम्ही तणावापासून मुक्त व्हाल. तुम्हाला आतून ताजेपणा जाणवेल.

**वजन नियंत्रणात ठेवा :** रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी वजन नियंत्रित ठेवणे हा एक महत्त्वाचा भाग आहे. निरोगी आहार आणि नियमित व्यायामाने आपले वजन नियंत्रित करा. यामुळे तुम्हाला मधुमेहाचा त्रास होणार नाही.

●●●●●

# शेतीच्या उत्पन्नावर भारतात इन्कमटॅक्स लागतो का?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**

**प्रश्न –** अलीकडील काळात मोठमोठे व्यापारी, राजकारणी तथा कारखानदार हे इन्कमटॅक्स वाचवण्यासाठी शेती खरेदी करतात, असे बोलले जाते, हे खरे आहे का?

■ होय, व्यवहारात असेच बोलले जाते, ते काही अंशी खरे ही आहे. परंतु शेती शिवाय इतर उत्पन्न असतेच, आणि या मुळे, शेतीवर पूर्ण टॅक्स माफ मिळतोच असे नाही. या बद्दल आपण पुढे सविस्तर बघणार आहोत.

**प्रश्न –** शेतीवर टॅक्स लागतो का?

■ शेतीवर दोन प्रकारचे टॅक्स लागतात. त्यास सोप्याभाषेत आपण असे म्हणू शकतो की पहिल्या प्रकारास शेतीच्या उत्पन्नावर टॅक्स असते तर दुस?या प्रकारात शेतीच्या होल्डींगवर म्हणजेच शेती या मालमत्ते वर टॅक्स लागतो.

**प्रश्न –** या दोन प्रकारच्या टॅक्समध्ये महत्त्वाचे फरक काय?

■ शेतीच्या उत्पनावर जे टॅक्स लावले जाते त्यास भारत सरकार लावते. तर राज्य सरकार म्हणजे महाराष्ट्र सरकार लावते. त्या टॅक्स ला आपण सोप्या बोलचाली भाषेत शेतसारा म्हणतो. हे टॅक्स उत्पनावर नसते. आपण भारत सरकारच्या इन्कमटॅक्सबद्दल सविस्तर चर्चा करणार आहेत.

**प्रश्न –** शेतीच्या उत्पनावर इन्कमटॅक्स लागतो का?

■ इन्कमटॅक्स कायदा 1961 प्रमाणे जर करदात्यास फक्त शेतीचेच उत्पन्न असेल तर इन्कमटॅक्स लागणार नाही. परंतु जर करदात्यास किंवा जनतेस नुसते शेतीचेच उत्पन्न नसून इतर उत्पन्नही असेल तर मात्र शेती चे उत्पन्न हे दर म्हणजेच रेट ठरवण्यासाठी जोडले जाते. याचाच सोप्या भाषेत अर्थ असा की शेती शिवाय इतर उत्पन्न असेल तर मात्र शेतीवर काही प्रमाणात इन्कमटॅक्स व्यवहारात द्यावा लागेल.




अर्थसंकल्प 2013 च्या अर्थसंकल्पात शेतीचे उत्पन्न आणि शेती म्हणजे काय? या बद्दल सुधारण करण्यात आलेली आहे,

**प्रश्न –** रामराव यांना निव्वळ शेतीचे उत्पन्न एक कोटी रु. वार्षिक आहे. तर त्यांना इन्कमटॅक्स किती भरावे लागेल?

■ येथे रामराव यांना एक कोटी रु. वार्षिक उत्पन्न आहे. परंतु हे उत्पन्न फक्त आणि फक्त शेती पासूनच असल्यामुळे त्यांना एक रुपया सुद्धा इन्कमटॅक्स लागणार नाही. याचे कारण संपुर्ण उत्पन्न हे निव्वळ शेती पासून मिळालेले उत्पन्न आहे. अर्थातच हे उत्पन्न शेतीच्या कायदेशीर परिभाषेत बसलेले असावे.

**प्रश्न –** वरील प्रश्नात जर रामराव यांना शेती व्यतिरिक्त इतर ही उत्पन्न राहिले असते तर इन्कमटॅक्स लागतो का?

■ होय, इतर उत्पन्न किती आहे, या वर इन्कमटॅक्स लागतो. शेती चे उत्पन्न हे रेट परपजसाठी जोडले जातात. भारतात फक्त निव्वळ शेतीचेच उत्पन्न असेल तर करदाता हा झिरो टॅक्स मध्ये येतो अन्यथा त्याला काही प्रमाणात इन्कमटॅक्स द्यावा लागतो.

पुढील लेखापासून आपण बघणार आहोत की इन्कमटॅक्स कायद्यात शेती चे उत्पन्न म्हणजे नेमके काय? ठेक्याने शेती केल्यास शेती चे उत्पन्न धरले जाते का किंवा करदात्यास स्वतःची शेती घेणेच आवश्यक आहे का? शेती चा कायदेशीर अर्थ काय आहे? शेती विकल्यानंतर शेतकऱ्यास इन्कमटॅक्स सरकारला द्यावा लागतो का? सरकार कंपल्सरी एक्वीजीशन मध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी घेतात व बदल्यात चांगला मोबदला देतात, त्याच्यावर टॅक्स लागतो का? तसेच फॉरेनमध्ये भारतीय करदात्यांची शेती असेल तर तेथील उत्पन्नावर इन्कमटॅक्स माफ असतो का? अशा अनेक व्यवहारिक प्रश्नांची उत्तरे सोप्या भाषेतील प्रश्नोतर रुपात बघणार आहोत.

## अशोकायन

### उघडा डोळे पहा निट..!

निवडून येताच
नेत्यांची संपत्ती
कोट्यवधीने वाढते
सांगा बरं हे
कोणते उद्योगधंदे करते ?

मतदारांचेही उत्पन्न
त्या प्रमाणात वाढायला
पाहिजे की नाई ?
फुकट वाटप हा
त्यावरचा उपाय नाई..

दिशाहीन ऊधळण करुन
जे शासनाची तिजोरी
करतात रिती
त्यांच्या हाती सत्ता देणारे
मतदार सुज्ञ किती?



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# दिवाळी नंतर आपले शरीर कसे डीटॉक्स करावे

## स्वाती अवस्थी, चीफ डायटीशियन, वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूर



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ०९ :
भारतात बहुप्रतिक्षित आणि मोठ्या प्रमाणावर साजरा होणार सण म्हणजे दिवाळी. रोषणाईल, पणत्या, फटाके आणि खाद्यपदार्थांचे या सणात खास आकर्षण असते. विशेषतः यात मिठाई, चकली, मूठभर चिवडा आणि तोंडभर लाडू यावर यथेच्छ ताव मारला जातो. दिपावलीचा हा मुख्य सण नुकताच संपला आहे. त्यामुळे मागचा आठवडा आनंददायी वातावरणासोबतच चविष्ट पदार्थांच्या गोडवा देऊन गेला आहे. पार्ट्या, कौटुंबिक मेळावे, मित्र-मंडळीची मौजमजा आणि उत्सवांनी सण साजरा करून झाला आहे.
दिवाळी सणाच्या काळात फोडले जाणारे फटाके, धूर, वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण, तळलेले पदार्थ आणि मिठाई खाल्ल्याने उष्मांकाने भरलेल्या अन्नपदार्थांमुळे शरीर आणि मन आळसावले असते. वर्षातून एकदा हा आनंद लुटणे योग्य असले तरी, आता शरीराला आवश्यक विश्रांती देण्याची वेळ आली आहे. आहारातील अतिरिक्त साखरेमुळे संप्रेरक (हार्मोन्स) असंतुलन, रक्तातील साखर आणि रक्तदाब वाढून, मूड बदलणे, अपचनासारखे त्रास होण्याची शक्यता वाढली आहे. सणासुदीच्या काळात अनेकदा गोड आणि तळलेले खाद्यपदार्थ खाण्याचीही तीव्र इच्छा होत असेल. याला कसे सामोरे जाल ? सणाच्या वेळी आणि उत्सव संपल्यानंतर आपण जे खातो, त्याचे कसे संतुलन राखतो, याचा आरोग्यावर प्रत्यक्षात फरक पडू शकतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, शरीरात जमा झालेली अतिरिक्त साखर आणि चरबीपासून शरीर डिटॉक्स करू शकणाऱ्या सोप्या पद्धतींचे पालन केल्याने तुम्ही वजनावर नियंत्रण ठेवू शकता. सक्रियतेतून शरीराला पुन्हा आरोग्याकडे परत नेण्यासाठी आणि ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी उत्सवानंतर डिटॉक्स त्यामुळेच महत्वाचे असते. हे केवळ विशिष्ट अन्न खाणे अथवा शरीराची उपासमार करण्यापूरते मर्यादित नाही.

# श्रीराम सुपर आणि ३०३ गहू बियाण्यांमुळे शेतकऱ्यांना उत्तम परिणाम



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ०९ :
महाराष्ट्रात गहू पिकात श्रीराम फार्म सोल्यूशन्सद्वारे विकसित श्रीराम सुपर १--४आणि श्रीराम सुपर ३०३ गहू बियाण्यांनी उल्लेखनीय बदल घडवून आणला आहे. या प्रगत प्रकारांनी शेतकऱ्यांमध्ये उच्च उत्पन्न, रोग प्रतिकारशक्ती आणि विविध हवामान परिस्थितींमध्ये अनुकूलता यांसाठी प्रसिद्धी मिळवली आहे.
श्रीराम फार्म सोल्यूशन्सचे जागतिक कीर्तीचे गहू वैज्ञानिकांनी तयार केलेले गहू प्रकार, श्रीराम सुपर १--४आणि ३०३, यांची अनुकूलता क्षमता आणि उत्कृष्ट उत्पादकतेमुळे शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. याचे दाणे मोठे, कठीण आणि चमकदार आहेत, तसेच याच्या गव्हापासून बनलेली पोळी उच्च गुणवत्तेची असते. आणि सर्वात विशेष बाब म्हणजे बदलत्या नैसर्गिक परिस्थितीत येणाऱ्या नवीन आव्हानांमध्येही या प्रकारांचे परिणाम उत्कृष्ट आहेत. याच वैशिष्ट्यांमुळे हे दोन्ही प्रकार भारताच्या विविध भागांतील शेतकऱ्यांची पहिली पसंती बनले आहेत. पुण्याच्या एका अनुभवी महिला शेतकरी संतोष रुपनार यांनी गेल्या वर्षी आपल्या शेतात श्रीराम सुपर १-४१ गहू बियाण्याची पेरणी केली होती. त्यांचे म्हणणे आहे की, इतर प्रकारांच्या तुलनेत श्रीराम सुपर मध्ये लांब बाली, अधिक काळे आणि प्रति बाली दाण्यांची संख्या जास्त होती, तसेच श्रीराम ला कमी पाण्याची आवश्यकता भासली. त्या इतर शेतकऱ्यांनाही श्रीराम सुपरलावण्याचा सल्ला देतात. तसेच श्रीरामद्वारे बाजारात उपलब्ध असलेल्या श्रीराम सुपर ३०३ या प्रकारामुळेसुद्धा शेतकरी खूप आनंदी आहेत व उत्कृष्ट परिणाम मिळवत आहेत.

# 'ठुकरा के मेरा प्यार' मध्ये निस्सीम प्रेम आणि सूडाची गाथा अनुभवण्यास सज्ज

## डिस्नी+ हॉटस्टारवर नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणारी सिरीज



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ०९ :
विश्वासघात आणि सूड यांच्यात गुंफलेली अतूट प्रेम व उत्कट इच्छेची एपिक गाथा डिस्नी+ हॉटस्टारच्या 'ठुकरा के मेरा प्यार' मध्ये रोमांसला नव्या उंचीवर घेऊन जाण्यास सज्ज आहे. ही सिरीज जटिल पात्र व हृदयस्पर्शी कथानकाला सादर करते, जेथे नियती अखेर कुलदीप (धवल ठाकूर) आणि शन्विका (संचिता बासू) यांचे भविष्य ठरवते. उत्तर प्रदेशच्या पार्श्वभूमीवर स्थित या सिरीजचे कथानक प्रेमात आकंठ बुडालेल्या दोन किशोरवयीनांच्या जीवनाला दाखवते, जेथे ते जात व पंथाच्या आव्हानांचा सामना करतात. बॉम्बे शो स्टुडिओज एलएलपी निर्मित आणि श्रद्धा पासी जयरथ दिग्दर्शित सिरीज 'ठुकरा के मेरा प्यार' मध्ये उदयोन्मुख नवोदित कलाकार धवल ठाकूर व संचिता बासू यांच्यासह गोविंद पांडे प्रमुख भूमिकेत आहेत.
या सिरीजच्या दिग्दर्शक श्रद्धा पासी जयरथ म्हणाल्या, '''ठुकरा के मेरा प्यार' प्रेमकथा असण्यासोबत विश्वासघात, पूर्वाग्रह आणि मानवी भावनेच्या गुंतागूंतींना देखील सादर करते. कॉलेजमधील क्लासिक रोमांसमध्ये आधुनिक पैलूची भर करण्याचा आमचा मनसुबा होता. धवल व संचिता यांसारख्या प्रतिभावान कलाकारांसह आम्ही आशा करतो की प्रेक्षक हा क्लासिक रोमांस पाहण्याचा आनंद घेतील. मी ही संधी देण्यासाठी डिस्नी+ हॉटस्टारचे आभार व्यक्त करते आणि प्रेक्षकांची या सिरीजप्रती प्रतिक्रिया जाणून घेण्यास उत्सुक आहे.'' या सिरीजमध्ये कुलदीपची भूमिका साकारणारे धवल ठाकूर म्हणाले, ''कुलदीपच्या गुंतागूंतींना व्यापून घेताना मला त्याचे पैलू समजले, ज्यामुळे या भूमिकेमध्ये सामावून जाण्यास मदत झाली. मी कथानक, दिग्दर्शन व प्रक्रियेवर विश्वास ठेवला, ज्यामुळे मला पात्राच्या प्रवासामध्ये सामावून जाता आले. अभिनेता म्हणून हा अनुभव समाधानकारक ठरला.

# माणसाची प्रगती केवळ विज्ञानाधारित!

## (१० नोव्हेंबर-आंतरराष्ट्रीय विज्ञान दिन सप्ताह विशेष)

सद्याचे युग हे विज्ञानाचे युग आहे. त्यामुळे विज्ञानाच्या मदतीने दररोज नवनवे शोध लागत असतात. या शोधांचे महत्त्व आणि त्याचा उपयोग जगातील प्रत्येक व्यक्तीला कळावे, यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ, सांस्कृतिक, वैज्ञानिक, शौक्षणिक संघटनेने नोव्हेंबर हा दिवस जागतिक विज्ञान दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरवले. भारतात फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ.सि.व्ही.रमन यांनी आपले शोध सन साली जगापुढे मांडले. म्हणून त्या निमित्ताने फेब्रुवारीला भारतात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा केला जातो. जगात अनेक ठिकाणी या दिवशी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. सन साली आंतराष्ट्रीय स्तरावर हंगेरिच्या बुडापेस्ट शहरात सर्व प्रथम संयुक्त राष्ट्रसंघाकडून वैज्ञानिक दिन आयोजित करण्यात आला. यानंतर व्यापक स्वरुपात जागतिक स्तरावर सन पासून वैज्ञानिक दिवस साजरा करायला सुरवात झाली. श्रीकृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा मार्गदर्शक संकलित लेख अभ्यासुया
संपादक.
भारतरत्न सी.व्ही.रमन प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि देशाचे विज्ञान तंत्रज्ञान मंत्री डॉ.वसंत गोवारीकर यांनी विज्ञान जनजागृतीपर अनेक योजना सुरु केल्या. तसेच वैज्ञानिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल नोबेल पुरस्कार विजेते भारतातील एकमेव व्यक्ती सी.व्ही रामन यांच्या स्मृती प्रित्यर्थ भारतात राष्ट्रीय विज्ञान दिवसाला सुरवात झाली. जागतिक स्तरावर विज्ञान दिवस सुरू होण्याआधी भारतात राष्ट्रीय स्तरावर याची सुरूवात झाली होती हे महत्वाचे. शांती व विकासासाठी विज्ञानाचे महत्त्व हा सगळ्या मागचा हेतू आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय ? तर कुठल्याही घटितामागचा कार्यकारणभाव समजून घेणे किंवा दोन घटनांमधील परस्परसंबंध तपासून पाहणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणता येईल. अशी एकदम साधी-सोपीव्याख्या करता येईल किंवा असेही म्हणता येईल, की जेवढा पुरावा उपलब्ध आहे, तेवढाच विश्वास ठेवणे. एखादी गोष्ट सत्य आहे की नाही यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे निरीक्षण, तर्क, अनुमान, प्रचिती आणि प्रयोग या मार्गांनी ज्ञान आत्मसात करण्याची विज्ञानाची ही पद्धत आहे-१) जगात सुष्ट शक्तिमुळे चांगले आणि दुष्ट शक्तिमुळे वाईट घडते, असे अजिबात होत नाही. जे काही घडते, त्यामागे निश्चितच कारण असते आणि ते वैज्ञानिक दृष्टिकोनाच्याच आधारे शोधता येते. २) चमत्काराचा दावा, हे लोकांना मूर्खात काढण्याचे प्रभावी साधन आहे. कोणतीही गोष्ट कारणाशिवाय घडत नाही. चमत्कार करणारे बदमाश, त्यावर विश्वास ठेवणारे मूर्ख असतात आणि याला विरोध न करणारे भ्याड असतात. चमत्करामागे हातचलाखी वा विज्ञान यापैकी काहीतरी एक असतेच. ३) वैज्ञानिक दृष्टिकोन शब्दप्रामाण्य म्हणजे कुणी एका मोठ्या व्यक्तीने सांगितले म्हणून खरे मानायचे, हे नाकारतो. वैज्ञानिक दृष्टिकोन ग्रंथप्रामाण्य म्हणजे कुणाच्या तरी पुस्तकात लिहलंय म्हणून ते चिकित्सा न करता स्वीकारणे नाकरतो. ४) आजवर झालेली माणसाची प्रगती केवळ विज्ञानाच्या आधारे झालेली आहे. विज्ञान नेहमीच नम्र असते, ते नवनवीन बदलांना आत्मसात करते. धर्माप्रमाने ते अंतिम सत्याचा दावा अजिबात करत नाही. ५) मानवाचा आजवरचा इतिहास हा श्रद्धा तपासण्याचा इतिहास आहे. विज्ञानामुळे झालेले बदल धर्माला काळाच्या ओघात स्वीकारावे लागले आहेत. आजवर धर्माने एकही मानवी प्रगतीसाठी नविन शोध लावलेला नाही. ६) आज समाजात अनेक गोष्टी यामागे विज्ञान आहे, असे सांगून जनसामान्यांच्या माथी थोपवल्या जातात. त्या गोष्टीत नक्की विज्ञान आहे का? हे वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे तपासता येते. विज्ञानाला आज सगळ्या गोष्टींची कारणे माहित नाहीत, पण ती कारणे वैज्ञानिक दृष्टिकोनांच्या आधारेच समजू शकतात ७) आपल्या जीवनात आज जे जे काही घडते, त्यामागे पूर्व संचित आहे, नियती आहे, नशीब आहे, पूर्वजन्मीचे पाप आहे. असं समजणे हा पळपुटेपणा आहे. कष्टाला पर्याय नाही, हेच वैज्ञानिक दृष्टिकोन सांगतो. ८) वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करताना सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे छद्म विज्ञानापासून सावध राहिले पाहिजे. छद्म विज्ञानाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वास्तू शास्त्र, जोतिष शास्त्र आदी होत. ९) धर्माशिवाय माणसाच्या विवेकातून नीती निर्माण होऊ शकते, असे वैज्ञानिक दृष्टिकोन सांगतो. १०) आत्मा-परमात्मा, जन्म-मृत्यु प्रारब्ध-संचितनशीब-मोक्ष यांची मांडणी अनेक धर्मानी, अनेकांनी वेगवेगळ्या पद्धतीने केलेली आहे. व्यक्तिपरत्वे हा गोंधळ बदलू शकतो. वैज्ञानिक दृष्टिकोन तो सारा फसवेपणा नाकारतो. जो विज्ञानाच्या कसोटीवर टिकतो, तो तो खरा... असे वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट करते. पंडित नेहरू वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्व सांगताना लोकसभेत म्हणाले होते- सायंटिफिक टेंपरॅमेंट इज अ प्रोसेस ऑफ थिंकिंग, मेथड ऑफ क्शन, सर्च ऑफ ट्रूथ, वे ऑफ लाईफ, स्पिरीट ऑफ फ्री मॅन.

भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता, वैज्ञानिक वृत्ती व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान, तंत्रज्ञान परिषद, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. याचाच हेवा आंतरराष्ट्रीय स्तरावर वाटू लागला. रामन इफेक्टचा शोध लागल्याने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या शोधाची घोषणा भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकटरामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी केली होती. या शोधाबद्दल त्यांना १९३० मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले होते. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.वसंतराव गोवारीकर हे सन १९८७ साली भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे सचिव असताना त्यांनी ज्या अनेक योजना सुरू केल्या, त्यातील एक योजना म्हणजे देशात विज्ञानाचे वातावरण व दृष्टी निर्मितीसाठी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा होऊ लागला. डॉ.वसंतराव गोवारीकरांच्या मनात आले, की भारतात विज्ञानाचा एकमेव नोबेल पुरस्कार डॉ.सी.व्ही.रामन यांना मिळाला आहे, तर त्यांच्याशी संबंधितच तो दिवस असावा. शिवाय तो त्यांचा जन्म अथवा मृत्युदिन निवडण्यापेक्षा त्यांनी ज्या दिवशी त्यांचा निबंध जगप्रसिद्ध नेचर या विज्ञान मासिकाला पाठवला आणि ज्याला पुढे १९३० साली नोबेल पुरस्कार मिळाला ती तारीख का निवडू नये? अखेर तीच तारीख निघाली. राष्ट्रीय आणि इतर विज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान अकादमी, शाळा, महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्था यासारख्या सर्व विज्ञान संस्थांमध्ये या दिवशी विविध वैज्ञानिक उपक्रमांशी संबंधित कार्यक्रम आयोजित केले जातात. महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये भाषणे, निबंध, शास्त्रज्ञांचे लेखन, विज्ञान प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन आणि परिसंवाद इत्यादींचा समावेश होतो. विज्ञान क्षेत्रातील विशेष योगदानासाठी राष्ट्रीय आणि इतर पुरस्कारही जाहीर केले जातात. विज्ञानाची लोकप्रियता वाढवण्यासाठी विशेष पुरस्कारही ठेवण्यात येतात.

विज्ञान दिनाची उद्दिष्टे-लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विज्ञानाचे महत्त्व सांगण्यासाठी विज्ञान दिन दरवर्षी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलाप, प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे. सर्व विषयांवर चर्चा करणे आणि विज्ञान क्षेत्रात विकास साधणे यांसाठी, नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. जगातील व देशांदेशातील वैज्ञानिक विचारांच्या नागरिकांना संधी देणे. लोकांना प्रोत्साहित करणे, विज्ञानाची दृष्टी बहाल करणे, तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान लोकप्रिय करणे आदी सांगता येतील. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे, त्यांना प्रेरित करणे, विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे. विज्ञानाशिवाय विकासाचा मार्ग वेगाने पुढे जाऊ शकत नाही. विज्ञान गैरसमज आणि अंधश्रद्धा नष्ट करते. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रसिद्ध करण्यासोबतच देशातील नागरिकांना या क्षेत्रात संधी देऊन नवीन उंची गाठणे, हा त्याचा मुख्य उद्देश आहे. देशाच्या विकासासाठी वैज्ञानिक विचारांचा प्रसार आवश्यक आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनासारखे कार्यक्रम वैज्ञानिक वृत्तीचा प्रसार करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरू शकतात. विज्ञानाच्या माध्यमातूनच आपण समाजातील लोकांचे जीवनमान अधिकाधिक सुखी करू शकतो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विज्ञान दिन साजरे केले जातात, हे ध्यानी घ्यावे.

!! विश्व विज्ञान दिनाच्या सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

संकलन व सुलेखन -
**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी**
रामनगर, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप-९४२३७१४८८३

# आजचे राशिभविष्य

**मेष :** कोर्टाच्या कामात तुम्हाला मोठे आणि महत्त्वाचे यश मिळेल. पैशाची कमतरता दूर होईल. काही अपूर्ण प्रकल्पासाठी मित्र आणि कुटुंबाकडून आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** आज कार्यक्षेत्रात नवीन मित्र मिळतील. कोर्टाच्या कामात यश मिळेल. काही अपूर्ण कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळेल. राजकारणात तुम्हाला नको त्या प्रवासाला जावे लागेल.

**मिथुन :** व्यवसायात नोकरदार उत्पन्न वाढवण्यास उपयुक्त ठरतील. व्यवसायात नवे प्रयोग प्रगतीचे घटक सिद्ध होतील. रोजगार मिळेल. व्यवसायात महत्त्वाची कामे करा. तुमचे लक्ष इकडे विचलित होऊ देऊ नका.

**कर्क :** विनाकारण चिंता राहील. एखादी व्यक्ती विनाकारण अडचणीत येण्याचा प्रयत्न करू शकते. सुज्ञ निर्णय जीवनात बदल घडवून आणू शकतात. व्यवसायात अडथळे आल्याने मन उदास राहील.

**सिंह :** अचानक कोणताही बदल झाल्याने गंभीर आजारी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे आर्थिक, शारीरिक आणि मानसिक अशा तिन्ही प्रकारची संकटे येतील. वाहन वापरताना विशेष काळजी घ्या

**कन्या :** आज तुमची व्यवसायातील योजना यशस्वी होईल. काही अपूर्ण कामे यशस्वी होण्याची शक्यता आहे. बेरोजगारांना रोजगार मिळेल. नोकरीत चांगल्या अधिकाऱ्याशी जवळीक वाढेल.

**तुळ:** समाजात आपले स्थान निर्माण करण्यात यशस्वी व्हाल. लांबच्या प्रवासाला जाण्याची शक्यता आहे. आज सकाळपासून विनाकारण धावपळ आणि तणावाची परिस्थिती असेल.

**वृश्चिक :** जुन्या कजार्तून सुटका मिळेल. आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगा. वडिलोपार्जित मालमत्तेचे वाद मिटतील. त्यामुळे तुमची नोकरीही गमवावी लागू शकते.

**धनु :** आज एखादी वाईट बातमी ऐकायला मिळू शकते. बेरोजगारीमुळे तुम्हाला मोठा त्रास होईल. बाहेरच्या व्यक्तीमुळे कुटुंबात खूप तणाव आणि भांडण होऊ शकते. कामाच्या ठिकाणी वाद होऊ शकतात.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी संमिश्र असेल. आपले वर्तन चांगले करण्याचा प्रयत्न करा. समाजात आपला ठसा उमटवण्याचा प्रयत्न करा. काही अनुचित घटना घडण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** आज कामाच्या ठिकाणी येणा-यअडचणी कमी होतील. सहका-यांसोबसहकार्याची वागणूक विकसित करण्याचा प्रयत्न करा. विचारपूर्वक केलेल्या कामात यश मिळण्याची शक्यता राहील.


**मीन :** अनावश्यक भांडणात भाग घेऊ नका. विकासकामात बळ येईल. व्यवसाय काळजीपूर्वक करा. कोणत्याही प्रकारचा धोका पत्करू नका.



# क्या फर्ज़ से बंधा रिश्ता बन सकता है सच्चा प्यार?

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ०९ :
यही सवाल ज़ी टीवी के आने वाले प्राइमटाइम शो 'जाने अनजाने हम मिले' के ज़रिए दर्शकों के सामने रखा जा रहा है। यह कहानी एक अनोखी प्रथा 'आटा-साटा' विवाह पर आधारित है जो अब भी गुजरात, राजस्थान और मध्य प्रदेश के कुछ हिस्सों में प्रचलित है। इस अनोखी परंपरा में एक परिवार की बेटी दूसरे परिवार के बेटे से शादी करती है, और बदले में दूल्हे की बहन दुल्हन के परिवार के बेटे से विवाह करती है। इस तरह, एक-दूसरे के प्रति जिम्मेदारियों से जुड़ा एक गहरा संबंध बनता है, जिससे दोनों परिवारों की खुशियां और सलामती एक-दूसरेर निर्भर होती हैं। 'जाने अनजाने हम मिले' का प्रीमियर ११ नवंबर को होने जा रहा है, जो इन रिश्तों की उलझनों और जज़्बातों को गहराई को दर्शाने का प्रयास करता है। इस शो में मजबूत इरादों वाले दो लोग रीत और राघव का सफर है, जहां रीत अपने भाई की खुशी के खातिर प्यार के लिए नहीं, बल्कि गारंटी के तौर पर शादी करने का अनोखा फैसला करती है। रीत का किरदार आयुषी खुराना निभा रही हैं। रीत ग्वालियर की एक निडर और स्वतंत्र रिपोर्टर है, जो समाज के पुराने नियमों को चुनौती देने और पुरानी परंपराओं पर सवाल उठाने में विश्वास रखती है। वहीं, भरत अहलावत, राघव का किरदार निभा रहे हैं, जो एक गुस्सैल और पेचीदा किस्म का इंसान है, और एक सफल कंस्ट्रक्शन बिज़नेस का मालिक है। राघव अपनी बहन उन्नति के प्रति गहरे जज़्बात रखता है। उसके हालात उसे अपनी बहन उन्नति का भविष्य सुरक्षित करने के लिए 'आटा-साटाविवाह की प्रथा अपनाने पर मजबूर कर देते हैं। उन्नति की शादी रीत के भाई ध्रुव से तय करने के बदले राघव, रीत का हाथ मांगता है ताकि अगर उन्नति को ससुराल में कोई परेशानी हो, तो रीत पर उसकी जिम्मेदारी दी जा सके। जाने अनजाने हम मिले के केंद्र में एक सरल लेकिन गहरा सवाल है।

# शब्दकोडे क्रमांक १९७१




**आडवे शब्द:-**
१) स्वातंत्र्यवीरांचे संपूर्ण नाव
११) कागदी चलन
१२) झाडाभोवतीचा कट्टा
१३) रममाण, निमग्न
१४) शिखराच्या छताचा मध्यभाग
१६) वाकलेला
१९) वारा
२०) हिंदीत सर्व
२१) दुसरे लग्न करणारी स्त्री
२२) दहावी रास
२४) पगारपत्रक
२७) नगरवासी
२८) सांभाळणारा, एक पालेभाजी
२९) पत्र
३२) विशेष
३३) एक चर्मवाद्य
३५) वयाने जास्त असलेला
३७) कलावंत
३९) दुधाच्या वड्या
४१) कडक
४२) नूतन
४३) मालाचा पुरवठा
४४) कल्लोळ, गोंधळ
४६) एखाद्या कामात सतत अडथळा येणे या अर्थाची म्हण
५०) रेशमी धोतर
५१) शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री मनोहर **
५२) पाताळ
५५) घागरा
५८) वार्ताहर
६१) बूड
६३) बाज विणण्याची सुती पट्टी
६५) मला
६६) वरच्या टरफलासह तांदूळ
६७) गोव्याची राजधानी
६८) आश्चर्याची गोष्ट, आश्चर्य
६९) काम, नशीब
७०) चाफा

**उभे शब्द:-**
१) भूदान यज्ञाचे प्रणेते
२) रंगमंचावर सादर होणारे नाट्य
३) खबदाडी
४) दरवाजा
५) उग्र वास
६) शेणामातीने जमीन गुळगुळीत करणे
७) देश, जमीन
८) कमळाचे तळे
९) दात
१०) जेमतेम
१५) फोडातील द्रव
१७) वणवा
१८) त्रासाची भुणभुण, बडबड
१९) परीक्षा देण्याची जागा
२१) भांडे
२२) सुसर
२३) जिनसांची यादी
२५) तपासणी करणारा
२६) धर
३०) अग्नी
३१) संगीतातील एक राग
३२) पणजोबांचे वडील
३४) मोटरसायकल
३६) रमापती
३७) श्रम मेहनत
३८) कर्णेंद्रिय
४०) सुळे, मोठे दात
४४) येणारा जाणारा, पै पाहुणा
४५) बोबडी वळाल्यानंतरची भाषा
४७) कदर करणारा
४८) लोचट, कोडगा, अतिशय बोलणारा
४९) पायजमा
५२) सांडलेले भाताचे कण
५४) उंट हाकणारा
५६) रत्न
५७) वेदनेची उसळी, खटका
५९) ठाणवई
६०) तास
६२) बांबू
६४) आवाज, ध्वनी
६६) सर्प

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भक्तिमार्ग

**तुळशी विवाहाचं महत्त्व शास्त्रांमध्ये मांडण्यात आलं आहे. वृंदा नामक पतिव्रतेने विष्णुला दिलेला शाप आणि विष्णुने शाळिग्राम रुपात तिच्याशी विवाह करण्याचं दिलेलं वचन ही कथा तुलसी विवाहाच्या निमित्ताने सांगितली जाते. म्हणूनच कार्तिक मासातील एकादशीला तुलसी विवाह संपन्न होतो. या दिवसापासून शुभकार्यांचं उत्सवी पर्व सुरू होतं.**



## तुळशी विवाहाच्या निमित्ताने...

भगवान विष्णुंचं एक रूप म्हणजे शाळिग्राम. प्रत्येकाच्या देव्हाऱ्यात शाळिग्राम असतो. शाळिग्राम आणि तुळस यांचा विवाह म्हणजे तुलसी विवाहाचा दिवस. कार्तिक मासातील एकादशीला तुळशीचा विवाह संपन्न होतो. शास्त्रानुसार देवशयनी एकादशीला श्री विष्णुंची विश्रांती सुरू होते जी कार्तिकातील एकादशीला समाप्त होते. विष्णुंच्या विश्रांतीकाळात सर्व प्रकारची शुभकार्यं, विवाह, व्रतवैकल्य आदी बंद असतात. मात्र विष्णुंची विश्रांती संपताच शुभकार्यांच्या मंगल पर्वाची सुरूवात होते. म्हणूनच हा दिवस सर्व मंगल कार्यांचा आरंभदिवस म्हणूनही ओळखला जातो. या दिवसापासून विवाहादी मंगलकार्यांचा आरंभ होतो. या सर्व कार्यांना विष्णुंचे आशीर्वाद असतात, अशी भारतीय जनमानसाची धारणा आहे. म्हणूनच दिवाळीच्या धामधुमीनंतर पार पडणारा तुलसीविवाह एक सण म्हणूनच साजरा होतो.



पुराणांमध्ये तुलसीविवाहाची कथा सांगितली जाते. त्यानुसार प्राचीन काळात जालंधर नावाचा एक राक्षस होता. अत्यंत क्रूर, अत्याचारी आणि कठोर म्हणून तो कुख्यात होता. तो अत्यंत शक्तिशाली होता. देवतादेखील त्याला घाबरुन होत्या. त्याच्या शक्तीचं रहस्य वृंदा नामक पत्नीच्या पातिव्रत्यात दडलं होतं. वृंदा भगवान विष्णुंची परमभक्त होती. ती निष्ठेने आणि श्रद्धापूर्वक पत्नीधर्माचं पालन करत असे. तिच्या या शक्ती आणि सामर्थ्यांच्या बळावरच जालंधर शक्तिशाली होत होता. एक दिवस या जालंधरच्या त्रासाला कंटाळून सगळ्या देवता विष्णुकडे गेल्या आणि आपलं गाऱ्हाणं समोर मांडलं. समस्त देवतांची ही समस्या सोडवण्यासाठी विष्णुने वृंदाचा व्रतभंग करण्याचा प्रयत्न केला. तिचा व्रतभंग झाल्याने जालंधरची शक्ती कमी पडली आणि देवतांविरुद्धच्या युद्धात तो मृत पावला. पतीवियोगाने विव्हल झालेल्या वृंदाने विष्णुला शाप दिला आणि ती सती गेली. तिच्या या सतीस्थानापाशी तुळशीचं रोप उगवलं असं ही कथा सांगते. अन्य एका कथेनुसार वृंदाने क्रोधदग्ध होत विष्णुंना, तुम्ही शीळा व्हाल असा शाप दिला. मात्र तिच्या श्रद्धेचा मान ठेवत विष्णुंनी, तू पुन्हा जन्म घेशील आणि माझ्या शाळिग्राम रूपाशी तुझा विवाह होईल असा वर दिला. तेव्हापासून तुलसी विवाहाची ही प्रथा पाळली जात आहे.

कार्तिक मासात संपन्न होणाऱ्या या विवाहसोहळ्यात विष्णुप्रिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुळसीचा विवाह शाळिग्रामाशी लावतात. हा विधी पार पाडल्यास अनेक पुण्यांची प्राप्ती होते अशी श्रद्धा आहे. आपल्याकडे कन्यादान हे सर्वश्रेष्ठ दान सांगितलं आहे. मात्र कन्या नसणाऱ्या दांपत्याला हे पुण्य मिळवण्यात अडचण येते. अशा वेळी तुळशीचा विवाह लावल्यास हे दांपत्य कन्यादानाचं पुण्य प्राप्त करुन घेऊ शकतं. या तिथीला समारंभपूर्वक तुळशीचा विवाह साजरा केल्यास शुभफळांची प्राप्ती होते. इच्छित कामना पूर्ण होतात. श्रद्धापूर्वक हा विवाहविधी संपन्न करणाऱ्या घरामध्ये सुख-शांती नांदते. या घरावर लक्ष्मीचे आशीष राहतात तसेच विष्णुकृपा राहते अशी भाविकांची श्रद्धा आहे.



तुळस ही लक्ष्मीचं प्रतिरुप आहे. म्हणूनच तुळशीचे आशीर्वाद लक्ष्मीच्या आशीर्वादासमान असतात. बरेचदा उपवर वधुवरांच्या लग्नात अनेक अडचणी उद्भवत असतात. बाधा उत्पन्न झाल्याने त्यांच्या विवाहात विघ्न येत असतं. अशा वेळी त्यांच्या विवाहासाठी तुलसी विवाहाची तिथी अत्यंत योग्य समजली जाते. या तिथीला कोणतंही विघ्न न येता विवाह संपन्न होतो असं समजलं जातं.

**भक्ती विशेष**

विवाह म्हटलं की थाटमाट आलाच. तुलसी विवाहही थाटामाटात साजरा होतो. पण हा थाटमाट नको असेल तर घरच्या घरीदेखील, अगदी साधेपणाने विवाह संपन्न होऊ शकतो. यासाठी सर्वप्रथम तुळशीचं रोप असणारी कुंडी स्वच्छ करावी आणि गेरुने रंगवावी. त्यावर सुचिन्हं रेखावीत. सायंकाळी विवाहविधी करावेत. यासाठी तुळशीच्या रोपावर तांबडी ओढणी पांघरावी. कुंडीत चारही बाजूला ऊस रोवून मंडप तयार करावा. त्यानंतर तुळशीला वधूसमान सजवावं. तिचा शृंगार करावा. तुळशीच्या शेजारी पाटावर शाळिग्राम ठेवावा. सर्व देवतांना आवाहन करावं, त्यांची विधीवत पूजा करावी आणि तुळस व शाळिग्रामाचा विवाह लावावा. मंगलाष्टका म्हणून, मधे अंतरपाट धरुन, मंगल वाद्यांच्या गजरात विधी संपन्न करावेत. त्यानंतर हातात शाळिग्राम घेऊन तुळशीभोवती सात वेळा प्रदक्षिणा घालाव्यात. विवाह संपन्न झाल्यावर उपस्थितांना प्रसाद द्यावा.

तुळशीच्या लग्नानंतर लग्नसराई सुरू होते. विवाहाचे मुहूर्त काढले जातात. एकप्रकारे आपल्या घरात शुभकार्य होण्यापूर्वी मुहूर्त करण्याची ही पद्धत आहे असंही म्हणता येईल. पुराणकथांमध्ये 'विष्णुप्रिया' म्हणून तुळशीचा होत असणारा उल्लेख तिचं पौराणिक महत्त्व सांगतो पण वैद्यकशास्त्रानुसार बघू जाता तुळशीला 'मनुष्यप्रिया'देखील म्हणायला हवं. आरोग्यदृष्ट्या तुळशीचं महत्त्व नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. हे लाभ ओळखूनच पूर्वजांनी तिला अंगणात मानाचं स्थान दिलं आहे. अनेक औषधांमध्ये तुळशीचा उपयोग होतो. आजच्या प्रदूषणयुक्त काळात हवा शुद्ध करणारी वनस्पती म्हणूनही तुळशीची उपयुक्तता प्रकर्षाने जाणवते. तुळशीवर संशोधन होत असून त्यातून या वनस्पतीची उपयुक्तता आणि उपयुक्ततेचे नवे आयाम लक्षात येत आहेत. म्हणूनच व्रत-वैकल्य अथवा साजरीकरणाचं प्रस्थ वाढवणं आवडत नसणाऱ्यांनी या निमित्ताने घरात तुळशीचं रोप लावावं. तुळशीच्या रोपांचं वाटप करावं. या रोपांची जपणूक करावी. हे कर्मदेखील तुलसीविवाहाचं पुण्य मिळवून देईल याची खात्री बाळगायला हवी.



**राग, क्रोध हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू असल्याचं मानलं जातं. याबद्दल आपण अनेकदा ऐकलंय. याबद्दल बरंच लिहिलं आणि बोललं गेलंय. राग का येतो हा पहिला प्रश्न आहे तर राग न येण्यासाठी काय करायला हवं हा दुसरा मुद्दा आहे. पहिल्या प्रश्नाचं उत्तर कारणात दडलंय तर दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर निवारणात. रागाची अनेक कारणं आहेत. ठराविक प्रसंगात माणसाला खूप राग येतो. नंतर हा राग कमी होतो. राग येऊ नये यासाठी काही गोष्टींकडे लक्ष देता येईल.**

## असा घालवा राग...

अध्यात्म आणि धर्माचा आधार घेतला तर राग नियंत्रणात राहिल. स्वत:ला कार्यमग्न ठेवा. आपलं मन चांगल्या कामात गुंतवा. यामुळे रागावर नियंत्रण ठेवणं शक्य होईल. आवडती गाणी ऐका. आयुष्यातल्या सकारात्मक बाबींचा विचार करा.



✻ राग घालवण्यासाठी हसत रहा. हास्यामुळे नकारात्मक गोष्टी दूर होतात. आपल्या प्रश्नाकडे तटस्थपणे बघा. यामुळे रागावर नियंत्रण ठेवणं शक्य होईल.

**सेल्फ हेल्प**

✻ राग हे भावना व्यक्त करण्याचं एक माध्यम आहे पण आपल्या भावभावनांवर नियंत्रण मिळवायला शिका. यामुळे रागाला चार हात लांब ठेवता येईल.

## आशिर्वादाचं फळ...

आशीर्वादात शक्ती असते असं म्हटलं जातं. आशीर्वादामुळे आपल्या आयुष्यात अमूलाग्र बदल घडू शकतात. छोट्या छोट्या प्रसंगांमधून हा आशीर्वाद आपल्या कामी येतो. म्हणूनच शुभकार्याची सुरूवात करताना आपण देवता तसंच घरातल्या ज्येष्ठांचे आशीर्वाद घेतो. आशीर्वाद हा चार अक्षरी शब्द. पण यातून वेगवेगळे अर्थ प्रतित होतात. आपण देवापुढे, गुरूपुढे किंवा दात्यापुढे हात जोडतो. जोडलेले हात काही तरी मागत असतात. परमेश्वरापुढे आपण व्यक्त होतो पण इतरांपुढे आपण व्यक्त होत नाही. हात जोडलेल्या शिष्याला नेमकं काय हवंय, याची जाणीव गुरूला नसते. शिष्य युद्धभूमीवर जात असेल तर गुरू 'विजयी भव' असा आशीर्वाद देतो. आशीर्वाद देताना सुखी राहा, आयुष्यमान भव, यशस्वी भव असे उद्‌गार तोंडातून बाहेर पडतात. पण मोठ्यांच्या पाया पडताना आपण इच्छा प्रगट करत नाही. आपल्याला नेमकं काय हवंय हे जाणत नाही. म्हणूनच आशीर्वाद या चार अक्षरी शब्दातून बरंच काही सांगितलं गेलंय.

आशीर्वाद या शब्दाचा अर्थ आहे आयुष्य, विद्या, बल आणि बुद्धी.आयुष्य, विद्या, बळ आणि बुद्धीची वृद्धी हाच आशीर्वादाचा परिपाक आहे. एखाद्याला दिलेल्या आशीर्वादातून आयुष्य, विद्या, बळ आणि बुद्धी वाढत असेल तर तो आशीर्वाद फलदायी ठरतो. या चार गोष्टींची वृद्धी व्हावी, अशी प्रत्येक माणसाची इच्छा असते. शिष्य श्रद्धेने गुरूला वंदन करत असेल आणि गुरूही मनापासून आपल्या शिष्याला आशीर्वाद देत असेल तर आशीर्वादाचा सकारात्मक परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. एखाद्या व्यक्तीला वाकून नमस्कार करताना आदरभाव जेवढा जास्त तेवढा आशीर्वादाचा परिणामही जास्त असतो. आशीर्वादाचं फळ मिळत नसेल तर वंदन करताना मनात कोणताही आदरभाव नाही, हे लक्षात घ्यायला हवं. देव, गुरू किंवा ज्येष्ठ यांना वंदन करताना मनात समाधानी भाव असणं गरजेचं आहे. तसंच आदरभावही हवा. यामुळे आशीर्वादाचं फळ मिळू शकेल.

**भक्ती मार्ग**



## यश मिळवण्यासाठी...

आर्य चाणक्याला आपण तत्त्ववेत्ता मानतो. चाणक्याने जीवनाचं सार सांगितलंय. आयुष्याबद्दलचं त्याचं तत्त्वज्ञान आजच्या युगातही लागू पडतं. चाणक्यनीतीतून अनेक गोष्टी कळतात. प्रत्येकाच्या आयुष्यात नव्या गोष्टींची सुरूवात होत असते. आपल्यासाठी आपण काही तरी नवं करतो. आपल्या करीअरची नवी सुरूवात असो किंवा नवी वस्तू घेणं असो. अर्थात सुरूवातीला आपल्याला बराच संघर्ष करावा लागतो. काय करावं आणि काय करू नये याबद्दल आपण काहीसे गोंधळलेले असतो. चाणक्यनीतीतून आपण काही धडे घेऊ शकतो.



✻ कोणतीही नवी गोष्ट सुरू करताना मनात सकारात्मक विचार असू द्या. आपल्या नव्या कामाची जागा आणि वेळ, आर्थिक क्षमता आणि आपल्यासोबत असलेल्या लोकांचा विचार करा.

✻ आपल्या क्षमता तपासून पाहा. आपल्या क्षमतांनुसार कामाला सुरूवात करा.

✻ जीभेवर ताबा ठेवणं महत्त्वाचं आहे. यातच तुमचं यश आणि अपयश दडलंय. लोकांशी गोड आणि आदरपूर्वक बोला आणि वागा. यामुळे तुमची प्रगती होईल.

✻ आपल्या शत्रूंशी मैत्री करा. शत्रुत्त्वाचं रूपांतर मैत्रीत करा. लोकांशी चांगलं वागलं तर लोकही आपल्याशी चांगलं वागतील हे कायम लक्षात ठेवा.

✻ आपलं शरीर ही परमेश्वराने दिलेली अनमोल देणगी आहे. त्यामुळे आरोग्याकडे लक्ष द्यायला हवं. आपल्या शरीराकडे लक्ष द्या. नवं काम सुरू करण्याआधी शरीर सक्षम असल्याची खात्री करून घ्या.

✻ ज्योतिषाचा सल्ला घेण्याबद्दलही चाणक्याने सुचवलं आहे.

✻ आपल्या संकल्पना, योजना जगजाहीर करू नका. यश मिळेपर्यंत या योजना गुप्त ठेवा. वाच्यता करू नका.

✻ आयुष्यात यशस्वी होण्यासाठी काही कठोर निर्णय घ्यावे लागतात. हे निर्णय घेताना मागे हटू नका. अनेकदा लोकांशी कठोरपणे वागावं लागतं. याची तयारी ठेवा. तरच यश तुमच्या दाराशी येऊ शकेल.

**धर्मशास्त्रातून...**

**उत्त आरोग्य आणि दीर्घायुष्यासाठी रात्रीची झोप महत्त्वाची मानली जाते. अपुऱ्या झोपेमुळे तब्बेतीच्या तक्रारी निर्माण होतात. रात्री शांत झोप झाल्यानंतर सकाळी ताजंतवानं वाटतं. प्रत्येक काम करण्यात उत्साह वाटतो. अनिद्रा किंवा अपुऱ्या झोपेची तक्रार असेल तर वैद्यकीय उपचारांसोबतच फेंगशुईचे काही उपाय करता येतील.**

## शांत झोपेसाठी...

शयनकक्ष म्हणजेच बेडरूम ही शांत झोप घेण्याची जागा. आपला बराचसा वेळ बेडरूममध्ये जातो. इथे आपण झोपतो, स्वप्न बघतो, खेळतो. शयनकक्ष म्हणजे आरामाचं ठिकाण. त्यामुळे आरामासाठी लागणारी प्रत्येक गोष्ट इथे असल्याची खात्री करून घ्या. उश्या आणि गाद्या स्वच्छ ठेवा. बेडशीट दररोज बदला. दररोज बदलणं शक्य नसेल तर झटकून परत घाला.



✻ पलंगाखालची जागा स्वच्छ ठेवा. पलंगाखाली सामान ठेवायची जागा असेल तर ती सुद्धा स्वच्छ ठेवा. तसंच इथे टॉवेल, चादरी आणि अभ्रे ठेवा. इतर वस्तू शक्यतो ठेऊ नका.

✻ बेडरूममध्ये इलेक्ट्रॉनिक सामान ठेऊ नका. बेडरूममध्ये टिव्ही नको. कॉँम्प्युटरही बेडरूममध्ये ठेऊ नका. बेडरूमला गॅझेटमुक्त ठेवा. बेडरूममध्ये लाफिंग बुद्धा ठेवा. यामुळे खोलीत सकारात्मक ऊर्जेचा वास राहून चांगली झोप येईल.

**वास्तु भक्ती**

✻ बेडरूमच्या सजावटीकडेही लक्ष द्या. खोलीच्या भिंतींचा रंग डोळ्यांना खुपणारा नको तर आल्हाददायी असला पाहिजे. बेडशीटही आल्दाददायी रंगाची असली पाहिजे. लाल रंगाची चादर वापरणं योग्य ठरतं. चादरीच्या रंगामुळे अनिद्रेची समस्या निर्माण होऊन तुम्ही आळशी बनू शकता.

## अन्वयार्थ लक्ष्मीपूजनाचा

आपल्या शास्त्रात लक्ष्मीपूजनाचं मोठं महत्त्व असतं. लक्ष्मी येण्याच्या दृष्टीने घराची स्वच्छता केली जाते. आपल्या घरावर लक्ष्मीदेवीची कृपा कायम रहावी, असं प्रत्येकाला वाटत असतं. संपन्नता, सुबत्ता असेल तर सगळी सुखं आपल्या दाराशी उभी राहतात. दिवाळीत लक्ष्मीपूजन केलं जातं. या दिवशी लक्ष्मी देवीची कृपा झाली तर वर्षभर संपन्नता टिकून राहते, असं मानलं जातं. लक्ष्मी देवीची कृपा प्राप्त करण्यासाठी दिवाळीत या स्थानी पणत्या लावल्या जातात. यामुळे घरात समृद्धी नांदते असं मानलं जातं.



✻ लक्ष्मीपूजन करत असलेल्या ठिकाणी पणती किंवा दिवा लावा. हा दिवा रात्रभर विझू देऊ नका.

✻ मुख्य दरवाज्याच्या बाहेर दोन्ही बाजूंना पणत्या लावा.

✻ आर्थिक चणचण जाणवत असेल तर पिंपळाच्या झाडाखाली दिवा लावा पण दिवा लावल्यावर मागे वळून बघू नका. दिवाळीच्या रात्री हा उपाय करा.

✻ दिवाळीच्या रात्री चौकात दिवा लावा. यामुळे धनविषयक समस्या दूर होतील.

**जाणून घ्या**

✻ घराच्या आसपासच्या मंदिरातही दिवा लावा. यामुळे सगळ्या देवतांची कृपा होऊ शकेल. यामुळे सगळ्या संकटांपासून मुक्ती आणि मानसिक समाधान मिळतं.

✻ बेलाच्या झाडाखाली दिवा लावल्याने शंकर प्रसन्न होतो, असं मानलं जातं. शंकराच्या कृपेमुळे व्यक्तीच्या आयुष्यातल्या अनेक समस्या दूर होतात.

## मंदिर कुबेराचं..

हिंदू धर्मात ३३ कोटी देवी-देवता असल्याचं मानलं जातं. त्यापैकी कुबेर ही धनाची देवता. कुबेर हा यक्षांचा राजा. कुबेर हा उत्तर दिशेचा द्वारपाल असून या ब्रह्मांडाचा रक्षक असल्याचे उल्लेख पुराणांमध्ये आढळतात. ब्रह्मदेवाप्रमाणे कुबेराच्या मंदिरांचं प्रमाणही कमीच आहे. धनाच्या या देवतेचं मंदिर दक्षिण भारतात वसलंय. तामिळनाडूतल्या तिरूनेलवेली जिल्ह्यात हे मंदिर आहे. तमरपरानी नदीच्या काठी वसलेलं हे मंदिर हरिकेसवल्लानूर नावाने ओळखलं जातं. तिरूनेलवेलीच्या कुबेरपुरी नावाच्या छोट्याशा गावात हे मंदिर आहे. इथे शंकर आणि पार्वतीच्याही मूर्ती आहेत. या मंदिरात दोन शिवलिंगं आहेत. आर्यनाथर आणि कुबरेलिंग या नावाने ती ओळखली जातात. म्हणूनच हे गाव कुबेरपुरी नावाने ओळखलं जातं. कुबेरपुरी हे अत्यंत पवित्र असं स्थान आहे. या ठिकाणी रूद्रभैरवाचं तीर्थस्थानही आहे. आठ भैरवांपैकी रूद्र भैरव हे एक स्थान आहे. या ठिकाणी नटराजाची दोन आसनं आहेत. कुबेराच्या या मंदिरात ज्येष्ठा देवीचं एक मंदिर आहे. ही देवी मंगळदोषांचं निवारण करते असं मानलं जातं. यासोबतच इथे इतर देवतांची मंदिरंही आहेत. कुबेराचं हे मंदिर पंड्या महाराजांनी बांधलंय. या राजाचा उल्लेख पौराणिक ग्रंथांमध्येही आढळतो. हे मंदिर १४०० वर्षांपूर्वीचं असल्याचं बोललं जातं.

**तीर्थक्षेत्र**






# आम्ही पाकिस्तानमधून उमेदवार आणले नाहीत....

# देवेंद्र फडणवीसांचा हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

माझी कारकीर्द पश्चिम नागपूर मधून सुरू झाली. नगरसेवक, महापौर, आमदार याच मतदार संघातून झालो. मी मतदार देखील याच मतदारसंघाचा आहे. पण निवडणूक दक्षिण पश्चिम मधून लढत आहे. अशाच प्रकारे विकास ठाकरे हे दक्षिण पश्चिमचे मतदार आहेत आणि पश्चिम मधून निवडणूक लढत आहेत, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.



पश्चिम नागपूरचे भाजपच्या उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. व्यासपीठावर माजी महापौर संदीप जोशी, दयाशंकर तिवारी, माया इवनाते यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. फडणवीस यांनी त्यांच्या भाषणात मागील दोन वर्षांत सरकारने सुरू केलेल्या योजनांची यादीच सांगितली तसेच काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला.

सुधाकर देशमुख यांनी निवडणूक लढणार असल्याचे सांगितले. त्यानंतर एका अनुभवी व्यक्तीला उमेदवारी देण्यात आली. एका मतदार संघाचे मतदार आणि दुसऱ्या मतदार संघातून निवडणूक लढणे म्हणजे बाहेरचा उमेदवार होत नाही. कोहळे शेजारच्या मतदार संघातील आहेत. आम्ही पाकिस्तान मधून उमेदवार आणला नाही. आशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी कोहळे यांना विरोध करणाऱ्या पक्ष कार्यकर्त्यांना सुनावले.

ते म्हणाले, नागपूर शहरात सिमेंट रस्ते, पाणी योजना, अविकसित लेआऊटची कामे भाजपच्या सत्ताकाळातच झाली. झोपडपट्टी धारकांना मालकी पट्टे वितरित केले, खासगी जमिनीवरील झोपड्यांचा प्रश्न सोडवला. याउलट महाविकास आघाडी सरकारने विकास शुल्क वाढवले. ते आम्ही कमी केले.

नागपूरची वाटचाल पुण्यासारखी शिक्षण नगरी ते उद्योगनगरीकडे होत आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादीची (शरद पवार) १५ वर्षे सत्ता होती. त्यांनी नागपूर शहरासाठी काय केले? असा सवालही फडणवीस यांनी केला.

### संविधानाची पाने कोरी

काँग्रेस व राहुल गांधी यांच्यावरही फडणवीस यांनी टीका केली. राहुल गांधी संविधानाचा अपमान करत आहेत. ते लाल पुस्तक घेऊन फिरतात. त्यातील पाने कोरी असतात. त्यांना केवळ शहरी नक्षलींच्या मदतीने अराजक माजवायचे आहे. राहुल गांधी भारतात संविधान आणि आरक्षण बचावच्या गोष्टी करतात आणि अमेरिकेत आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे सांगतात, असेही फडणवीस म्हणाले.

### संजय राऊतांसारख्या लोकांना मी...

संजय राऊत यांनी केलेल्या वक्तव्यावर आमचे प्रवक्ते बोलतील. माझ्या स्तराचे लोक असतील त्यांच्याबाबत मला प्रश्न विचारा. त्यावर मी बोलणार, मात्र संजय राऊतांसारख्या लोकांना मी उत्तर देत नाही आणि त्यांच्याबाबत मला विचारतही जाऊ नका. त्यांचा महायुती व भाजपवर टीका करणे, तेवढाच एकमेव कार्यक्रम असून त्यासाठी उद्धव ठाकरे यांनी त्यांची नियुक्ती केली आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र पडणवीस यांनी केली.

फडणवीस नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत दररोज सकाळी काहीना काही वक्तव्य करीत असतात. त्यांच्यावर बोलण्यासाठी भाजपने प्रवक्त्याची नियुक्ती केली असून ते त्याला उत्तर देत असतात. संजय राऊत यांच्या वक्तव्यावर मी प्रतिक्रिया देत नाही आणि त्यावर बोलणेही मी उचित मानत नाही. मी वारंवार सांगतो की संजय राऊतांबद्दल मला काहीही विचारू नका, असेही फडणवीस म्हणाले.

अजित पवार एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये काय बोलले, त्याबाबत माहिती नाही. मात्र त्यांच्या नावावर कोणी काही बोलून टीका करून त्यांना बदनाम करत असतात. विरोधकांना सध्या महायुतीमधील नेत्यांच्या वक्तव्यावरुन टीका करण्यासाठी ठेवले आहे का, असा प्रश्न पडतो, असेही फडणवीस म्हणाले.

## सुनील टिंगरेची आघाडीला नोटीस

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :

पुण्यातील वडगाव शेरी येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार आमदार सुनील टिंगरे यांनी महाविकास आघाडीला नोटीस पाठवली असल्याची माहिती समोर आली आहे. पोर्शे कार अपघात प्रकरणात आपल्यावर टीका होत असल्याने ही कॉमन नोटीस पाठवली असल्याची माहिती सुनील टिंगरे यांनी दिली आहे.

आमदार सुनील टिंगरे यांनी बजावलेल्या नोटीसवर शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी टीका केली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, पोर्शे कार अपघात प्रकरणात माझी बदनामी कराल तर तुम्हाला कोर्टात खेचेन, असे त्या नोटीसमध्ये लिहिले होते. तुम्हाला आश्चर्य वाटेल ज्याने आपल्या भाषणात शरद पवारांना ८० वर्षांच्या योद्धा म्हणले होते, ज्यांनी मागच्या निवडणुकीत त्यांच्या एबी फॉर्मवर सही केली होती, ज्यांच्यामुळे ते निवडून आले, त्याच शरद पवारांना तुम्ही पोर्शे कार अपघात प्रकरणानंतर नोटीस पाठवली. माझी बदनामी केली तर कोर्टात खेचेन असे त्यात म्हणले होते.

पवार साहेबांना वैयक्तिक मी कोणतीही नोटीस बजावली नाही खासदार सुप्रिया सुळे यांनी केलेल्या टीकेवर बोलताना आमदार सुनील टिंगरे म्हणाले, पवार साहेबांना वैयक्तिक मी कोणतीही नोटीस बजावली नाही माझी बदनामी झाली तर आता मी या विधानसभेचा उमेदवार म्हणून चुकीच्या माहितीच्या आधारे कोणती वक्तव्ये होऊ नये अशा पद्धतीची त्यांना नोटीस दिल्याचे टिंगरे यांनी स्पष्ट केले आहे.

## वो राज तो मै संजय..





■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

मनसे प्रमुख राज ठाकरे हे ठाकरे असले तरी मी देखील राऊत आहे, माझे बरेच आयुष्य बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत गेले आहे. बाळासाहेबांनीच घडवलेला मी राऊत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

या माध्यमातून संजय राऊत यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावर पलटवार केला आहे. त्यांनी मला शिकवण्याची आवश्यकता नसल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. ज्याला जी भाषा समजते, ती भाषा मी वापरत असल्याचे राऊत त्यांनी म्हटले आहे.

राज ठाकरे बोलत असलेली स्क्रिप्ट ही देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेली आहे. राज ठाकरेंवर ईडीची टांगती तलवार असल्याने त्यांना हे बोलावे लागते, भाजपच्या नादी लागलेला अजून काय बोलणार? अशा शब्दात त्यांनी राज ठाकरे यांना टोला लगावला. राज ठाकरे ज्या ठिकाणी बोलले तिथे गुंडांच्या माध्यमातून निवडणूक लढवली जात असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

सत्ताधारी पक्षाचे नेते गुंडांच्या मदतीने निवडणुका लढवत आहेत, प्रत्येक मतदारसंघासाठी स्वतंत्र गुंडांची नियुक्ती केली जात आहे, गुंडांना वापरून शिंदेंचे आणि भाजपचे लोक निवडणुका लढवत असतील तर जे घडणार आहे त्याची सर्व जबाबदारी पोलिसांवर असेल, अशा शब्दात राऊत त्यांनी टीका केली.

'एक रहेंगे तो सेफ रहेंगे' या मोदी यांच्या नाऱ्याचा राऊत यांनी समचार घेतला. अशाप्रकारे बोलण्याची वेळ पंतप्रधानांवर का यावी? आम्ही महाराष्ट्रात नक्कीच सेफ आहोत मोदी-शहा आल्यानंतरच आम्ही अनसेफ होत असल्याचे राऊत म्हणाले.


### एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होणार नाहीत

कोणत्याही परिस्थितीमध्ये एकनाथ शिंदे हे पुन्हा या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार नाहीत. त्यांचे अवतार कार्य आता भारतीय जनता पक्ष संपवणार आहे. तसेच ते संपवायला सुरुवात देखील झाली आहे. याचा अर्थ फडणवीस मुख्यमंत्री होतील असा नाही. मुख्यमंत्री तर महाविकास आघाडीचाच होईल, असा दावा संजय राऊत यांनी केला आहे.

## १५ लाखांची गॅरंटी १५०० वर आली...

■ वृत्तसंस्था, हिंगोली, दि. ९ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येकाच्या बँक खात्यात 15 लाख रुपये जमा करण्याची गॅरंटी दिली होती मात्र 15 लाखांची गॅरंटी 1500 रुपयांवर आली अन् आता निवडणुकीनंतर 15 पैशांवर येईल, अशा तिखट शब्दांत शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांनी कळमनुरी येथे केंद्र व राज्य सरकारवर निशाणा साधला.



डॉ. संतोष टारफे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी बोलताना ठाकरे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी 15 लाख रुपये प्रत्येकाच्या खात्यात जमा करण्याची गॅरंटी दिली होती. मात्र ती रक्कम अद्यापही जनतनेच्या खात्यात आली नाही. उलट 15 लाखांचे 1500 रुपये झाले. हे सरकार बदलण्याच्या निश्चयाने आम्ही निवडणुकीच्या मैदानात आल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात मोदीची नव्हे तर शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची गॅरंटी चालते असा दावा त्यांनी केला.

राज्यात शिवसेना उमेदवाराच्या समोर बहुतांश ठिकाणी गद्दार उभा आहे. या गद्दारांना घरी बसविण्याची वेळ आल्याचेही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

## कारल्याच्या भाजीसारखे राजकारण कडू

### संभाजीराजेंचा हल्लाबोल



राजकारण कारल्याच्या भाजीसारखे कडू झाले आहे, असे म्हणत स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे यांनी सर्व पक्षांवर जोरदार टीका केली. नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातील स्वराज्य पक्षाचे उमेदवार दशरथ पाटील यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत संभाजीराजे बोलत होते. या सभेत त्यांनी महाविकास आघाडी आणि महायुतीवरही टीका केली.

छत्रपती संभाजीराजे म्हणाले की, आजचे राजकारण आजवर कधीच बघितले नव्हते. येथे खोके, गद्दारी, आणि बेईमानी सुरू आहे. बाळासाहेब ठाकरे नेहमीच म्हणायचे की शिवसेना काँग्रेसशी युती करणार नाही. मग उद्धव ठाकरे काँग्रेससोबत कसे गेले? खुर्चीसाठी असा निर्णय घेतला असेल, तर ते गद्दारी नाही का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

संभाजीराजे पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी 70 हजार कोटींचा आरोप करत होते. आज त्याच अजित पवारांसोबत सरकार आहे. सोनिया गांधी यांच्या परदेशीचा मुद्दा घेऊन शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले, नंतर पुन्हा त्यांच्यासोबतच गेले. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले आंबेडकर यांचे नाव घ्यायचे पण तसे आपण वागतो का? आमच्याकडे शिवाजी महाराजांचा स्वाभिमान आहे.

पुढे बोलताना संभाजीराजे म्हणाले, पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे शस्त्र तलवार होते. आता बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले 'पेन' शस्त्र आपल्यासोबत आहे. महात्मा फुलेंची सामाजिक रचना, बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेचा विचार आणि या पेनच्या शाईमधून शिवाजी महाराजांचे विचार लिहिले जातात. महाराष्ट्र इतरांना दिशा देणारे राष्ट्र आहे. पण, या सर्व प्रस्थापितांनी महाराष्ट्र गिळून टाकला आहे.

सदाभाऊ खोत यांच्यावर देखील संभाजीराजे यांनी टीका केली आहे. तो सदाभाऊ खोत काहीही बोलतो, त्याला उत्तर देणार तो कुत्रा आहे म्हणतो, हा प्रचार आहे का? असा सवाल उपस्थित केला. महायुती 1500 रुपये देतात, महाविकास आघाडी 3 हजार देणार म्हणतात, त्यापेक्षा महिलांना रोजगार द्या, असे म्हणत त्यांनी महायुती आणि महाविकास आघाडीवर टीका केली आहे.

## राजेंद्र मुळक यांच्या बंडखोरीवरून भास्कर जाधव यांचा संताप

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ९ :



रामटेक मतदारसंघात काँग्रेसमधून झालेल्या बंडखोरीवरून उबाठा शिवसेनेत संताप उफाळून आला आहे. उबाठा नेते भास्कर जाधव यांनी रामटेक येथील जाहीर सभेत बोलताना काँग्रेस नेते सनील केदार यांच्यावर आसूड ओढले.

छत्रपतींच्या पुतळ्यासमोर घेतलेली शपथ केदार अवघ्या पंधरा दिवसात विसरले. सगळे काही होईल. नियती अशा लोकांना माफ करीत नाही, हे लक्षात ठेवा, असा इशारा जाधव यांनी दिला. सुनील केदार यांनी महाविकास आघाडी, उबाठा शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि छत्रपतींचाही विश्वासघात केला अशी टिका जाधव यांनी केली.

काँग्रेसचे बंडखोर राजेंद्र मुळक यांच्या बंडखोरी मागे सुनील केदार यांचा हात आहे. पाच महिन्यांपूर्वी याच शिवसैनिकांनी आणि याच जनतेने रक्ताचे पाणी करून काँग्रेसचा खासदार निवडून आणला. पाच महिन्यात तुम्ही उलटला. पूर्व विदर्भात ३२ जागा आहे. त्यापैकी फक्त एक जागा उबाठाने लढवली. संपूर्ण पूर्व विदर्भात उबाठाची फक्त एवढीच ताकद आहे काय?, शिवसेनेशी टक्कर घेणारे मातीत गेले हे विसरू नका. शिवसेनेच्या स्वाभिमानाला हात घालू नका.

कळमेश्वरला शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना केदार यांनी विश्वास दिला. या रामटेक मतदारसंघातील सहाच्या सहा जागा महाविकास आघाडीच्या निवडून आणेन असा शब्द दिला. आणि आता शब्द फिरवून छत्रपतींचा विश्वासघात करायला निघाले आहे. मुळकांना केदारांनी कामठीतून का उभे केले नाही? असा सवाल भाष्कर जाधव यांनी यावेळी उपस्थित केला.

## मुख्यमंत्रीपदावरुन महायुतीत चढाओढ नाही - बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :



मी वारंवार सांगतोय, महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार हे मुख्यमंत्री बनण्याच्या कुठल्याही चढाओढीमध्ये नाही. अमित शहा यांच्या वक्तव्याच्या चुकीचा अर्थ काढू नये. आम्ही विकासाकरिता काम करत आहोत. मुख्यमंत्रिपदासंदर्भात केंद्रीय नेतृत्त्व निर्णय घेईल. आम्ही सध्या त्यावर विचार करत नाही, असे वक्तव्य भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, आम्ही विकासासाठी मत मागत आहोत. 14 कोटी जनतेच्या विकासाचा संकल्प घेऊन व सरकार स्थापन करण्यासाठी आम्ही काम करतोय. तर मविआमध्ये तशी परिस्थिती नाही, त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाचे 14 दावेदार आहेत.

छगन भुजबळ आणि मी सोबत होतो. त्यांनी मला सांगितले की, मी कुणाला मुलाखत दिली नाही, असे काही बोललो नाही, माझ्या नावाचा गैरवापर करण योग्य नाही, भुजबळ हे कायदेशीर कारवाई करतील असे दिसत आहे, असेही त्यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा महाराष्ट्रात विकास व्हावा यासाठी प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस हे आहेत, म्हणून भाजपचा विजय तो त्यांचा विजय विजय या अर्थाने शहा यांनी ते वक्तव्य केले. याचा वेगळा अर्थ घेऊ नये असेही त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

## भंडाऱ्यात हातगाडी चर्चेत...

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ९ :

अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव भंडारा विधानसभा मतदारसंघात यावेळी संभ्रमाची परिस्थिती दिसते आहे. तब्बल १९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून, मतदारसंघात पहिल्यांदाच काँग्रेसने महिलेला तिकीट देत विद्यमान आमदारासमोर तगडे आव्हान उभे केले आहे.

तथापि, अपक्ष उमेदवार देवांगणा (दिव्यानी) गाढवे यांनीही प्रचारात आघाडी घेतली असून, त्यांना मिळालेल्या 'हातगाडी' या चिन्हाची संपूर्ण मतदारसंघात खासी चर्चा आहे. भंडारा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाने विद्यमान आमदार नरेंद्र भोंडेकर यांनाच उमेदवारी दिली असून, आघाडीत ही जागा काँग्रेसने स्वतःकडे घेत पुजा ठवकर या नवख्या महिलेला रिंगणात आणले परिणामी, निष्ठावंत काँग्रेसी जाम भडकले असून, प्रेमसागर गणवीर यांनी बंडखोरी केली आहे. दुसरीकडे, २०१४ मध्ये बसपाकडून लढलेल्या देवांगणा गाढवे यांनी यावेळी विरांगणा थाटात रणांगणात उडी घेतली असून, त्यांनीही प्रचाराचा धुराळा उडविणे सुरू केले आहे. पदयात्रा आणि रॅलीच्या माध्यमातून त्या मतदारांपर्यंत पोहचत आहेत.

मतदारसंघातील पवनी येथे मुख्यमंत्री शिंदे यांची सभा झाली असली तरी साडेतीन तासाच्या विलंबाने बरेच पाणी वाहून गेले. विद्यमान आमदाराविरूद्ध दोन महिला आणि काँग्रेसी बंडखोर असा हा चौकोनी सामना येथे रंगत असल्याचे दिसून येत आहे.



■ नागपूर : मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार तथा विधान परिषद सदस्य आमदार प्रविण दटके यांनी त्यांच्या प्रचाराचा शुभारंभ केला. आपल्या कुटुंबियांचे आशिर्वाद घेवून शुक्रवारी ते प्रचारासाठी बाहेर पडले. दोन दिवसात त्यांनी मध्य नागपूर मतदारसंघातील बराचसा भाग पिंजून काढत मतदारांशी संपर्क केला.

## जोरगेवारांनी व्यक्त केली मुनगंटीवारांवर नाराजी

# फडणवीसांसमोरच तक्रारीचा सूर

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ९ :

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या उपस्थितीत झालेल्या जाहीर सभेत चंद्रपूरचे उमेदवार किशोर जोरगेवार यांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा वन व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यावर सर्वासमक्ष जाहीर नाराजी व्यक्त केली. मुनगंटीवार यांचे नाव न घेता भाजपाची उमेदवारी मिळू नये यासाठी विरोध व प्रयत्न झाले असेही म्हणाले. विशेष म्हणजे यावेळी मंचावर भाजपाचे मुनगंटीवार समर्थक पदाधिकारी उपस्थित होते.



कोनेरी तलाव येथे झालेल्या जाहीर सभेत आमदार जोरगेवार म्हणाले, मला भाजपाची उमेदवारी मिळू नये यासाठी विरोध व प्रयत्न झाले. मी सुरुवाती पासून भाजप कार्यकर्ता आहे. मात्र आश्वासने देऊनही २००९ आणि २०१४ मध्ये सलग दोनदा भाजपचे तिकीट नाकारण्यात आले. चंद्रपरकरानी नाना शामकुळे यांचा चेहरा कधीही पाहिला नसतांना त्यांना तेरा दिवसात निवडून दिले.

फडणवीस व गडकरी यांनी आमच्यावर अक्षरशः शामकुळे यांना थोपविले. ज्या शामकुळेंना जिल्ह्यात कोणी ओळखत नव्हते. ते येथे अवघ्या १३ दिवसांत विजयी झाले. या विजयाचे बक्षीस म्हणून मुनगंटीवारांना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तर हंसराज अहिर केंद्रीय राज्यमंत्री झाले. यावेळी मला पक्ष सोडण्यास भाग पाडण्यात आले. आता पक्षाने तिकीट देण्याची तयारी दाखवल्याने जाहीर विरोध झाला.

पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनीच आमच्यासारख्यांना घराबाहेर काढले, तर सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी जायचे कुठे? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

**सहा प्रमुख पक्ष, अनेक आघाड्या असे पर्याय असूनही महत्त्वाकांक्षेचे धुमारे फुटलेल्यांची संख्या इतकी प्रचंड वाढली की त्यांना उमेदवारी देणे शक्य नव्हते. त्यातच सहा प्रमुख पक्षांच्या आघाड्यांमध्ये जागावाटप करण्याची वेळ आल्याने जागा मर्यादित आणि इच्छुक अमर्यादित असे चित्र तयार झाले. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बंड थांबवण्यासाठी बाबापुता केला. त्याचे परिणाम लवकरच समोर येतील.**

# बहुतेक पक्षांच्या पायात पाय!



विश्लेषण

**शिवाजी कराळे**

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या टप्प्यात महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बंड थांबवण्यासाठी बाबापुता केला. मनधरणी केली. देवेंद्र फडणवीस यांनी तर चार्टर्ड प्लेन पाठवून संबंधितांना मुंबईत बोलवून घेतले. शरद पवार स्वतः अनेक मतदारसंघातील बंडखोरांशी बोलले. उद्धव ठाकरे यांनी बंड खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा दिला. ठाकरे-पवार यांनी कोठेही मैत्रीपूर्ण लढती नाही, असे सांगितले. असे असूनही ठाकरे यांचे अनेक शिवसैनिक पवार यांच्याच पक्षाच्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. पवार यांच्या पक्षाच्या काही नेत्यांनी बंड करून स्वतःच्या पक्षाला अडचणीत आणले आहे. महायुतीमध्येही बंडखोरी आहे; परंतु जास्त बंडखोरी महाविकास आघाडीत आहे. त्यातल्या त्यात एक जमेची बाजू म्हणजे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीच्या रिंगणातून आपले उमेदवार मागे घेतले. त्याचा फायदा महाविकास आघाडीला होण्याची शक्यता आहे. उमेदवारी न मिळाल्याने बंडाचा झेंडा हाती घेणाऱ्यांनी पक्षश्रेष्ठी किंवा नेतेमंडळींच्या मनधरणीलाही दाद दिली नाही. पक्षश्रेष्ठींच्या जवळच्या असलेल्या नेत्यांनीही स्वहितासाठी पक्षहिताचा बळी दिल्याचे अनेक ठिकाणी दिसले. निवडणुकीचे रण तापले असताना या बंडखोरीची जोरदार चर्चा आहे.

उमेदवारी देताना काही ठिकाणी महायुती आणि महाविकास आघाडीत बिघाडी झाली. महायुतीतील मित्रपक्षाचे उमेदवार महायुतीच्याच उमेदवारांच्या विरोधात, तर काही ठिकाणी महाविकास आघाडीत बिघाडी होऊन मैत्रीपूर्ण लढती होत असल्याचे चित्र दिसले. महाविकास आघाडीने समाजवादी पक्षाला दोन जागा दिल्या; परंतु त्यांचे अन्य चार उमेदवार महाविकास आघाडीविरोधात लढत आहेत. कोकणातील तीन जागा शेतकरी कामगार पक्षाला सोडण्यात आल्या; परंतु सांगोल्याचा तिढा सुटला नव्हता. त्यामुळे रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना परस्परांविरोधात लढत आहेत. सर्वाधिक चर्चा झाली, ती माहीम मतदारसंघाची. या मतदारसंघातून राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तेथे महायुतीने उमेदवार देऊ नये, अशी भाजपची इच्छा होती. भाजपच्या नेत्यांनी मित्रपक्षाला विश्वासात न घेताच वक्तव्य केल्याने आता घूमजाव करण्याची वेळ आली. सुरुवातीला भाजपचे खासदार नारायण राणे यांनी आमचा पाठिंबा हा शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार सदा सरवणकर यांनाच असेल, असे स्पष्ट केले. त्यापाठोपाठ राज ठाकरे यांच्याशी उत्तम वैयक्तिक संबंध असलेल्या आशिष शेलार यांनीही घूमजाव केले. महायुतीचे उमेदवार आता सरवणकरच आहेत आणि महायुतीचा उमेदवार तोच आमचा उमेदवार अशी भूमिका शेलार यांनी घेतली. भाजपच्या नेत्यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून सरवणकर यांच्या पाठिशी उभे राहण्याची भूमिका घेतली असली, तरी प्रत्यक्षात निवडणुकीत भाजपची मते कुठे जाणार, हे पाहावे लागेल.

राज ठाकरे यांचे भाजपच्या अनेक नेत्यांशी उत्तम वैयक्तिक संबंध आहेत. त्यामुळे माहीम विधानसभा निवडणुकीत मनसेला पडद्यामागून गुप्तपणे रसद पुरवली जाणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. माहीममध्ये शिंदे गटाने आक्रमक पवित्रा घेतल्याने आता मुंबईतील बारा मतदारसंघांमध्ये मनसे कडवा प्रतिकार करण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाच्या चर्चेत अडथळा ठरलेल्या रामटेकमध्ये उद्धव ठाकरे यांच्या उमेदवाराविरुद्ध काँग्रेस नेते राजेंद्र मुळक यांनी अर्ज कायम ठेवला आहे. अकोला पश्चिममध्ये 'वंचित'चे अधिकृत उमेदवार डॉ. झिशान हुसेन यांनी माघार घेतल्याने पक्षाला मोठा धक्का बसला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अहेरीत महायुतीमधील भाजप बंडखोर अंबरीशराव आत्राम यांनी अर्ज कायम ठेवला आहे. तेथे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे विद्यमान मंत्री धर्मरावबाबा आत्राम रिंगणात आहेत. काटोलमध्ये माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील यांच्या विरुद्ध काँग्रेसचे याज्ञवल्क्य जिचकार रिंगणात आहेत. अमरावती जिल्ह्यातील बडनेराचे अपक्ष आमदार रवी राणा यांच्या विरोधात भाजप नेते तुषार भारतीय यांनी बंड केले आहे. विशेष म्हणजे भाजपने ही जागा राणा यांच्यासाठी सोडली होती आणि राणा यांच्या पत्नी भाजपकडून लोकसभा निवडणूक लढल्या होत्या. दर्यापूर मतदारसंघात शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात राणा यांच्या युवा स्वाभिमानचे रमेश बुंदिले रिंगणात आहेत.

इकडे अहिल्यानगर जिल्ह्यातील बारापैकी पाच मतदारसंघांमध्ये महायुतीच्या, तर चार मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी बंडखोरी केली आहे. केवळ संगमनेर, कोपरगाव, कर्जत-जामखेड या तीन मतदारसंघांमध्ये बंडखोरी झाली नाही. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर आणि सांगोला विधानसभा मतदारसंघात आघाडीतील घटक पक्ष एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढणार असे चित्र स्पष्ट झाले तर माढा येथून आमदार बबनराव शिंदे यांनी माघार घेतल्याने येथे चुरशीची तर माळशिरसमध्ये दुरंगी लढत होणार आहे. सांगोला येथे शिवसेनेने (ठाकरे) दीपक साळुंखे यांना उमेदवारी दिली आणि अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी अर्ज कायम ठेवला. ही जागा शेकापला सोडली जाते. येथे शेकापने डॉ. बाबासाहेब देशमुख यांना उमेदवारी दिली. सांगली जिल्ह्यात सांगली, खानापूरसह जतमध्ये बंडखोरी कायम आहे. विशेषत: सांगलीमध्ये काँग्रेसच्या जयश्री पाटील यांच्या बंडखोरीमुळे माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम यांची कोंडी झाली आहे. मराठवाड्यातील घनसावंगीमधून शिवाजी चोथे, बीडमध्ये ज्योती मेटे, आष्टीमध्ये भीमराव धोंडे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवले. नांदेडमध्ये महायुतीमध्ये बंडखोरी झाली. लातूर आणि धाराशिवमध्ये बंडखोरी शमवण्यास नेत्यांना यश मिळाले. जरांगे यांनी निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर बंडखोरी करू असे सांगणाऱ्या बहुतेकांनी अर्ज परत घेतले. आष्टी मतदारसंघात 'महायुती'मध्ये मैत्रीपूर्ण लढत होत आहे.

मराठवाड्यातील ४६ मतदारसंघांपैकी २० जागा भाजप लढवत असून एकनाथ शिंदे गट १६ तर राष्ट्रवादी अजित पवार गट ९ जागा लढवत आहे. गंगाखेडमधील अपक्ष उमेदवार रत्नाकर गुट्टे यांना महाविकास आघाडीने पुरस्कृत केले. महायुतीमध्ये आष्टी मतदारसंघातून प्रताप आजबे आणि भाजपचे सुरेश धस या दोघांना अधिकृत 'एबी' फॉर्म दिला गेल्याने मैत्रीपूर्ण लढत होणार आहे. रायगड जिल्ह्यात महाविकास आघाडी आणि महायुतीचा तिढा कायम राहिला आहे. शेवटच्या क्षणी उमेदवारांनी अर्ज मागे घेण्यास नकार दिल्याने, सातपैकी सहा मतदारसंघांमध्ये युती आणि आघाडीमध्ये बिघाडी कायम राहिल्याचे चित्र आहे. पुणे जिल्ह्यातील २१ पैकी आठ मतदारसंघांमध्ये बंडखोरी कायम राहिली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीला बाकी ठिकाणी बंडखोरांची मनधरणी करण्यात यश आले आहे. मावळ, भोर, इंदापूर, पुरंदर, जुन्नर, चिंचवड आणि पुण्यातील पर्वती, कसबा आणि शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघांमध्ये बंडखोरी झाली आहे. यात पुण्यातील चार मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचे बंडखोर उभे आहेत.

नाशिक जिल्ह्यातील १५ मतदारसंघांपैकी काही ठिकाणी महाविकास आघाडी आणि महायुती या दोघांनाही बंडखोरीचा फटका बसणार आहे. चांदवडमधून भाजपचे उमेदवार डॉ. राहुल आहेर यांना त्यांचेच बंधू केदार आहेर यांनी आव्हान दिले आहे. नांदगावमध्ये शिवसेनेचे (शिंदे) सुहास कांदे यांच्या विरोधात राष्ट्रवादीचे (अजित पवार) समीर भुजबळ उभे आहेत. देवळालीमध्ये तांत्रिक कारणामुळे शिवसेनेच्या (शिंदे) राजश्री अहिरराव यांची उमेदवारी राष्ट्रवादीच्या (अजित पवार) उमेदवार सरोज अहिरे यांच्याविरोधात कायम राहिली. जळगाव जिल्ह्यातील एरंडोलमध्ये शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) जिल्हाप्रमुख डॉ. हर्षल माने यांनी राष्ट्रवादीचे (शरद पवार) उमेदवार डॉ. सतीश पाटील यांच्या विरोधात, अजित पवार गटाचे डॉ. संभाजीराजे पाटील तसेच भाजपचे माजी खासदार ए. टी. पाटील यांनी शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार अमोल पाटील यांच्या विरोधातील अपक्ष उमेदवारी कायम ठेवली आहे. अशा स्थितीत किती बंडखोर विजयी होतात, किती आपल्याच पक्षाच्या नेत्यांना पाडतात आणि कितीजण आघाडी किंवा महायुतीला मारक ठरतात, हे २३ तारखेलाच स्पष्ट होईल.

(अद्वैत फीचर्स)

**अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांचे निवडून येणे भारतासाठी फारसे चांगले नाही. जागतिक बाजारांबरोबरच भारतीय शेअर बाजारानेही ट्रम्प यांच्या विजयाचे स्वागत केले असले, तरी हा तात्कालिक परिणाम आहे. दीर्घकालीन विचार करता बाजारातही 'स्विंग मूड' येऊ शकतो. ट्रम्प यांनी मोदी यांना अनेक वेळा आपले मित्र म्हटले आहे; पण ते भारताच्या धोरणांवर कठोर टीका करतात, हे ही वास्तव आहे.**

# ट्रंपशाही आणि भारत



विश्वसंचार

**प्रा. अशोक ढगे**

जगभर सध्या उजव्या विचारांच्या नेत्यांची चलती आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवडून आलेले डोनाल्ड ट्रम्पही उजव्या विचारांचे आहेत. सव्वाशे वर्षांच्या इतिहासात एकदा पराभूत झालेला अध्यक्ष पुन्हा निवडून येण्याचा हा दुर्मीळ योगायोग आहे. अमेरिकेच्या इतिहासात आणखी एक योग ट्रम्प यांनी जुळवून आणला आहे. सर्वच 'स्विंग स्टेट्स'मध्ये त्यांनी चांगली आघाडी घेतली. पाऊस आणि डेमोक्रॅट्स यांचे नाही म्हटले, तरी वाकडेच असते. मोठ्या तीन स्विंग राज्यांमधील पाऊसही ट्रम्प यांच्या पथ्यावर पडला आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ट्रम्प हे मित्र आहेत. दोघांची विचारधारा एकच असली, तरी राष्ट्रहिताचा मुद्दा पुढे येतो, तेव्हा मित्रत्व मागे पडते. पूर्वी भारतीय वस्तूंवर आयात कर लादून ट्रम्प यांनी ते सिद्ध केले होते. आयात-निर्यात व्यवहारात भारताचा अमेरिकेशी असलेला व्यापार फायद्याचा आहे. त्यामुळे या व्यापारात अडचणी आल्या, तर ते भारतासाठी नुकसानीचे आहे. ट्रम्प यांनी प्रचारकाळातच देशातील उत्पादनांना प्राधान्य देण्याचे आणि स्थलांतरितांविरोधात कडक धोरण राबवण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे त्यांचे निवडून येणे हे भारतासाठी फारसे चांगले नाही. जागतिक बाजारांबरोबरच भारतीय शेअर बाजारानेही ट्रम्प यांच्या विजयाचे स्वागत केले असले, तरी हा तात्कालिक परिणाम आहे. दीर्घकालीन विचार करता बाजारातही 'स्विंग मूड' येऊ शकतो. ट्रम्प यांनी मोदी यांना अनेक वेळा आपले मित्र म्हटले आहे; पण ते भारताच्या धोरणांवर कठोर टीका करतात, हे ही वास्तव आहे. ट्रम्प यांच्या विजयामुळे त्यांची आर्थिक धोरणे 'अमेरिका फर्स्ट'वर केंद्रित असतील, असे मानले जात आहे.

ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात अमेरिकन उद्योगांना संरक्षण देण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यांनी चीन आणि भारतासह अनेक देशांमधून होणाऱ्या आयातीवर जबरदस्त शुल्क लादले होते. 'अमेरिका फर्स्ट'चा नारा दिल्यानंतर ते अमेरिकन वस्तू आणि सेवांच्या आयातीवर उच्च शुल्क आकारणाऱ्या देशांवर कारवाई करू शकतात. भारतही त्याच्या प्रभावाखाली येऊ शकतो. ट्रम्प यांच्या मते भारत व्यावसायिक नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन करतो. भारताने अमेरिकन वस्तूंवर जादा शुल्क लादलेले त्यांना आवडत नाही. ट्रम्प यांना त्यांच्या देशातून आयात केलेल्या वस्तूंवर केवळ वीस टक्के शुल्क आकारणे अपेक्षित आहे. त्यांचे आयात शुल्काचे नियम लागू झाले तर भारताचा जीडीपी २०२८ पर्यंत ०.१ टक्क्यांनी घसरेल. भारत आणि अमेरिका यांच्यात २०० अब्ज डॉलर्सचा व्यापार आहे. ट्रम्प यांनी दर वाढवल्यास भारताचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यांच्या व्यापार धोरणांमुळे भारताची आयात महाग होऊ शकते. त्यामुळे महागाईचा दर वाढेल आणि व्याजदर फार कमी करणे शक्य होणार नाही. यामुळे ग्राहकांच्या, विशेषत: मध्यमवर्गीयांच्या अडचणी वाढू शकतात, कारण त्यांचा 'ईएमआय' वाढू शकतो.

ट्रम्प हे चीनचे कट्टर विरोधक मानले जातात. त्यांच्या पहिल्या कार्यकाळात अमेरिका आणि चीनमधील संबंध खूपच बिघडले होते. यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील संरक्षण संबंध मात्र अधिक दृढ होऊ शकतात. आपल्या पहिल्या कार्यकाळात, ते 'क्वाड' मजबूत करण्यासाठी सक्रिय असल्याचे दिसून आले. 'क्वाड' ही आशिया-पॅसिफिक प्रदेशातील अमेरिका, ऑस्ट्रेलिया, भारत आणि जपान यांची युती आहे. ट्रम्प अध्यक्ष झाल्यामुळे शस्त्रास्त्र निर्यात, संयुक्त लष्करी सराव आणि भारतासोबत तंत्रज्ञान हस्तांतरण यामध्ये दोन्ही देशांमध्ये अधिक चांगला समन्वय दिसून येईल. यामुळे चीन आणि पाकिस्तानविरुद्ध भारताची स्थिती मजबूत होऊ शकते. ट्रम्प यांनी अध्यक्ष असताना भारतासोबत मोठे संरक्षण करार केले होते. लाखो भारतीय एच-१बी व्हिसा घेऊन अमेरिकेत काम करतात. हे लोक व्हिसाची संख्या वाढवण्याची मागणी करत आहेत. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे स्थलांतरितांसाठी खूप अडचणी निर्माण होऊ शकतात. ट्रम्प यांना अवैध स्थलांतरितांना अमेरिकेतून परत पाठवायचे आहे. ते म्हणतात की अवैध स्थलांतरित अमेरिकन लोकांच्या नोकऱ्या खातात. अमेरिकेतील तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या संख्येने भारतीय काम करतात आणि ते तिथे एच-१बी व्हिसावर जातात. ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात एच-१ बी व्हिसाच्या नियमांबाबत कठोरपणा दाखवला होता. त्याचा परिणाम भारतीय व्यावसायिक आणि तंत्रज्ञान कंपन्यांवर दिसून आला. हे धोरण कायम राहिल्यास अमेरिकेत भारतीयांसाठी नोकरीच्या संधी कमी होतील.

कठोर इमिग्रेशन धोरण भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांना अमेरिका सोडून इतर देशांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करू शकते. भारतातील मानवाधिकारांच्या कथित उल्लंघनाबाबत ट्रम्प यांनी अद्याप काहीही म्हटलेले नाही. भारतातील मोदी सरकारसाठी ही परिस्थिती अनुकूल आहे. काश्मीरमधील पुलवामा हल्ल्याच्या वेळीही ट्रम्प यांनी भारताच्या स्वसंरक्षणाच्या अधिकाराचे समर्थन केले होते; मात्र मानवाधिकार आणि लोकशाहीच्या प्रश्नावर बायडेन प्रशासन भारताविरोधात अधिक बोलले आहे. ट्रम्प यांच्या राजवटीप्रसंगीचे जपान आणि दक्षिण कोरियामधील तणावाचे संबंध लक्षात घेतल्यास त्यांच्यावर फार विसंबणे धोक्याचे आहे. ते चीनविरुद्ध तैवानचे रक्षण करतील, की नाही हेदेखील स्पष्ट नाही. अशा वृत्तीमुळे अमेरिकेची आशियातील आघाडी कमकुवत होईल. यामुळे चीनची स्थिती मजबूत होईल. ते भारताच्या हिताचे नाही. काश्मीरच्या मुद्द्यावर त्यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यात मध्यस्थीचा प्रस्तावही ठेवला होता. तो भारताला आवडला नव्हता. ट्रम्प यांनी तालिबानशी करार केला आणि अमेरिकन सैन्य अफगाणिस्तमधून मागे घेतले. अमेरिकेचे हे पाऊल दक्षिण आशियातील भारताच्या हिताच्या विरोधात गेले. बांगलादेशच्या प्रश्नावर ट्रम्प यांनी उघडपणे भारताचे समर्थन केले आहे. त्यांनी बांगलादेशमधील अल्पसंख्याकांच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले होते. अलीकडेच, बांगलादेशमधील हिंदू, ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याकांवरील हिंसाचारावर त्यांनी 'मी बांगलादेशमधील हिंदू, आणि इतर अल्पसंख्याकांवरील हिंसाचाराचा तीव्र निषेध करतो', असे म्हटले होते.

पाकिस्तान हा चीनचा मित्र आहे आणि अमेरिका आता अफगाणिस्तानला आपल्या रणनीतीचा भाग मानत नाही. कारण तिथे तालिबान आहे. ट्रम्प रशिया आणि भारत यांच्यातील संबंधांबाबत अधिक उदार होऊ शकतात; पण भारतासोबतच्या व्यापार आणि शुल्काच्या मुद्द्यावर ते कठोर भूमिका घेऊ शकतात. ट्रम्प नवीन युद्ध सुरू करणार नाहीत. त्यांनी अफगाणिस्तानमधून आपल्या सैनिकांना माघारी बोलावले. ट्रम्प यांचे पुतीन यांच्यांशी चांगले संबंध आहेत. युक्रेनमधील युद्धाला अमेरिकाही तेवढीच जबाबदार आहे. आता ट्रम्प हे युद्ध संपवतील. इस्त्रायललाही ते युद्धविराम करण्यास भाग पाडतील. अमेरिकेने आशियाई क्षेत्रात दोन भूमिका निश्चित केल्या आहेत. एक म्हणजे भारत हा त्यांचा सर्वोत्तम मित्र आणि सामरिक भागीदार आहे आणि दुसरा म्हणजे चीन हा त्यांचा शत्रू आहे. ट्रम्प यांच्या विजयामुळे होणारे भारताचे पहिले मोठे नुकसान म्हणजे महागाईमध्ये होऊ शकणारी वाढ. ट्रम्प यांची धोरणे महागाई वाढवणारी असू शकतात. व्याजदर वाढू शकतात आणि भारतीय कंपन्यांसाठी आयात खर्च वाढू शकतात. विशेषतः यंत्रसामग्रीसाठी अमेरिकेवर अवलंबून असलेल्या कंपन्यांच्या खर्चात वाढ होऊ शकते. ट्रम्प यांच्या विजयामुळे डॉलर मजबूत झाल्यास भारताला आयातीवर अधिक खर्च करावा लागेल. भारताची निर्यात आयातीच्या तुलनेत कमी असल्याने डॉलर मजबूत होतो, तसतसे भांडवल अमेरिकेत जाते. त्यामुळे जागतिक गुंतवणूकदारांसाठी चलन अधिक आकर्षक बनते. यामुळे रुपयासह उदयोन्मुख बाजारातील चलनांवर दबाव येईल.

गुंतवणूकदारांनी भांडवल काढून घेतल्यास भारतात अवमूल्यन होऊ शकते. मजबूत डॉलरमुळे आयात, विशेषतः कच्चे तेल आणखी महाग होईल. त्यामुळे भारतात महागाई वाढेल. ट्रम्प यांच्या धोरणांबद्दलची अनिश्चितता जागतिक आणि भारतीय बाजारांमध्ये दीर्घकालीन अस्थिरता आणू शकते. ट्रम्प यांच्या मागील कार्यकाळात भारतीय समभागांपेक्षा अमेरिकन शेअर बाजाराच्या कामगिरीला प्राधान्य दिले होते. त्यांच्या पहिल्या टर्ममध्ये 'नॅसडॅक'ने 'निफ्टी'पेक्षा खूप चांगली कामगिरी केली. 'निफ्टी'च्या ३८ टक्क्यांच्या परताव्याच्या तुलनेत 'नॅसडॅक' ने ७७ टक्क्यांची उल्लेखनीय वाढ नोंदवली होती. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात एच-१ बी व्हिसा कार्यक्रमावर अंकुश ठेवण्याच्या प्रयत्नांमुळे एच-१बी कामगारांचा व्हिसा नाकारण्यात वाढ झाली, प्रक्रिया शुल्कात वाढ झाली आणि महागाई वाढली. त्यामुळे भारतीय आयटी सेवा क्षेत्रात त्यांच्या अवलंबित्वामुळे घट झाली; मात्र यावेळी परिस्थिती वेगळी असू शकते. भारतीय आयटी कंपन्या स्थानिक कामगार वाढवत आहेत आणि आता अमेरिकन कर्मचाऱ्यांचा एक मोठा भाग स्थानिक किंवा ग्रीन कार्डधारक असल्यामुळे संभाव्य इमिग्रेशन धोरणांपासून अधिक संरक्षित आहे. त्यामुळे सेवा वितरण आणि मार्जिनवर होणारा परिणाम कमी होतो. ट्रम्प प्रशासनाने अमेरिकीकेंद्रित व्यापार धोरणांना प्राधान्य दिल्यास भारतावर व्यापारातील अडथळे कमी करण्यासाठी किंवा 'टॅरिफ'ला तोंड देण्यासाठी दबाव येऊ शकतो. आयटी, फार्मास्युटिकल्स आणि कापड यासारखी अमेरिकेच्या निर्यातीवर जास्त अवलंबून असलेली भारतीय क्षेत्रे सर्वाधिक प्रभावित होऊ शकतात. तथापि, पुरवठा साखळी हस्तांतरित करण्यासाठी अमेरिकन कंपन्यांना प्रोत्साहन देऊन चीनवरील अवलंबित्व कमी करण्याच्या ट्रम्प यांच्या प्रयत्नांचा भारताला फायदा होऊ शकतो.

(अद्वैत फीचर्स)

# इंधनावरील परावलंबन का वाढतेय?

**सरकारचे तेलाच्या बाबतीतले विदेशावरील अवलंबित्व वाढत चालले आहे. त्याच वेळी सार्वजनिक तेल कंपन्यांची परिस्थिती खालावत आहे. चालू वर्षी भारताने ८८.२ टक्के तेल आयात केली. मागील वर्षी हे प्रमाण ८७.६ टक्के होते. नैसर्गिक वायू आयात करण्याचे प्रमाण तर पाच टक्क्यांनी वाढून ५१.५ टक्क्यांवर गेले आहे. देशाचा विकास विशिष्ट गतीने वाढत असताना इंधनाची मागणीही फोफावत चालली आहे.**



परामर्श

**हेमंत देसाई**
ज्येष्ठ पत्रकार

सरकारी मालकीच्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने जाहीर केलेल्या सप्टेंबर तिमाही कामगिरीमधील निव्वळ नफ्यात ९८ टक्क्यांची घसरण नोंदवली आहे. तेल शुद्धीकरण तसेच विपणनातून नफाक्षमतेत झालेल्या घटीमुळे या प्रतिष्ठित कंपनीच्या कामगिरीवर विपरीत परिणाम दिसून आला आहे. गेल्या वर्षी खनिज तेलावर प्रक्रिया करून पिंपामागे १३.१२ डॉलरच्या शुद्धीकरण उत्पादनांच्या तुलनेत सरलेल्या तिमहीमध्ये कंपनीने पिंपामागे फक्त चार डॉलर कमावले आहेत. त्याचबरोबर सरकारनियंत्रित किमतीवर घरगुती स्वयंपाकाचा गॅस विकावा लागल्याने, कंपनीला चांगलाच फटका बसला. लोकसभा निवडणुका जाहीर होण्यापूर्वी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी दोन रुपयांनी कपात करण्यात आल्यामुळे खनिज तेलाच्या स्थिरावलेल्या आयात किमतीचा संभाव्य फायदाही इंडियन ऑइलला मिळू शकला नाही. इंडियन ऑइल हे प्रतिनिधिक उदाहरण आहे. मुळात भारत सरकार आत्म निर्भरतेच्या कितीही बाता मारत असले, तरी तेलाच्या बाबतीतले आपले विदेशावरील अवलंबित्व वाढतच चालले आहे. त्याच वेळी सार्वजनिक तेल कंपन्यांची परिस्थिती खालावली, तर ती अधिक चिंतेची बाब म्हणावी लागेल. चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीत म्हणजेच एप्रिल-डिसेंबर या काळात भारताने ८८.२ टक्के तेल आयात केली. मागील वर्षी याच कालावधीत हे प्रमाण ८७.६ टक्के होते. केंद्र सरकारच्या पेट्रोलियम नियोजन आणि विश्लेषण विभागाने ही आकडेवारी दिली आहे. नैसर्गिक वायू आयात करण्याचे प्रमाण तर पाच टक्क्यांनी वाढून ५१.५ टक्क्यांवर गेले आहे. देशाचा विकास विशिष्ट गतीने वाढत असताना इंधनाची मागणीही फोफावत आहे.

दिवसेंदिवस भारताची ऊर्जेची गरज वाढत असल्यामुळे कच्चे तेल आणि वायू यांची प्रचंड आयात करावी लागत आहे. कोविडप्रभावित २०१९ चा अपवाद वगळता इंधन-आयात फुगतच चालली आहे. २०२० मध्ये आपण ८५ टक्के कच्चे तेल आयात करत होतो. आता त्यात जवळपास सव्वातीन टक्क्यांची वाढ झाली आहे. जागतिक बाजारपेठेतील तेलाचे भाव भडकतात, तेव्हा आपल्या अर्थव्यवस्थेवरील ताण वाढतो. यामुळे व्यापारी तूट रुंदावते आणि विदेशी गंगाजळीची घागर रिती होऊ लागते. परिणामी, एका डॉलरसाठी जास्त रुपये खर्च करावे लागतात आणि चलनवृद्धीचे संकट उद्भवते. यासाठी तेलाचे देशांतर्गत उत्पादन वाढले पाहिजे. २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तसे आश्वासन दिले होते. कच्च्या तेलाची स्वयंपूर्णता प्राप्त करण्याबाबत काँग्रेस सरकारने ६० वर्षांमध्ये काहीच केले नाही, अशी टीकाही त्यांनी केली होती. परंतु आता, 'तुम्ही तरी काय केले' असा प्रश्न विचारला जात आहे. भारताच्या कच्च्या तेलाची आयात २०२४ च्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये १२ कोटी ५० लाख टन होती. २०२३ च्या पहिल्या अर्धवर्षात ती ११ कोटी ५९ लाख टन होती. देशांतर्गत उत्पादन थोडे फार वाढले असते, तर आयातीची निकड भासली नसती. परंतु देशांतर्गत उत्पादन किंचित घटून एक कोटी ४४ लाख टन इतके झाले. त्यामुळे देशातील ठोकळ तेलआयातीचे बिल १२ टक्क्यांनी वाढून ७१ अब्ज डॉलर्सवर जाऊन पोहोचले.

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये नैसर्गिक वायूच्या आयातीमध्ये दोन टक्क्यांची वाढ झाली. जवळपास १९ अब्ज घनमीटर इतका वायू आयात करण्यासाठी आपल्याला ७ अब्ज ७० कोटी डॉलर्स इतके विदेशी चलन खर्च करावे लागले. त्या अगोदरच्या वर्षात हा आकडा साडेसहा अब्ज डॉलर्स इतकाच होता. २०१३-१४ मध्ये भारताची कच्च्या तेलाची आयात एकूण गरजेच्या ७७ टक्के इतकी होती. २०२२ पर्यंत हे प्रमाण ६७ टक्क्यांपर्यंत आणू, अशी गर्जना मोदी सरकारने केली. प्रत्यक्षात मात्र आयात कमी होण्याऐवजी ११ टक्क्यांनी वाढली. एप्रिल ते सप्टेंबर २०२४ या काळात भारताने ११ कोटी ७७ लाख टन इतकी पेट्रोलियम उत्पादने वापरली. त्यापैकी केवळ एक कोटी ३८ लाख टन इतकी उत्पादने आपण देशांतर्गत निर्माण केली होती. रशिया, इराण, संयुक्त अरब अमिराती, कतार तसेच विविध आखाती राष्ट्रांमधून कच्चे तेल आणि वायू आयात केला जातो. मात्र आयात कमी झाली, तरच जैविक इंधने, पर्यायी इंधने, इलेक्ट्रिक मोबिलिटी यासाठी प्रोत्साहन देण्याच्या सरकारी धोरणाचे ध्येय साध्य होऊ शकेल. एकीकडे मेट्रो, मोनो तसेच ज्येष्ठ आणि महिलांसाठी सवलतीत वा फुकट प्रवासाला उत्तेजन दिले जात आहे. परंतु देशाच्या अनेक भागांमध्ये सार्वजनिक वाहतुकीची साधने उपलब्ध नाहीत. शिवाय रस्त्यावर दुचाकी व चारचाकी वाहनांची प्रचंड गर्दी होऊन इंधन वापर आणि प्रदूषण वाढतच आहे. सार्वजनिक वाहतुकीची साधने वाढणे, वाजवी दरात प्रवास करण्याच्या सोयी असणे आणि इंधनाच्या देशांतर्गत उत्पादनासाठी करसवलती देणे घडल्याविना धनावरील परावलंबन कमी होणार नाही.

ग्लोबल डेटानुसार, २०३५ पर्यंत अंदाजे ७.५ टक्क्यांच्या वाढीसह वाहतूक हे भारतातील सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र बनणार आहे. देशांतर्गत मर्यादित तेल संसाधनांसह, वाढत्या वाहतूक क्रियाकलाप आणि इंधनाच्या वापरामुळे गेल्या दोन दशकांमध्ये कच्च्या तेलाच्या आयातीवर भारताचे अवलंबित्व लक्षणीयरित्या वाढले आहे. म्हणूनच तेल अवलंबित्व कमी करून ऊर्जा कार्यक्षमता वाढवून विद्युत, हायड्रोजन आणि जैवइंधन यासारख्या पर्यायी इंधनांवर चालणारी वाहने वापरणे हा हानिकारक उत्सर्जन कमी करण्याचा एक आदर्श मार्ग मानला जातो. तथापि, या पर्यायी इंधनांचा शाश्वत वापर संसाधन उपलब्धता, संभाव्य जोखीम आणि जीवनाच्या शेवटच्या व्यवस्थापनाविषयी प्रश्न निर्माण करतो. त्यामुळे वाहतुकीमध्ये त्यांचा वापर प्रभावित करणाऱ्या घटकांचे सर्वसमावेशक मूल्यांकन आवश्यक आहे. बॅटरी आणि इंधन सेल वाहने स्थानिक पातळीवर शून्य-उत्सर्जन वाहने असली तरी त्यांना संसाधनांची कमतरता, पायाभूत सुविधांच्या मर्यादा आणि उच्च खर्च यासारख्या आव्हानांचा सामना करावा लागतो. परिणामी, त्यांच्या बाजारपेठेतील प्रवेशावर आणि ग्राहकांच्या स्वीकृतीमध्ये अडथळा येतो. जैवइंधन, सध्याच्या वाहनांशी सुसंगत असताना पुरेसा फीडस्टॉक सुरक्षित करण्यात आणि अन्न विरुद्ध इंधन समस्यांचे निराकरण करण्यात आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करणे हे प्राथमिक वाहन इंधन म्हणून पर्यायी इंधनाच्या सातत्यपूर्ण वापरासाठी महत्त्वाचे आहे. मात्र पर्यायी इंधनाच्या वापराला काही आव्हाने आहेत. त्याकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे.

पेट्रोल-डिझेलच्या शंभरीतील दरांमुळे एकीकडे जनता नाराज असताना सरकार पर्यायी इंधन वापरा, असा सल्ला देत आहे; मात्र त्यासाठी ठोस धोरण, पायाभूत सुविधांवर भर दिला जात नसल्याने नागरिकही या इंधनांकडे अद्याप वळलेले नाहीत. हे इंधन फायदेशीर आणि प्रदूषणविरहित कसे, याबाबत जनजागृती करून जनतेला दिलासा देणारे धोरण सरकारने आखणे आवश्यक आहे. मागील काही वर्षांमध्ये देशात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे प्रमाण टप्प्याटप्प्याने वाढवले जात आहे. पेट्रोल-इथेनॉलच्या मिश्रणामुळे इंधनाची गुणवत्ता सुधारते. तसेच, उत्पादन खर्च कमी होऊन प्रदूषणही घटते. २०१४ मध्ये पेट्रोलमध्ये एक ते दीड टक्के इथेनॉल टाकले जात होते. आता हे प्रमाण ८.५ टक्क्यांवर आले आहे. साखर उद्योगाबरोबरच मका आणि इतर धान्यांपासून इथेनॉलनिर्मितीचे प्रयत्न होत आहेत. देशातले निम्मे इथेनॉल साखर उद्योगापासून तर निम्मे धान्यापासून तयार होते. इथेनॉलचा वापर वाढवण्याबरोबरच जास्तीत जास्त निर्मिती व्हावी यासाठी उद्योगांना सुविधा देणे आवश्यक आहे. सध्या भारतात ६८४ कोटी लिटर इथेनॉल तयार करण्याची क्षमता आहे. ही क्षमता एक हजार कोटी लिटरपर्यंत वाढवण्याची केंद्राची योजना आहे. भारतात साखरेचे उत्पादन अधिक होत असल्याने साखर कारखान्यांवर त्याचा भार पडणार आहे; परंतु इथेनॉलचे उत्पादन वाढल्यास साखर कारखान्यांना दिलासा मिळणार आहे. भारताला पेट्रोल-डिझेल निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात तेलाची (८३ टक्के) आयात करावी लागते. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी २०२५ पर्यंत देशात पेट्रोलमधील इथेनॉलचे प्रमाण २० टक्क्यांपर्यंत वाढण्याचे म्हटले आहे. एकूणच भारताची भविष्यातील इंधनाची गरज आणि इथेनॉल निर्मितीतून ती भागवण्याची क्षमता यावर तेलासाठी इतर देशांवर अवलंबून असणे कमी होणार आहे.

(अद्वैत फीचर्स)

# अनुकूल वातावरण...

**उत्तराखंड, आसामनंतर आता छत्तीसगडमध्ये समान नागरी संहिता कायदा लागू करण्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यातच उच्च न्यायालये तसेच सर्वोच्च न्यायालयही समान नागरी कायद्याबाबत सरकारला विचारणा करत आहेत. त्यामुळे आता समान नागरी कायदा लागू करण्यासाठी कधी नव्हे एवढे अनुकूल वातावरण तयार झाले आहे. सरकारने त्याचा फायदा उठवला पाहिजे.**



विशेष

**महेश जोशी**

भारतीय जनता पक्षाच्या अजेंड्यामधील महत्त्वाचे मुद्दे हळुहळू पुर्णत्वाकडे जात आहेत. राम मंदिराचा मुद्दा निकाली निघाला आहे. अयोध्येत राम मंदिर उभे राहिले आहे. त्यात रामलल्ला विराजमान झाले आहेत. काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा रद्द करण्यात आला आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील संघ परिवाराच्या अजेंड्यावरचे हे दोन विषय मार्गी लागले असले, तरी समान नागरी कायद्याचा विषय मार्गी लागलेला नाही. भारतीय जनता पक्षाच्या काळात तिहेरी तलाक रद्द करण्यात आला. आता न्यायालयांनीही मुस्लिम महिलांना पोटगीचा अधिकार आहे, असे निकाल देताना कायद्यासमोर धार्मिक कायदे महत्त्वाचे नसतात, असे म्हटले आहे. राजीव गांधी यांच्या काळात शाहबानोला पोटगी मंजूर करण्यात आली, तेव्हा त्यावर मोठा गहजब झाला. मुस्लिम समाज रस्त्यावर उतरला. धर्मांधांनी दंगली घडवल्या. मुस्लिम व्होट बँकेसाठी राजीव गांधी यांनी कायद्यात बदल केला. मुस्लिम महिलांच्या पोटगीचे दोन निकाल अलिकडेच लागले. 'मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डा'ने न्यायालयांच्या निकालावर नाराजी व्यक्त केली. हा मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात हस्तक्षेप असल्याचे म्हटले; परंतु केंद्रात मोदी यांच्या नेतृत्वाखाली खमके सरकार असल्याने कुणाची रस्त्यावर यायची हिंमत झाली नाही. समान नागरी कायदा करण्यासाठी ही अनुकूल परिस्थिती आहे, असे म्हणण्यामागे हे कारण आहे. मोदी २ सरकारच्या काळातच सरकारला समान नागरी कायदा आणायचा होता, त्याच्या अंमलबजावणीनंतर धार्मिक कायद्यातील अनेक तरतुदी एकसमान होतील.

स्वातंत्र्यानंतर आधी जनसंघ आणि आता भाजपचे तीन प्रमुख हेतू राहिले आहेत. यातील पहिला म्हणजे जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवणे. दुसरे, अयोध्येत राममंदिर बांधणे आणि तिसरे, संपूर्ण देशात समान नागरी कायदा लागू करणे. पहिल्या दोन संदर्भात काम पूर्ण केल्यानंतर भाजप आता समान नागरी संहिता लागू करण्यावर भर देत आहे. केंद्र सरकारने २१ व्या कायदा आयोगाकडून समान नागरी संहितेवर सूचना मागवल्या होत्या. कायदा आयोगाने २०१८ मध्ये कौटुंबिक कायद्यातील सुधारणा नावाचा एक सूचना पेपर प्रकाशित केला. देशात सध्या समान नागरी संहितेची गरज नसल्याचे त्यात म्हटले होते. त्यानंतर २२ व्या विधी आयोगाने यावर पुनर्विचार करणे आवश्यक असल्याचे सांगितले. समान नागरी संहिता म्हणजे संपूर्ण देशात प्रत्येक धर्म, जात, संप्रदाय, वर्गासाठी एकच नियम. दुसऱ्या शब्दात, समान नागरी संहिता म्हणजे संपूर्ण देशासाठी एकसमान कायद्यासोबतच विवाह, घटस्फोट, वारसा, दत्तक हे नियम सर्व धार्मिक समुदायांसाठी समान असतील. घटनेचे कलम ४४ सर्व नागरिकांना समान कायदे लागू करण्याविषयी सांगते. कलम ४४ हा राज्यघटनेच्या धोरणात्मक निर्देश घटकांमध्ये समाविष्ट आहे.

भारतात सर्व नागरिकांसाठी समान फौजदारी संहिता आहे; परंतु समान नागरी कायदा नाही. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयांमध्ये अनेक वेळा समान नागरी संहिता लागू करण्यावर भर दिला आहे. १८३५ मध्ये ब्रिटिश सरकारच्या अहवालात समान नागरी कायद्याचा उल्लेख करण्यात आला होता. गुन्हे, पुरावे, करार आदी मुद्द्यांवर एकसमान कायदे लागू करण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले होते. या अहवालात हिंदू आणि मुस्लिमांच्या धार्मिक कायद्यांशी छेडछाड करण्याबाबत कोणतीही चर्चा करण्यात आलेली नाही. तथापि, १९४१ मध्ये, हिंदू कायद्यावरील संहिता तयार करण्यासाठी बी. एन. राव समितीची स्थापना करण्यात आली. राव समितीच्या शिफारशीनुसार, हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख यांच्या वारसा प्रकरणांचे निराकरण करण्यासाठी १९५६ मध्ये हिंदू वारसा विधेयक स्वीकारण्यात आले; मात्र मुस्लिम, ख्रिश्चन आणि पारशींसाठी वेगळे कायदे ठेवण्यात आले. भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की आपल्याकडे संपूर्ण देशात एकसमान आणि संपूर्ण गुन्हेगारी संहिता आहे. दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहितेत याचा समावेश आहे. तसेच मालमत्तेच्या हस्तांतरणाचा कायदा आहे, याशिवाय निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स कायदा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेत म्हणाले होते, मी असे अनेक कायदे उद्धृत करू शकतो जे सिद्ध करतील की देशात व्यावहारिकदृष्ट्या समान नागरी संहिता आहे. त्यांचे मूलभूत घटक समान आहेत आणि ते संपूर्ण देशात लागू आहेत. नागरी कायदे विवाह आणि वारसा हक्क कायद्याचे जतन करण्यास सक्षम नाहीत. भारतीय करार कायदा १८७२, नागरी प्रक्रिया संहिता, मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२, भागीदारी कायदा १९३२, पुरावा कायदा १८७२ मधील सर्व नियम सर्व नागरिकांसाठी समान आहेत. त्याच वेळी, धार्मिक बाबतीत प्रत्येकासाठी कायदे वेगळे आहेत. भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशात त्याची अंमलबजावणी करणे इतके सोपे नाही. देशाच्या संविधानाने प्रत्येकाला आपापल्या धर्मानुसार जगण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. घटनेच्या अनुच्छेद २५ मध्ये म्हटले आहे की कोणालाही स्वतःच्या धर्माचे पालन आणि प्रचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. भारताची सामाजिक रचना विविधतेने नटलेली आहे. परिस्थिती अशी आहे की एकाच कुटुंबातील सदस्य वेगवेगळ्या प्रथा पाळतात. लोकसंख्येच्या आधारे पाहिल्यास देशात हिंदू बहुसंख्य आहेत; परंतु विविध राज्यांमधील हिंदूंमधील धार्मिक श्रद्धा आणि चालीरीतींमध्ये बराच फरक दिसून येतो. त्याचप्रमाणे, मुस्लिमांमध्ये शिया, सुन्नी, वहावी आणि अहमदिया समुदायांमध्ये प्रथा आणि नियम वेगळे आहेत. ख्रिश्चनांमध्येही वेगवेगळे धार्मिक कायदे आहेत.

काही समाजातील पुरुष अनेक वेळा विवाह करू शकतात. काही ठिकाणी विवाहित महिलेला वडिलांच्या मालमत्तेत वाटा मिळू शकत नाही, तर काही ठिकाणी मुलींनाही संपत्तीत समान हक्क देण्यात आला आहे. समान नागरी संहिता लागू होताच हे सर्व नियम संपुष्टात येतील. १९८५ च्या प्रसिद्ध शाहबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की कलम ४४ हे डेड लेटरसारखे झाले आहे. न्यायालयाने देशात समान नागरी संहिता लागू करण्याच्या गरजेवर भर दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की समान नागरी संहिता परस्परविरोधी विचारधारा असलेल्या कायद्यांवरील असमान निष्ठा दूर करून राष्ट्रीय एकात्मतेला मदत करेल. बहुपत्नीत्वाशी संबंधित सरला मुद्गल विरुद्ध केंद्र सरकार या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की पंडित जवाहरलाल नेहरुंनी १९५४ मध्ये संसदेत समान नागरी संहितेऐवजी हिंदू कोड बिल मांडले. समान नागरी कायदा लागू करण्याची ही योग्य वेळ नाही, असे त्या वेळी त्यांनी म्हटले होते. राज्यघटनेच्या संस्थापकांनी भारतातील सर्व क्षेत्रातील नागरिक समान नागरी संहिता लागू करण्याचा प्रयत्न करतील, असे म्हटले होते; मात्र आजतागायत यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

गोव्यात समान नागरी कायदा आधीच लागू आहे. गोव्याला राज्यघटनेत विशेष राज्याचा दर्जा देण्यात आला आहे. त्याचबरोबर पोर्तुगीज नागरी संहिता लागू करण्याचा अधिकारही गोव्याला मिळाला आहे. राज्यातील सर्व धर्म आणि जातींसाठी कौटुंबिक कायदा लागू आहे. त्यानुसार विवाह, घटस्फोट आणि उत्तराधिकाराचे कायदे सर्व धर्म, जाती, पंथ आणि वर्गातील लोकांसाठी समान आहेत. गोव्यात कोणीही तिहेरी तलाक देऊ शकत नाही. नोंदणीशिवाय विवाह कायदेशीररित्या वैध होत नाही. मालमत्तेवर पती-पत्नीचा समान हक्क आहे. मुस्लिमांना चार वेळा लग्न करण्याचा अधिकार नाही. त्याचबरोबर हिंदूंना दोनदा लग्न करण्याचे स्वातंत्र्य आहे; मात्र त्यातही काही अटी आहेत. जगातील अनेक देशांमध्ये समान नागरी संहिता लागू आहे. यामध्ये आपले शेजारी देश पाकिस्तान आणि बांगलादेश यांचादेखील समावेश आहे. या दोन्ही देशांमध्ये शरियावर आधारित समान कायदा सर्व धर्म आणि पंथाच्या लोकांना लागू होतो. याशिवाय इस्रायल, जपान, फ्रान्स आणि रशियामध्येही समान नागरी संहिता लागू आहे. तथापि, काही प्रकरणांसाठी, समान दिवाणी किंवा फौजदारी कायदेदेखील लागू होतात. युरोपीय देश आणि अमेरिकेमध्ये सर्व धर्मांच्या लोकांना धर्मनिरपेक्ष कायदे समान रीतीने लागू होतात. जगातील बहुतेक इस्लामिक देशांमध्ये, शरियावर आधारित एकसमान कायदा आहे, जो तेथे राहणाऱ्या सर्व धर्मांच्या लोकांना सारखाच लागू होतो.

भारतात समान नागरी संहिता लागू झाल्यास मुलींचे लग्नाचे वय वाढेल. यामुळे त्या किमान पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करू शकतील. त्याचबरोबर विवाह नोंदणीची सुविधा गावपातळीपर्यंत वाढविण्यात येणार आहे. लग्न नोंदणीकृत नसेल, तर संबंधित जोडप्याला सरकारी सुविधांचा लाभ मिळणार नाही. घटस्फोटासाठी पती-पत्नीला समान अधिकार असतील. एकापेक्षा जास्त व्यक्तींशी लग्न करण्यावर पूर्ण बंदी असेल. नोकरी करणाऱ्या मुलाच्या मृत्यूनंतर पत्नीला मिळणाऱ्या भरपाईमध्ये पालकांच्या देखभालीची जबाबदारीही समाविष्ट असेल. वारसा हक्कात मुलगा आणि मुलगी यांना समान हक्क असतील. पत्नीच्या मृत्यूनंतर तिच्यापालकांचा सांभाळ करण्याची जबाबदारी पतीची असेल. त्याचबरोबर मुस्लिम महिलांना मुले दत्तक घेण्याचा अधिकार मिळणार आहे. त्यांची हलाला आणि इद्दतपासून सुटका होईल. 'लिव्ह-इन रिलेशनशिप'मध्ये राहणाऱ्या सर्वांना डिक्लेरेशन द्यावे लागेल. पती-पत्नीमध्ये मतभेद झाल्यास, त्यांच्या मुलाचा ताबा आजी-आजोबांपैकी एकाला दिला जाईल. मूल अनाथ झाल्यास पालक बनण्याची प्रक्रिया सुलभ होईल. या पार्श्वभूमीवर आता समान नागरी कायदा लागू करून एक पाऊल पुढे टाकावे लागेल.

(अद्वैत फीचर्स)

महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये निवडणुका आहेत. वेळ झपाट्याने जात आहे. कधीकधी गॅलेक्सीवर पाय ठेवतो. कधी पर्वत ओलांडताना. कधी ब्रह्मांड ओलांडून!

झारखंडमधील प्रकरण महाराष्ट्राइतके गुंतागुंतीचे नाही. शिवसेना खरी कोणती हे महाराष्ट्रातील अनेकांना समजलेले नाही? शेवटी खरी राष्ट्रवादी तुमची कोणती ? प्रत्येकाचे तुकडे झाले आहेत. शोधत राहाल अशा शैलीत. कुठे जावे? कोणाला आपले म्हणावे हे समजत नाही.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीत आपली मूक उपस्थिती नोंदवणाऱ्या जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आपले गनिमी कावा धोरण स्वीकारले आहे. उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी त्यांनी आपली तलवार म्यान केली खरी. पण, ती कुणाच्या सांगण्यावरून? गहन प्रश्न आहे. मराठा आंदोलनातून जन्म घेतलेल्या जरांगे यांनी यापूर्वी स्वबळावर उमेदवार उभे करून निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले होते. मग मागे फिरले. आता ते म्हणत आहेत, लढणार नाही, पाडणार.

मराठा प्राबल्य असलेल्या जागांवर ते कोणाचे नुकसान करणार आहेत, याचे संकेत स्पष्ट दिसताहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी थेट भाजपला धक्का दिला होता. यावेळी त्यांची दुखापत कुठे असेल आणि किती मजबूत असेल हे सांगता येत नाही.

तसे, तेव्हापासून गोदावरीत बरेच पाणी वाहून गेले आणि भाजपला जरांगेत कपात सापडली. लाडकी बहीण

# महाराष्ट्रात गनिमी युद्ध..

## झारखंडमध्ये अस्तित्वाची लढाई




म्हणून. महाराष्ट्रातील मुलगी बहिण. झारखंडमध्ये दीदी विरुद्ध जेएमएमच्या मैय्या.

मात्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख उलटून गेली असून जरांगे व्यतिरिक्त अनेकजण निवडणूक जिंकण्यासाठी आणि हरवण्यासाठी रिंगणात उतरले आहेत. निवडणुकीच्या भाषेत त्यांना बंडखोर म्हणतात. हे बंडखोर निवडणुका जिंकतात आणि हरवतात. तेही उभे राहतात.

झारखंडमधील भारत ब्लॉकमध्ये समाविष्ट असलेल्या कॉंग्रेस-जेएमएमने 7 हमीभाव जाहीर केले. मतांचे विभाजन करणे किंवा कट करणे हे त्यांचे मुख्य काम आहे. निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतशी नेतेमंडळी जल्लोष करत आहेत. लोहाराच्या भट्टीत जशी आग पेटते! जणू कुंभारांची आग पेटू लागते! घोषणा जोरात वाजू लागल्या आहेत. ढोल-ताशांवर घोषणा दिल्या जात आहेत. हा लढा थांबणार नाही. ज्यांच्या शब्दांना धारदार धार लावायची ते खंजीर आता मतदारांसमोर लोटांगण घालू लागले आहेत.

कोणीही कोणापेक्षा कमी नाही. कोणाला कोणाची भीती नाही. प्रत्येकाला सत्ता हवी असते. प्रत्येकाला खुर्ची हवी असते. कोणाला मिळणार आणि कोणाला नाही हे सामान्य माणसाने ठरवायचे आहे.

मतदारांनी ठरवायचे आहे. मात्र मतदार गप्प आहेत. कायमपासून. स्वतःच्या उशीशी बसून स्वतःला गाढ झोपलेले पाहणे ही त्यांची सवय आहे. ते काहीच बोलत नाही. जणू त्याचं तोंड बंद तळघर!

खुंटीला लटकवून रात्रीचे सोनेरी दिवस हॅन्गरला लटकवून घालवण्याची त्यांना आवड आहे. तो आपल्या नशिबात स्वतःच्या हातांनी अंधार लिहितो. त्याला तोंड उघडता येते की नाही हे निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी कळेल. तो काही बोलू शकतो का?

बोलता बोलता मला आठवले, निवडणुकीच्या निकालापूर्वी काय सांगितले जाते - म्हणजे एक्झिट पोल. त्याच्या विश्वासार्हतेला आग लागली आहे. आता सामान्य माणूसही या एक्झिट पोलला फसवणूक मानू लागला आहे. लोकसभा निवडणुकीत ते तोंडघशी पडले होते आणि हरियाणाच्या निवडणुकीच्या वेळी त्यांना पुरण्यासाठी जमीनही सापडली नाही! महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये त्यांचे काय होणार हे येणारा काळच सांगेल. मतदारांनी मात्र यावेळी सूज्ञपणाने मतदान करणे गरजेचे आहे.

■ ■ ■

# शेतकरी संघटना अन् सच्च्या कार्यकर्त्याच्या घुसमटीची कथा 'चिखलवाटा'

सुरेंद्र पाटील यांची चिखलवाटा ही कादंबरी नुकतीच अक्षरदान प्रकाशनाकडून प्रकाशित करण्यात आली आहे. सुरेंद्र पाटील म्हणजे गावमाती, बोलीशी एकरूप झालेलं मोकळंढाकळं व्यक्तिमत्त्व. आम्ही एकाच भागातले असल्यामुळे त्यांच्या प्रत्येक पुस्तकात येणारी संवेदना आपली वाटते.

चिखलवाटा ही कादंबरी सुरेंद्र पाटील सरांच्या भोवरा या कथेचे विस्तारीत रूप. ही कांदबरी जाणीव आणि वेदनेचे विविध कंगोरे आपणासमोर मांडते. आरंभी एका कुटुंबाची वाटणारी कथा शेवटच्या टप्प्यामध्ये संपूर्ण समाजाची बनून जाते. व्यंकटच्या रूपाने एखाद्या घरातील पहिल्या नोकरदाराची गाव - घर व स्वतःची नोकरी, संसार यामध्ये कशी ओढाताण होते? तो कसा न गावचा व शहराचाही राहत नाही? त्याला ना ग्रामीण जीवनाचा आनंद घेता येतो ना नोकरीचा. याचं वास्तव चित्रण सरांनी केले आहे.

**हणमंत पवार**

जसे, शहरात प्लॉट की गावाकडच्या शेतीत बोअर, बायकोच्या नोकरीचं डोनेशन की पुतणीचं लग्न अशा अनेक प्रसंगात व्यंकटची चाललेली घालमेल एखाद्या घरातील विशेषतः शेतकरी घरातील पहिल्या नोकरदार व्यक्तीची घालमेल आहे. ती त्याला शेवटपर्यंत कुठलाच होऊ देत नाही. ही घालमेल आमच्या सारख्या कुणब्याच्या पिढीतील पहिले नोकरदार प्रत्यक्ष अनुभवत आहोत. तसेच आज ही शेती कसा आतभट्ट्याचा व्यवहार बनली आहे. याचं प्रभावी चित्रण केलेलं आहे.

रोजगारापासून ते व्यापाऱ्यापर्यंत शेतकरी आज कसा नागवला जातो, तो कसा बिछायत बनला आहे, याची प्रभावी मांडणी लेखकांनी केलेली आहे. तसेच नव्वदच्या दशकात महाराष्ट्रामध्येच नाही, तर संपूर्ण देशभर शेतकरी संघटनेच्या विविध आंदोलनाने शेतकऱ्यांच्या मनामध्ये एक आशेचा किरण निर्माण झालेला होता. आपल्या घामाला दाम मागण्याची उर्मी या चळवळीने शेतकऱ्यांमध्ये निर्माण केली. परंतु हळूहळू मुख्य नेत्यापासून ते अनेक प्रमुख कार्यकर्ते राजकीय पक्षाच्या दावणीला बांधून विविध पदं बळकावली अन् तिकडं हळूहळू चळवळीतील हवा निघायला सुरूवात झाली. त्यात छातीवर रक्तवर्णी बिल्ला लावून प्रत्यक्ष गावागावात अधिकारी आणि राजकारण्याशी संघर्ष करणारा कार्यकर्ता यात होरपळला गेला.

अर्जुन सारख्या हजारों सामान्य कार्यकर्त्याचीं संघटनेच्या नादात आपल्या घर, लेकरं बाळं कुटुंबाकडं झालेलं दुर्लक्ष, त्याला आर्थिक, मानसिक दृष्ट्या पार कोलमडून उलथवून टाकलं... एका सच्च्या प्रामाणिक, कार्यकर्त्याची कशी फरपट झाली याचं वास्तव चित्रण केलेलं आहे. अर्जुनचं पुढे येणारं वाक्य संघटना, चळवळी, नेते या सगळ्यांनाच अंतर्मुख करायला लावतं...

खिशातले पैसे घालून कुठवर फिरावं ह्या संघटनेत? निसते भाषणं आयकून आन रास्ता रोको करून जीव जाजावला. मालाच्या भावाचा प्रश्न सुटंल मनून हामी संघटनेत गेलो, न्हाई त्या भानगडी केल्या, पर शेतकऱ्याच्या आडचनी जिथल्या तिथंच. जोशी काय तर भलं करत्याल आसं वाटू लालतं. पर त्येंला बी राजकारनात घुसायचा नाद लागलाय... संघटनेच्या पायात हामच्यासारख्या कार्यकर्त्याचा, त्येंच्या संसाराचा काय धुराळा झालाय ते त्येंला काय माहीत?

आबाच्या रूपाने एका चिवट, स्वाभिमानी व प्रामाणिक शेतकऱ्याची व्यथा कथा मांडली गेली आहे. जी आज आदर्शवत वाटते आहे. विशेषता जे लोक आज गावाकडील शेतीबाडी विकून शहरी भौतिक सुखाच्या मागे पळत आहेत. परंतु घरी सारी बंडाळ, पोरी उजवायला घरी दमडी नाही, कितीही संकट येऊ दे, जमीन विकू न देणं एका प्रामाणिक, निष्ठावान कुणब्याची आपल्या मातीशी इमानदारी आहे . चिखलवाटा या कादंबरीचं वेगळेपण म्हणजे या कादंबरीची सहज सुलभ लातूरी बोली... जसे, बायलीला या पावसाच्या, आमदा बी हा भाड्या गुंगारा देतो काय की? देवावानी वाट बघू लालेत समदे! आमदा ह्येनं झोला दिला तर काय खरं न्हाई!

कादंबरीत परिसरातील म्हणींची जागोजागी केलेली पेरणीही लक्ष वेधून घेते. एकंदरीत शेती, नामशेष होत चाललेल्या चळवळी, गाव- शहरात वेगाने वाढणारे अंतर , संपत चाललेलं गावपण आणि स्वतःच्याच कोशात रममाण होणारी नाती गोती, याचं सहजसोप्या निवेदनाद्वारे केलेलं चित्रण काळजाचा ठाव घेणारं झालं आहे . सुरेंद्र पाटील कादंबरीमध्ये चित्रमयरित्या प्रसंग असा उभा करतात, की कथा आपलीच वाटायला लागते.

■ ■ ■




# साळवन

**इंद्रजित भालेराव**

दसरा आणि दिवाळीच्या मधल्या काळात साळीची कापणी सुरू व्हायची. त्यामुळं आम्ही सकाळ-संध्याकाळ शेतात असायचो. या काळात साळीच्या शेतात खूप करमायचं.

सध्या साळवनाचे दिवस आहेत. साळवन म्हणजे साळीचं शेत. विशिष्ट पीक ज्या शेतात आहे, त्या शेताला तात्कालिक नाव पडतं. ज्या शेतात गव्हाचे पीक आहे, त्याला गव्हाळी म्हणतात. १९७० पर्यंत आमच्या गावाला गहू, साळ, भुईमूग, ऊस, केळी ही पिकं माहीत नव्हती. त्यानंतर आमच्या गावात धरणाचं पाणी आलं आणि गावात नवी पिकंही आली. जमिनीला बारमाही पाणी मिळालं. त्यामुळं या पाण्यावर येणारी ऊस, केळी, संत्री, मोसंबीसारखी अनेक पिकं आली.

पूर्वी वर्षात एकच पीक यायचं. आता तीन-तीन येऊ लागली. त्यात गहू आला, भुईमुगाच्या शेंगा आल्या आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे साळीचं पीक आलं. आमच्या खारीच्या रानात वराड्याच्या ठिकाणी हे साळीचं पीक घेतलं जाऊ लागलं. तिकडं पलीकडं चोपणातल्या रानातही साळ पिकवली जाऊ लागली. त्या आधी क्वचित कधी सणावाराला भात खायला मिळायचा. आता अधूनमधून नेहमीच भात खायला मिळू लागला. गव्हाची पोळीही नेहमीचीच झाली.

गावाच्या पूर्वेला, शेवटी आमचं घर होतं. घरासमोरूनच आमचं शेत सुरू व्हायचं. तिथूनच पळशीकडं जाणारा रस्ताही निघायचा. त्या रस्त्याच्या उजव्या हाताला शिवेपर्यंत सगळं आमचं शेत होतं. ते नंतर वडील आणि चुलत्यांच्या वाटण्यांमध्ये तीन जागी विभागलं गेलं. आम्ही शाळेत बसलो की पाठीमागं आमच्या खारीतलं साळवन दिसायचं.

आम्ही घरून निघालो की उजव्या हाताला साळवनाच्या काठाकाठानं शाळेत जायचो. तेव्हा या साळीचा सुगंध छाती भरून घ्यायचो. ही नवीन साळ आणि तिचा हा सुगंध सर्वांच्याच कौतुकाचा विषय होता. त्यामुळं रस्त्यानं जाणारे-येणारे शेजारच्या गावचे लोकही छाती भरून हा वास घेऊन जायचे. आम्ही वर्गात बसलेलो असताना या शेतावरून वाऱ्याची झुळूक खिडकीतून आत आली की तिच्यासोबत हा सुगंध यायचा आणि मस्त वाटायचं. माझी ह्यपेराळ्ह या संग्रहात असलेली एक कविता त्याच काळाचं प्रतिबिंब आहे. ती कविता अशी आहे...

*साळ पिवळी पिकली।*
*ओल्या भारानं वाकली*
*सुगंधली ओटीपोटी।*
*जणू चंदनाची उटी*
*चिक झाला घट्ट घट्ट।*
*जणू साखरेचे पीठ*
*कुसळाचा करव।*
*जणू तल्वारीचं पातं*
*आता कोवळ्या हातानं।*
*चिमणीच्याच दातानं*
*नाळ कापावी कापावी।*
*आणि अग्नीला ओपावी*

तेव्हा भावानं नवीन मढीसाळ आणली होती. ती सरत्याने पेरावी लागत नसे, तर तिची रोपं आणून शेतात लावावी लागत. परभणीच्या कृषी विद्यापीठाकडून सुरूवातीला या सगळ्या पिकाच्या लागवडीचं शिक्षण दिलं गेलं. आमच्या गावचे सरपंच सखारामजी यांच्या शेतात या साळीची रोपं मिळत असे. ती आणून आमच्या खारीच्या शेतात लावली जायची. रोपं लावायच्या आधी शेतात मद्या तयार कराव्या लागायच्या.

या मढीत घेतलेली साळ म्हणून तिला मढीसाळ असं नाव पडलं होतं. मढी म्हणजे काय? तर मोठं संपूर्ण वावरच वाकानासारखं बांध घालून तयार करायचं आणि त्यात चिखलाचा राडा करायचा. त्या राड्यात ही रोपं नुसती ठेवली की आपोआप आत जायची.

आम्ही आमच्या पाहुणेरावळ्यांच्या गावी जुनी साळ पाहिली होती, तशी ही साळ नव्हती. ती बारीक जिऱ्यासारखी होती आणि तिच्यात सुगंधी तांदूळ होता. या साळीचं आमच्या शेतात आलेलं पीक एवढं सुंदर होतं की कृषी विद्यापीठाचे लोकही आश्चर्य करू लागले. विद्यापीठाकडून आदर्श शेतकरी म्हणून दत्तू दादाचा सत्कारही करण्यात आला होता. या नवीन पिकाची पाहणी करायला विद्यापीठाची टीम गावात आली होती.

दसरा आणि दिवाळीच्या मधल्या काळात या साळीची कापणी सुरू व्हायची. त्यामुळं आम्ही सकाळ-संध्याकाळ शेतात असायचो. शाळा असेल तोवर शाळेत असायचो. नेमकीच थंडीची सुरूवात झालेली असायची. या काळात साळीच्या शेतात खूप करमायचं. ही साळ कणाकणानं वाढताना पाहता यायची. तेव्हापासूनच तिचा सुगंध छातीत भरलेला असायचा.

खळं सुरू झालं की, आम्ही शेतातच रमायचो. खळ्याचं गुत्तं दिलं असेल, तर आमच्या गावचे बुद्धाचे शंकरमामा आणि त्यांचं कुटुंब साळ कापून तिची सुडी घालीत. सगळी साळ कापून झाली की, दुसऱ्या दिवसापासून तिचं खळं घालीत.

जमीन सवान करून, पाण्यानं भिजवून, ठोकून, तुडवून गच्च केली जायची आणि आत औताची खोडं किंवा बाज आणून ठेवली जायची. त्याच्यावर चारी बाजूनं उभं राहून सगळे जण साळ बडवायचे. त्यातून साळी बाजूला पडायच्या आणि तणसाच्या पेंढ्या खळ्याबाहेर फेकल्या जायच्या. साळीची रास तयार व्हायची. मग तिव्ह्यावर उभं राहून साळ उधळून तिच्यातला कचरा बाहेर काढला जायचा आणि पोती भरली जायची. साळ काढून झाली की शेतातली उंदराची बिळं खोदण्यासाठी वडार, कैकाडी गावात बांधव येत. ते त्या बिळांतून खूप साळ बाहेर काढत. उंदरांनी साळीचे तुरे बिळात नेऊन ठेवलेले असत. रानात पडलेल्या साळीच्या एकेका कणासाठी माणसं, उंदरं, पाखरं, जनावरं यांची स्पर्धा सुरू व्हायची. हे सगळं दृश्य मी लहानपणी पाहिलं होतं, तेच पुढं माज्या एका कवितेत आलं. पीकपाणी या माझ्या संग्रहातली शेवटची सर्वा नावाची कविता याच प्रसंगावर आधारित आहे.

या साळीच्या शेताच्या आठवणी खूपच रम्य आहेत. कधी कधी रात्रीच्या वेळी शेतातल्या गड्यांसोबत बाजेवर आम्हीही सुडीला राखण म्हणून झोपायचो. तेव्हा दसरा-दिवाळीच्या दरम्यान स्वच्छ आभाळ आणि चांदणं पडलेलं असे. सालगडी आकाशातल्या एकेका ताऱ्याची ओळख करून देत असे. त्याला हे सगळं आकाशवाचन येत असायचं. पण अर्थातच ते पुस्तकातल्यासारखं नसायचं. वेगवेगळ्या ताऱ्यांची नावं, त्यांचे आकार, त्यांची वैशिष्ट्यं, त्यांच्या पाठीमागच्या लोककथा हे सगळं ऐकायला मिळायचं. हे ऐकत ऐकत आम्ही त्या साळवनात रात्री सुडीच्या शेजारी बाजेवर झोपी जायचो. कधी झोप लागली, तेही कळायचं नाही.

पुढं आमच्या या शेताचं गावाकडच्या भावानं प्लॉटिंग केलं. तुकडे करून ही जमीन लोकांना घर बांधण्यासाठी विकली. आता तिथं एक पयार्यी गाव उभं राहिलं आहे. कधीमधी गावाकडं गेलं आणि या नव्या वस्ती शेजारून जाऊ लागलो की, काळजात कळ उठते. याच ठिकाणी आपल्याला लहानपणी साळवन होतं.

तिथं माणसं राबायची आणि उंदरा-मांजराच्या जीवजित्राबांसह एक सृष्टी नांदायची. ती सगळीच सृष्टी आता नाहीशी झाली आहे. तिथं सिमेंटची घरं उभी राहिली आहेत. गावातलीच माणसं तिथं राहतात. आपलीच माणसं आहेत ती. त्यांच्याविषयी प्रेमच आहे. पण, आपण आपल्या स्मृतीच्या डोहात शिरलो की आपोआपच डोळ्यांचा डोह होऊन जातो.

■ ■ ■

# मिखाईल कलाशनिकोव्ह



एके ४७ ही एक स्वयंचलित रायफल आहे. सोव्हिएत युनियनच्या सैन्याने दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस १९४५ साली उत्तम बंदूक बनवण्याची स्पर्धा घेतली होती. त्या वेळी सोव्हिएत लष्करात अधिकारी असलेले मिखाइल कलाशनिकोव्ह यांनी सादर केलेल्या बंदुकीच्या डिझाइनला या स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळाले.

दुसऱ्या महायुद्धादरम्यान, जर्मन सैन्याने असॉल्ट रायफलची संकल्पना विकसित केली होती . 1946 मध्ये, त्याचा सहाय्यक अलेक्झांडर झिस्टेव्हने त्यात अनेक सुधारणा सुचवल्या, ज्या त्याने अनिच्छेने स्वीकारल्या. अखेरीस त्याचे 1947 मॉडेल त्याच्या साधेपणा, विश्वासार्हता आणि सर्व परिस्थितीत कार्यक्षमतेने वैशिष्ट्यीकृत होते आणि 1949 मध्ये त्याचे मॉडेल सोव्हिएत सैन्याने 7.62 कलाश्निकोव्ह रायफल म्हणून स्वीकारले.

कलाश्निकोव्ह रायफलची खासियत म्हणजे त्याची साधी रचना, खूप लहान आकार आणि मोठ्या प्रमाणात उत्पादनाची सोय . मिखाईल कलाश्निकोव्हने नेहमीच नाकारले आहे की त्याची रायफल जर्मन एसटीजी 44 ची प्रत आहे, जरी सर्व पुरावे त्याच्या विरोधात आहेत सर्व मागील रायफल रायफलला तंत्रज्ञानाचे संकलन मानले जाऊ शकते.

त्याचे लॉकिंग डिझाइन एम 1 ग्रँड रायफलमधून घेतले आहे, त्याचे ट्रिगर आणि सेफ्टी लॉक रेमिंग्टन रायफल मॉडेल 8 मधून घेतले आहे, तर गॅस सिस्टम आणि बाह्य डिझाइन STG44 च्या टीममधून घेतले आहे या सर्व शस्त्रांमध्ये प्रवेश होता आणि त्यामुळे त्याला चाकाचा नव्याने शोध लावण्याची गरज भासली नाही, स्वतःचा असा विश्वास होता की, एखादी गोष्ट शोधण्याआधी त्या क्षेत्रातील प्रत्येक गोष्टीचा अभ्यास केला पाहिजे आणि मी स्वतः हे अनुभवले आहे.

या रायफलचे वैशिष्ट्य म्हणजे तिची साधी रचना, लहान आकार आणि अत्यंत कमी खर्चात मोठ्या प्रमाणात निर्मिती करण्याची सुविधा, तिचा कणखरपणा आणि विश्वासार्हता ही एक मिथक बनली आहे, आर्क्टिक सारख्या थंड प्रदेशाला लक्षात घेऊन ही रायफल तयार करण्यात आली आहे, त्यात बरेच काही आहे. वैशिष्ट्ये खूप कचऱ्यात अडकूनही ते काम करू शकते. सोव्हिएत रेड आर्मीने याला सामूहिक वापरासाठी एक शस्त्र मानले.

१९४७ साली ही बंदूक सोव्हिएत लष्कराने स्वीकारली. ऑटोमॅटिक या इंग्रजी शब्दासाठीचा रशियन शब्द आवटोमाटसाठी ए हे आद्याक्षर, कलाशनिकोव्ह यांच्या नावातील के आणि वापरात आलेल्या वर्षांतील ४७ असे एकत्र करून एके-४७ हे नाव बनले आहे. या एके ४७ चा जनक मिखाईल कलाशनिकोव्ह याची आज १० नोव्हेंबरला जयंती.

■ ■ ■.

# अफजलखानाचा खात्मा

प्रतापगडाची लढाई ही महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाची लढाई आहे. ही महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात रोमांचक घटना मानली जाते. शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या रूपाने आलेले स्वराज्यावरील संकट अफजलखानाचा वध करून तसेच त्याच्या सैन्याचा दणदणीत पराभव करून परतवून लावले. ही तारीख होती १० नोव्हेंबर.

छत्रपती शिवाजी महाराजांनी पुण्याजवळील मावळ प्रातांत नियंत्रण मिळवले होते. त्या वेळेस हा भाग आदिलशाहीच्या अखत्यारीत येत होता त्यामुळे त्यांच्या दृष्टीने शिवाजीचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. विजापूरच्या दरबारात शिवाजींचा बंदोबस्त करण्याची मोहिम अफजलखानाकडे देण्यात आली. अफजलखानाने यापूर्वी शिवाजींचे थोरले बंधू संभाजी यांची हत्या केली होती तसेच आदिलशाही दरबारात त्याचे व शिवाजींचे वडील शहाजी यांचेही वैर होते.

अफजलखान मोठा फौजफाटा घेउन विजापूरहून जून १६५९ मध्ये निघाला. वाटेत येताना तो देवळे पाडत व मुतीर्भंजन करत आला. शिवाजींनी खान येत आहे सुद्धा बातमी ऐकल्यावर आपला मुक्काम राजगडावरून घनदाट जंगलातील आणखी दुर्गम असलेल्या प्रतापगड येथे हलवला.

अफजलखानाच्य सैन्यात सय्यद बंडा, फाजलखान, अंबरखान, याकुतखान, सिद्दी हिलाल, मुसाखान तसेच काही मराठे सरदार पिलाजी मोहिते, प्रतापराव मोरे इत्यादी जे आदिलशाहीत चाकरीला होते. त्याच्या फौजेत १२,००० घोडदळ, १०,००० पायदळ तसेच १,५०० बंदूकधारी सैनिक, ८५ हत्ती व १,२०० ऊंटांचा समावेश होता. ८० ते ९० तोफा होत्या. अफजलखानाने जंजिऱ्याच्या सिद्दीशी हातमिळवणी करून कोकणच्या बाजूनेही आपले पाश आवळले.

छत्रपति शिवाजी महाराजांनी आपले दूत पाठवून खानाला आपण घाबरलो असल्याचे दाखवले व आपल्याला खानाशी युद्ध करायचे नाही व समझोत्यास तयार आहोत हे कळवले. खानाने प्रथम वाईस बोलावणे धाडले, पण शिवाजी महाराजांनी नकार दिला. परंतु शिवाजी महाराजांनी आपण खूपच घाबरलो असल्याचे खानाला दाखवले व खान प्रतापगडाच्या पायथ्याशी भेटायला तयार झाला. भेटी दरम्यान दोन्ही पक्ष कोणतेही हत्यार वापरणार नाही असे ठरले.

प्रत्येक पक्षाचे १० अंगरक्षक असतील व



त्यातील एकजण शामियान्याबाहेर थांबेल. व इतर अंगरक्षक दूर रहातील असे ठरले. भेटीची वेळ नोव्हेंबर १० इ.स. १६५९ रोजी ठरली.

अफजलखान भेटीच्या वेळेआधीच शामियान्यात आला. शिवाजीने जाणूनबूजून अतिशय भव्य शामियाना बनवला होता. निःशस्त्र भेटायचे ठरले असले तरी खानाने आपल्या अंगरख्याखाली बिचवा लपवला होता व खानाकडून घातपाताची शक्यता शिवाजी महाराजांनी १०० टक्के धरली होती त्यामुळे त्यांनी अंगरख्याखाली चिलखत चढवले होते व लपवण्यास अतिशय सोपी वाघनखे हातामध्ये लपवली होती.

भेटीच्या सुरुवातीसच खानाने शिवाजी महाराजास अलिंगन देण्यास बोलवले व उंच अफजलखानाने शिवाजींना आपल्या काखेत दाबून बिचव्याचा वार केला. परंतु चिलखत असल्याने शिवाजी महाराज बचावले. खानाने दगा केलेला पाहून शिवाजी महाराजांनी लपवलेली वाघनखे काढली व खानाच्या पोटात घुसवून त्याची आतडी बाहेर काढली. अनपेक्षित प्रतिवाराने भेदरलेल्या खानाने दगा दगा असा आक्रोश केला व इतर अंगरक्षकांना सावध केले. इतर अंगरक्षकांच्यात तिथेच जुंपली. सय्यद बंडाने शिवाजी महाराजांनवर वार केला परंतु तो जिवा महालाने आपल्यावर घेतला व शिवाजी महाराजांचा रस्ता मोकळा केला. इकडे खान त्याच्या पालखीत स्वार झाला परंतु संभाजी कावजीने प्रथम पालखी वाहणाऱ्या भोईंचे पाय तोडले व जखमी अफजलखानाला मारून त्याचे शीर धडापासून अलग केले.

■ ■ ■

महासागर
ग्लॅम वर्ल्ड
रविवार ■ दि. १० नोव्हेंबर २०२४

# आगामी चित्रपटात सोबत दिसणार ऐश्वर्या अभिषेक



गेल्या अनेक महिन्यांपासून ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन घटस्फोटाच्या बातम्यांमुळे चर्चेत आहेत. दरम्यान, आता दोघेही लवकरच एका चित्रपटात एकत्र दिसणार असल्याची बातमी आहे. मणिरत्नम या दोघांना घेऊन चित्रपट बनवण्याच्या विचारात आहेत. अलीकडील झूमच्या अहवालात चित्रपट निर्मितीच्या जवळच्या स्त्रोताचा हवाला देऊन म्हटले आहे की, मणिरत्नम सर सध्या ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन यांच्यासोबत तिसरा चित्रपट बनवण्यासाठी विषय शोधत आहेत. या दोघांना घेऊन चित्रपट बनवायचा असे त्यांनी ठरवले आहे.

2007 मध्ये रिलीज झालेल्या गुरू या सुपरहिट चित्रपटात ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन मुख्य भूमिकेत होते. या चित्रपटाचे दिग्दर्शन मणिरत्नम यांनी केले होते. यानंतर 2010 मध्ये रिलीज झालेल्या 'रावण'मध्ये दोघेही एकत्र दिसले होते, मात्र हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फार काही कमाल दाखवू शकला नाही. जर हे वृत्त खरे ठरले तर ऐश्वर्या आणि अभिषेकचा मणिरत्नमसोबतचा हा तिसरा चित्रपट असेल.

अभिषेक बच्चनने मणिरत्नम यांच्या युवा चित्रपटातही काम केले आहे. ऐश्वर्या रायने 1997 मध्ये मणिरत्नम यांच्या तमिळ चित्रपट इरुवरमध्ये दुहेरी भूमिका साकारून तिच्या करिअरची सुरुवात केली. अलीकडेच ही अभिनेत्री त्यांच्या पोन्नियन सेल्वन-1 आणि पोन्नियन सेल्वन 2 या चित्रपटांमध्येही दिसली आहे.

ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन यांनी आतापर्यंत अर्धा डझन चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. यात ढाई अक्षर प्रेम के, कुछ ना कहो, उमराव जान, गुरु, सरकार राज, रावण, गुरू, धूम 2 या चित्रपटांचा समावेश आहे.

जुलैमध्ये बिझनेस टायकून मुकेश अंबानी यांचा मुलगा अनंत अंबानीने राधिका मर्चंटसोबत लग्न केले. या लग्नात अभिषेक बच्चन आपल्या कुटुंबासह पोहोचला होता, मात्र ऐश्वर्या राय त्यांच्यासोबत कुठेही दिसली नाही. बच्चन कुटुंबाने रेड कार्पेटवर कौटुंबिक फोटोंसाठी पोज दिली, तर त्यांच्या एन्ट्रीनंतर काही वेळातच ऐश्वर्या राय तिची मुलगी आराध्यासोबत लग्नात पोहोचली आणि एकटीने पोज दिली.

एंट्रीशिवाय लग्नाच्या संपूर्ण काळात दोघेही एकमेकांपासून दूर दिसले. काही काळानंतर ऐश्वर्या राय आपल्या मुलीसोबत सुट्टीवर गेली, यावेळीही अभिषेक तिच्यासोबत नव्हता. तेव्हापासून या जोडप्याच्या घटस्फोटाच्या बातम्या चर्चेत आहेत. अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांचे 2007 मध्ये लग्न झाले होते. या लग्नापासून या जोडप्याला आराध्या ही मुलगी आहे. ■ ■

# धमकी आणि कॉमन कनेक्शन



बॉलीवुड सुपरस्टार शाहरुख खान याला जीवे मारण्याची धमकी आली आहे. यापूर्वी सलमान खान यालाही धमकी आली होती. सलमान खान धमकी प्रकरण काळवीट म्हणजे हरीणाशी संबधित होते. आता शाहरुख खान प्रकरणात हरीण कनेक्शन असल्याचे समोर आले. या प्रकरणात ज्या क्रमांकावरुन कॉल आला त्या फैजान खान नावाच्या आरोपीने ही घटना सांगितली आहे. फैजान खान हा छत्तीसगडमधील रायपूर येथील आहे.

फैजान म्हणाला, 2 नोव्हेंबर रोजी माझ्या मोबाइलची चोरी झाली होता. बॉलीवूड सुपरस्टार शाहरुख खान याच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. ती तक्रार दोन समुदायामध्ये तणाव निर्माण करण्याची होती. त्यामुळे मला या धमकी प्रकरणात फसवण्यात येत आहे.

फैजान याने शाहरुख याच्या एक व्हिडिओची लिंक शेअर केली. त्यात त्याने शाहरुखवर गंभीर आरोप लावले. तो म्हणाला, अंजाम (1994) हा शाहरुख खान याचा चित्रपट होता. त्या चित्रपटात शाहरुख एका हरिणाची हत्या करतो, असे दृश्य आहे. त्यानंतर त्याचे मास शिजवून आपल्या कर्मचाऱ्यांना खाण्यासाठी देतो. फैजान म्हणतो, हा सीन म्हणजे दोन समुदायामध्ये तणाव निर्माण करणारा प्रकार आहे. दुसऱ्या एका व्हिडिओत त्याने आरोप केला की, काही दशतवादी घटकांसोबत शाहरुख याचा संबंध आहे.

बॉलीवुड स्टार सलमान खान धमकीचे हरीण कनेक्शन समोर आले होते. 1998 मध्ये हम साथ-साथ हैं चित्रपटाच्या चित्रिकरणादरम्यान राजस्थानमधील जोधपूरजवळ कळवीटची शिकार केल्याचा आरोप सलमान खान याच्यावर आहे. त्यानंतर बिश्नोई समाज शाहरुखवर नाराज आहे.

हे प्रकरण अजूनही कोर्टात सुरु आहे. 2018 मध्ये जेव्हा सलमान खान या प्रकरणासाठी कोर्टात आला होता, तेव्हा लॉरेन्स बिश्नाईने त्याला धमकी दिली होती.

आता पुन्हा सलमानला धमकी मिळाली आहे. त्यामुळे त्याच्या संरक्षणात वाढ करण्यात आली आहे. मागील महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांची लॉरेन्स गँगने हत्या केली होती. बाबा सिद्दिकी यांनी सलमान खानला मदत केल्यामुळे त्यांची हत्या केलीचे लॉरेन्स गँगने म्हटले होते. ■ ■ ■ ■



# ब्रेकअप आणि एकटेपणाला बळी



गेल्या महिन्यात अर्जुन कपूरने मलायका अरोरासोबतच्या ब्रेकअपची अधिकृत घोषणा केली होती. मलायकासोबतचे नाते संपुष्टात आल्यानंतर अर्जुन सिंगल आहे. सिंघम अगेन हा त्याच्या कारकिर्दीतील 20 वा चित्रपट आहे. पण सध्या अर्जुन 'सिंघम अगेन'च्या यशाचा आनंद घेत आहे. अलीकडेच, अभिनेत्याने एका मुलाखतीत ब्रेकअप, नैराश्य, अपयश आणि स्वयंप्रतिकार विकारांबद्दल सांगितले.

हॉलिवूड रिपोर्टर इंडियाशी संवाद साधताना अर्जुनला विचारण्यात आले की, तो ब्रेकअप आणि सौम्य नैराश्य या दोन्हींशी झुंजत असताना त्याने सिंघम अगेनमधील त्याच्या भूमिकेवर कसे लक्ष केंद्रित केले? या प्रश्नाचे उत्तर देताना, अभिनेत्याने सांगितले की त्याने नैराश्य दूर करण्यासाठी थेरपी घेतली, त्यानंतर असे दिसून आले की तो ऑटोइम्यून डिसऑर्डर, हाशिमोटो याने ग्रस्त आहे. हाशिमोटो रोग हा थायरॉईडचा विस्तार आहे, हा रोग थायरॉईड ग्रंथीवर परिणाम करतो. त्यामुळे थकवा येणे, वजन वाढणे अशी लक्षणे दिसतात.

या मुलाखतीत अर्जुन कपूर म्हणाला की, 'मला वाटते की मला स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे. स्वार्थी असण्याकडे वाईट नजरेने पाहिले जाते, पण स्वार्थी असण्यात काहीच गैर नाही असे मला वाटते. असे नाही की मी फक्त एकटा होतो किंवा काहीही, त्या वेळी माज्या आयुष्यात सर्वकाही चांगले चालले नव्हते. नात्यात आणि आयुष्यात गडबड होती.

अर्जुन कपूर आणि मलायका अरोरा 2019 पासून एकमेकांना डेट करत होते. काही काळानंतर या जोडप्याने त्यांचे नाते अधिकृत केले. ते अनेकदा सोशल मीडियावर एकमेकांसोबतचे फोटो शेअर करत होते. त्यानंतर ब्रेकअपच्या अफवा पसरल्या होत्या. तथापि, गेल्या महिन्यात अभिनेत्याने या अफवांना पुष्टी दिली.

अर्जुनने सांगितले की, 2012 मध्ये आई मोनाचे निधन झाले होते आणि त्यावेळी त्याची बहीण अंशुला दिल्लीत राहत होती. त्यामुळे अर्जुन कपूर मुंबईत एकटा पडला होता. अर्जुनने 2012 मध्ये परिणीती चोप्रासोबत इशकजादे या चित्रपटातून करिअरची सुरुवात केली होती. यानंतर त्यांनी 2 स्टेट्स आणि गुंडेमध्ये काम केले. हे दोन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरले. इतकं यश मिळूनही जेव्हा-जेव्हा तो घरी परतायचा तेव्हा त्याला एकटं वाटायचं. ■ ■

# 'जंतर मंतर छूमंतर' हॉरर कॉमेडी १० जानेवारीला होणार प्रदर्शित




दिवाळीच्या मंगलमय वातावरणात, गणराज स्टुडिओजने आणि एस वाय ७७ पोस्ट लैब आपल्या आगामी मराठी चित्रपट ह्य जंतर मंतर छूमंतरह्न चा टाइटल मोशन पोस्टर नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित झाला आहे. दिवाळीच्या या खास शुभमुहूर्तावर सिनेमाच्या शीर्षकासह, चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख देखील जाहीर करण्यात आली. ह्यजंतर मंतर छूमंतरह्न हा चित्रपट १० जानेवारी २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

टाइटल मोशन पोस्टरमध्ये चित्रपटाच्या अनोख्या थीमची झलक पाहायला मिळत आहे, ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटात मराठी सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकारांचा सहभाग असून, अभिज्ञा भावे, प्रियदर्शन जाधव, किरण गायकवाड, निखिल चव्हाण, महेश जाधव आणि भाग्यश्री मोटे या कलाकारांच्या दमदार अभिनयाची झलक या चित्रपटात पाहायला मिळेल. हा एक हॉरर कॉमेडी असून यात मोठ्या प्रमाणात विएफएक्सची जादू अनुभवायला मिळणार आहे. पहिल्यांदाच मराठी चित्रपटांमध्ये अशा पद्धतीच्या अक आणि विएफएक्सचा वापर होत आहे. गणराज स्टुडिओजचे मालक श्रेयश जाधव यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या चित्रपटाची कथा नितीन चव्हाण यांनी लिहिली आहे. ■ ■ ■

लोकरंजन

# नव वर्षाची भव्यदिव्य सांगितीक भेट !

## संगीत मानापमान

जिओ स्टुडिओज आणि सुबोध भावे यांचा बहुप्रतिक्षित संगीतमय चित्रपट ₹संगीत मानापमान₹ १० जानेवारी २०२५ ला प्रदर्शित होणार असल्याची बातमी जिओ स्टुडिओने दिली आहे. सोशल मीडियावर चित्रपटाचे पोस्टर रिलीज करण्यात आले असून सुबोध भावे बरोबर सुमित राघवन आणि वैदेही परशुरामी ही त्रयी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे.

वैदेहीचे नऊवारीतील विलोभनीय सौंदर्य आणि मराठमोळा साज तर राजबिंडा पारंपरिक पोशाख मधला सुमित राघवनचा लुक पाहता या चित्रपटाची भव्यता झळकून येत आहे. प्रेम, वीरता, शौर्य यांची गुंफण असलेले संगीत मानापमान नवीन वर्षात प्रेक्षकांसाठी एक मनोरंजनाची अविस्मरणीय भेट ठरणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिका सुबोध भावे करणार असून, ह्यकट्यार काळजात घुसलीह्य तसंच ह्यआणि डॉ. काशिनाथ घाणेकरह्य या चित्रपटाची संपूर्ण तांत्रिक टीम ह्या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र येत आहे त्याचबरोबर मुख्य म्हणजे प्रसिध्द संगीतकार शंकर -एहसान - लॉय यांचे संगीत या चित्रपटासाठी असणार आहे.

जिओ स्टुडिओज प्रस्तुत, निमार्ती ज्योती देशपांडे निर्मित, श्री गणेश मार्केटिंग निर्मित, सुबोध भावे दिग्दर्शित आणि अभिनित, ह्रसंगीत मानापमान₹ ह्या संगीतमय चित्रपटात वैदेही परशुरामी, सुमित राघवन सोबत आणखी काही दिग्गज कलाकार असणार आहेत. हा सिनेमा नवीन वर्षात १० जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्रातील सर्व चित्रपटगृहात प्रदर्शनास सज्ज होणार आहे. ■ ■




# 'बॉम्बे' करायचा नव्हता



मनीषा कोईरालाने 1995 मध्ये आलेल्या बॉम्बे चित्रपटात शैला बानोची भूमिका साकारली होती. अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान तिने या पात्राशी संबंधित एक किस्सा शेअर केला. मनिषाने सांगितले की, सुरुवातीला ही व्यक्तिरेखा साकारण्याबाबत तिच्या मनात खूप शंका होत्या. आईची भूमिका करून ती टाइपकास्ट होऊ शकते, असे अनेकजण तिला सांगत होते. तथापि, एका सल्ल्याने तिचा दृष्टीकोन बदलला आणि तिने ही भूमिका घेण्याचे ठरवले.

मनीषा कोईराला म्हणाली, 'जेव्हा मला बॉम्बे चित्रपटाची ऑफर आली तेव्हा मी थोडी भोळी होते. माझ्या आजूबाजूचे लोक मला ही भूमिका करू नका असे सांगत होते, कारण त्यात मला दोन मुलांच्या आईची भूमिका करायची होती. मी आईची भूमिका केली तर मला नायिकेच्या भूमिका मिळणार नाहीत, अशी भीती त्यांना वाटत होती.

सिनेमॅटोग्राफर अशोक मेहता यांनी मला मणिरत्नम यांच्या कामाबद्दल जाणून घेण्याचा सल्ला दिला आणि ही मोठी संधी कोणत्याही किंमतीत गमावू नका, कारण मणिरत्नम यांच्यासोबत काम करणे ही एक उत्तम संधी आहे. जेव्हा मी मणी सरांना भेटले, तेव्हा त्यांची समजूतदारता, नम्रता आणि सर्जनशील शैलीने मला खूप प्रेरित केले. यानंतर मला चित्रपटाचा संदेशही आवडला. मणी सरांसोबत काम करून खूप काही शिकायला मिळाले. त्यांची शॉट्स घेण्याची पद्धत आणि त्यांचे प्रयोग अगदी वेगळे आहेत. ते गुरु आहे. आणि मी अशोकजींचे आभार मानते, ज्यांनी मला खडसावून योग्य मार्ग दाखवला. ■ ■

# 'कॉन्स्टेबल मंजू' मालिकेत येणार मोठा ट्विस्ट



'कॉन्स्टेबल मंजू' या मालिकेच्या नव्या प्रोमोमध्ये मम्मीसाहेब पोलीस स्टेशनच्या आवारात महिलांचा मोर्चा नेत मंजूच्या तोंडाला काळ फासण्यासाठी मम्मीसाहेबांनी शाई आणली आहे. पोलीस स्टेशनच्या बाहेर येताच मम्मीसाहेब म्हणाल्या, ही कॉन्स्टेबल स्वतःच्या नवऱ्याला, सासूला अटक करते आणि हिचा साहेब हिला मेडल देतात. थांबा आता मीच मेडल देते. मंजूच्या चेहऱ्यावर शाई फेकायला एक बाई पुढे होते. तेवढ्यात सत्याचा थांबा! असा आवाज येताच त्या बाईच्या हातात असलेली शाईची बॉटल मम्मीसाहेब यांच्या चेहऱ्यावर पडते. आता मालिकेत यापुढे सत्या मंजूच्या बाजूने उभा राहणार का? मम्मीसाहेब मंजूला त्रास देण्यासाठी आणखी कोणता नवा डाव रचणार? हे पाहणं रंजक ठरणार आहे. मंजूचा पुढील प्रवास पाहण्यासाठी बघत रहा 'कॉन्स्टेबल मंजू' सोम ते शनि आपल्या सन मराठी वाहिनीवर. ■ ■

# 'प्रेमास रंग यावे' मालिकेत अनुष्का बोऱ्हाडेची धमाकेदार एन्ट्री

'सन मराठी' वाहिनीवरील प्रत्येक मालिका प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यात यशस्वी ठरली आहे. अशातच 'प्रेमास रंग यावे' या मालिकेतील प्रत्येक पात्राने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आहे. आता प्रेक्षकांची मन जिंकून घेण्यासाठी अभिनेत्री अनुष्का बोऱ्हाडे शौर्यच्या आत्याच्या भूमिकेत म्हणजेच मेनका म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सुंदर व अक्षराच्या आयुष्यात शौर्यमुळे आनंदाचा वातावरण निर्माण झालं होत. पण आता शौर्यच्या आत्याच्या एन्ट्रीने सुंदर व अक्षरा यांच्या आयुष्याला एक वेगळंच वळण मिळणार आहे. मेनका शौर्यला घेऊन जाणार का? कि सुंदर आणि अक्षराच्या नात्यात अडथळा ठरणार? आता मालिकेत नेमक काय घडणार हे जाणून घेण्यासाठी पाहायला विसरू नका 'प्रेमास रंग यावे' सोम. ते शनि. रात्री ९.३० वाजता फक्त आपल्या 'सन मराठी'वर.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# हंटर-2 च्या शुटींग दरम्यान सुनील शेट्टी जखमी

हंटर-2 च्या शूटिंगदरम्यान सुनील शेट्टीला गंभीर दुखापत झाली आहे. ॲक्शन सीन करताना त्याच्या बरगड्यांना दुखापत झाल्याचे वृत्त आहे. यानंतर डॉक्टरांची टीम तात्काळ सेटवर पोहोचली आणि त्याच्यावर उपचार सुरू करण्यात आले. पिंकविलाने दिलेल्या माहितीनुसार, हंटर-2 मधील ॲक्शन सीन दरम्यान सुनील शेट्टीच्या बरगड्यांना लाकडाचा धक्का लागला, त्यामुळे तो गंभीर जखमी झाला. त्याला तीव्र वेदनाही होत आहेत. डॉक्टर आणि एक्स-रे मशीन सेटवर बोलावण्यात आले आहे. 2023 मध्ये हंटर वेब सिरीज आली. 'हंटर' ही एक ॲक्शन थ्रिलर वेब सीरिज आहे. यामध्ये सुनील शेट्टीने मुख्य अभिनेता म्हणून एसीपी विक्रम सिन्हा यांची भूमिका साकारली होती.

ही मालिका गेल्या वर्षी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाली होती. सुनील शेट्टीसोबत, ईशा देओल, राहुल देव, बरखा बिश्त, मिहिर आहुजा, टीना सिंह, चाहत तेजवानी, करणवीर शर्मा, सिद्धार्थ खेर, गार्गी सावंत आणि पवन चोप्रा हे देखील यात दिसले होते.

'हंटर' या वेबसिरीजचे आठ भाग आहेत. या मालिकेत मुंबईच्या अंडरवर्ल्डचे जग दाखवण्यात आले आहे. त्याच वेळी, बेपत्ता महिलेचा शोध घेण्याच्या मोहिमेवर असलेले एसीपी विक्रम म्हणजेच सुनील शेट्टी यावेळी अनेक गोष्टींमधून जातात.

या चित्रपटांमध्ये दिसणार आहे वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर सुनील शेट्टीकडे अनेक प्रोजेक्ट्स आहेत. अभिनेता 'वेलकम 3' ते 'द लिजेंड ऑफ सोमनाथ' मध्ये दिसणार आहे. ■ ■

